16-03-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

DGS/ 13:00

16-03-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) A 1

DGS/ MAP/ KGS/ 13:00

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**पृ.शी./मु.शी.: सभागृहातील कामकाजाचे थेट प्रक्षेपण करण्यासंबंधी**

**माननीय सभापतींची घोषणा.**

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी मी घोषणा करीत आहे की, आज दिनांक 16.3.2006 रोजी पासून सभागृहातील प्रश्नोत्तराचा तास, तसेच लक्षवेधी सूचनांच्या संदर्भात चर्चेचे प्रायोगिक तत्वावर विनाशुल्क थेट प्रक्षेपण करण्यास "सहारा समय, मुंबई" या दूरचित्रवाहिनीस काही अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रसारण करण्यास अनुमती देण्यात आली आहे.

तसेच, "ई टी.व्ही. मराठी" या दूरचित्रवाहिनीस सभागृहातील प्रश्नोत्तराचा तास, तसेच लक्षवेधी सूचनांवरील चर्चेच्या कार्यवाहीचे चित्रीकरण करुन ते त्यांची बातमीपत्रे, तसेच "वृत्तवेध" सारख्या कार्यक्रमातून विस्तृतरीत्या प्रसारण करण्यास आज दिनांक 16 मार्च 2006 रोजी पासून काही अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रायोगिक तत्वावर विनाशुल्क प्रसारण करण्यास अनुमती देण्यात आली आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्यासंबंधी.**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, नुकत्याच पार पडलेल्या बारावीच्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेमध्ये संत तुकाराम महाराजांच्या संदर्भात जो शासनाकडून अवमान करण्यात आला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील समस्त वारकरी पंथांच्या लोकांमध्ये जी संतापाची तीव्र भावना निर्माण झाली आहे, त्या संदर्भात शासनाने सोमवारी विधानसभेमध्ये जे निवेदन केले आहे त्याबाबतचे वृत्त काल वर्तमानपत्रामध्ये आम्हाला वाचायला मिळाले. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर मला या संदर्भात माझे म्हणणे मांडण्याची संधी मिळाली पाहिजे म्हणून मी या ठिकाणी औचित्याच्या मुद्दयाव्दारे आग्रहाची विनंती करीत आहे. कारण या विषयाच्या संदर्भात खालच्या सभागृहामध्ये शासनातर्फे जे निवेदन करण्यात आले आहे ते अत्यंत अयोग्य आहे. शासनाने तशाप्रकारचे निवेदन करणे म्हणजे चोर सोडून संन्याशाला फाशी देण्याचा प्रकार आहे व हे अयोग्य आहे असे मला वाटते. तेव्हा या संदर्भात प्रश्नोत्तरांचा तास संपल्यानंतर शासनाने या संदर्भातील आपली भूमिका स्पष्ट केली तर त्यावर आम्हाला आमचे मत व्यक्त करता येईल. म्हणून आपण त्या संदर्भात शासनाला आजच निवेदन करण्याचे निदेश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या विषयाच्या संदर्भात शासनाने आज दिवसभरामध्ये निवेदन करावे.

श्री. आर. आर. पाटील (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, आज शासनातर्फे सभागृहामध्ये निवेदन करण्यात येईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 259 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यासंबंधी.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्याकडे नियम 259 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यासंबंधीची सूचना दिली आहे. या राज्यामध्ये एक फार मोठा गंभीर असा विषय गेल्या पाच-सहा दिवसांपासून चर्चिला जात आहे. त्यामुळे या विषयासंबंधी जनतेमध्ये संभ्रमाचे व भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अंडरवर्ल्ड छोटा राजन व त्याचा साथीदार डी.के. राव यांच्यातील पोलीसांनी रेकॉर्ड केलेलेल्या संभाषणातील गृहराज्यमंत्र्यांची असलेली धक्कादायक बातमी उजेडात आली आहे. या दोघांमध्ये जे संभाषण झाले त्यामध्ये गृह राज्यमंत्र्यांवर डायरेक्ट आरोप करण्यात आले आहेत. नाशिकच्या तुरुंगामध्ये छोटा राजनच्या प्रतीस्पर्धी टोळीतील ओ.पी.सिंग याचा खून करण्यात आला त्या संदर्भात 12 पोलीसांना त्यावेळी निलंबित करण्यात आले. त्या पोलीसांना पुन्हा कामावर घेण्यासाठी त्या बदल्यात मा. गृह राज्यमंत्र्यांना 5 लाख रुपये दिल्याचे छोटा राजन व डी.के. राव यांच्या संभाषणामधून निष्पन्न झाले. अशाप्रकारे या राज्याच्या मा. गृह राज्यमंत्र्यांनी 5 लाख रुपयांची लाच घेवून निलंबित करण्यात आलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्याचा निर्णय घेतला. हे सर्व टेपमध्ये असलेल्या संभाषणावरुन स्पष्ट झाले आहे. या बाबत मी स्वत: आरोपी करीत नसून ही टेप पोलीसांना सापडल्यानंतर त्यांनी ती न्यायालयामध्ये सादर केली आहे. आणि म्हणून या राज्याच्या गृह खात्यासंबंधी जनतेच्या मनामध्ये संभ्रमाची भावना निर्माण झाली आहे. ज्या गृह खात्यावर या राज्याच्या संरक्षणाची, कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी आहे त्या गृह खात्याचे मंत्री अशा पध्दतीने काम करावयास लागले तर मग राज्यातील कायदा व सुव्यवस्थेसंबंधी फार मोठे प्रश्नचिन्ह निर्माण होणार आहे.

सभापती महोदय, या राज्याचे हे मंत्रिमंडळ कसे चालले आहे? या मंत्रिमंडळातील दुसरे एक मंत्री मा. श्री. अनिस अहमद यांच्याबाबतीत काय बोलायचे? जे महाराष्ट्र सरकार महात्मा फुले, शाहू फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन गेली अनेक वर्षे कारभार चालवीत आहे. ज्या राज्यामध्ये फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्माला आले व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

ज्यांनी या महाराष्ट्रामध्ये फार मोठे काम केले आहे त्यांच्या या राज्यामध्ये मंत्रिमंडळातील एका मंत्र्यांकडून एका दलिताला जातीवाचक शिवीगाळ केली गेली त्या संदर्भात पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर करण्यात आला आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु...

गुन्हा रजिस्टर झाल्यानंतर जोपर्यनत त्या मंत्र्यांवर कारवाई होत नाही तो पर्यन्त हे राज्य पारदर्शक आहे, हे राज्य चांगल्या पध्दतीने चाललेले आहे, या राज्यात कायदा व सुव्यवस्था फार चांगली आहे असे म्हणणे बरोबर ठरणार नाही. म्हणून या राज्यातील जनतेचा संभ्रम दूर करण्यासाठी व गृह खात्याचा कारभार पारदर्शक ठेवण्यासाठी संबंधित मंत्र्यांवर कारवाई केली पाहिजे. मंत्री श्री.अनिस अहमद यांच्यावर जातीवाचक शिविगाळ केल्याबाबत ॲट्रॉसिटी ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे, तेव्हा या दोन्ही मंत्र्यांना तातडीने मंत्रिमंडळातून काढून टाकले पाहिजे, त्यांचा मंत्रीपदाचा राजिनामा घेतला पाहिजे अशा प्रकारची मागणी आहे. हा विषय गंभीर आहे म्हणून प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन या विषयावर चर्चा करणे अगत्याचे आहे. यासाठी मी चर्चेची नोटीस दिलेली आहे, त्यास आपण मान्यता द्यावी अशाप्रकारची आपल्याला मी विनंती करतो.

---

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी सदनासमोर जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्यानुसार आज प्रश्नोत्तराचा तास न घेता त्या प्रस्तावावर चर्चा करावी.

सभापती महोदय, हा विषय राज्याच्या दृष्टीने गंभीर आहे. दोन मंत्र्यांचा संबंध असलेले हे विषय आहेत. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये भ्रष्टाचारी मंत्र्यांना गृह खात्यावरील प्रश्नांना कदाचित उत्तर द्यावे लागले तर भ्रष्टाचारी मंत्री आपल्या प्रश्नाला उत्तर देतील काय ? अशाप्रकारचे संभ्रमाचे आणि संशयाचे वातावरण सदस्यांमध्ये निर्माण झालेले आहे. या संदर्भात कोणत्याही प्रकारचा खुलासा होत नाही, तोपर्यन्त या संबंधित मंत्र्यांना या सदनामध्ये बसू देऊ नये. त्यांनी सदस्यांच्या उप प्रश्नाला उत्तर देणे योग्य होणार नाही. कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात त्यांनी उत्तर दिले तर त्यांचे उत्तर अधिकृत आहे काय ? अशाप्रकारचा संभ्रम सदस्यांच्या मनामध्ये निर्माण होण्याची शक्यता आहे. प्रश्नोत्तराचा तास महत्वाचा नाही असे आम्ही म्हणत नाही. कारण सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याकरिता मेहनत घ्यावी लागते, प्रश्नाच्या माध्यमातून उत्तर शोधण्याचा ते प्रयत्न करत असतात. म्हणून प्रश्नोत्तराचा तासही महत्वाचा आहे. परंतु आता उपस्थित केलेला जो प्रश्न आहे तोही राज्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. सन्मानीय गृह राज्यमंत्र्यांच्या संबंधातील प्रकरण पोलिसांनी न्यायालयात दाखल केलेले आहे. या संदर्भाने खालच्या सभागृहामध्ये उत्तर देण्यात आले की, 'या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल'. पोलिसांनीच एफआयआर दाखल केलेला आहे. ही शासनाच्या दृष्टीने गंभीर अशाप्रकारची बाब आहे. पोलिसांनी केलेली चौकशी योग्य की अयोग्य, ? हे पहाणे गृह खात्याचे काम आहे. परंतु सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. हा संभ्रम दूर करावयाचा असेल तर या सदनामध्ये या विषयावर चर्चा घडवून आणणे आवश्यक आहे.

तसेच सन्माननीय मंत्री श्री.अनिस अहमद यांच्याही विरुध्द ॲट्रॉसिटी ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल केला गेलेला आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, महात्मा फुले, शाहु महाराज, परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची नावे घेऊन शासन राज्य करत आहे, या राज्यामध्ये त्यांच्या शिकवणुकीच्या बाहेर जाऊन ज्या घटना घडलेल्या आहेत, त्या संदर्भात शासन कोणत्याही प्रकारची कारवाई करत नाही, चौकशीच्या नावाने प्रकरण रेटून पुढे जाण्याचा प्रयत्न करणे बरोबर नाही. या संदर्भाने चर्चा करण्याची संधी मिळावी म्हणून माझी विनंती आहे की, विरोधी पक्ष नेत्यांनी केलेल्या सूचनेचा विचार करुन चर्चेला अनुमती द्यावी. धन्यवाद. (यानंतर श्री.बरवड....

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या विषयामध्ये गृह विभागाने घेतलेली भूमिका अतिशय स्पष्ट आहे. मी माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांचे विशेषरुपाने अभिनंदन करतो की, याबाबतीमधील पुरावे त्यांच्या खात्याच्या राज्यमंत्र्यांच्या विरोधात असतानाही त्यांनी गृह विभागाला आदेश दिले आणि हे सर्व पुरावे कोर्टासमोर येऊ दिले. ही त्यांची कार्यवाही अतिशय नि:पक्षपातीपणाची आणि अतिशय अभिनंदनीय आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. सभापती महोदय, मुळामध्ये या विषयावर चौकशीचा प्रश्नच उद्भवत नाही. कारण काय घडलेले आहे, कोणाच्या विरुध्द घडलेले आहे याचे पुरावे गृह विभागाने सादर केलेले आहेत. गृह विभाग हा महाराष्ट्र सरकारचा आहे. उद्या जर नितीन गडकरी यांनी आरोप केला, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी आरोप केला, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी आरोप केला, विरोधी पक्षाच्या इतर सन्माननीय सदस्यांनी आरोप केला तर गोष्ट वेगळी आहे. या प्रकरणामध्ये आपल्या राज्यमंत्र्यांच्या विरोधात काय घडलेले आहे याचे पुरावे राज्य सरकारनेच सादर केलेले आहेत. राज्य सरकार खोटे बोलले असे आपण म्हणू शकतो काय ? सन्माननीय उपमुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखालील गृह विभाग खोटे बोलू शकतो असे आपण म्हणू शकतो काय ? आपण तसे म्हणू शकत नाही. त्यांनी परखडपणे, निप:क्षपातीपणे, राज्यमंत्र्यांबद्दल कोणतीही प्रेमाची भावना न ठेवता हे स्पष्ट केलेले आहे. राज्यमंत्र्यांनी सांगितले की, मला बदल्या करण्याचा अधिकार नाही. मी पुन्हा माननीय गृहमंत्र्यांचे अभिनंदन करीन की, त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, मी राज्यमंत्र्यांना बदल्या करण्याचे अधिकार दिलेले आहेत आणि त्या अधिकाराप्रमाणे त्यांनी बदल्या केलेल्या आहेत. माननीय गृहमंत्र्यांनी कोणताही पडदा न ठेवता अतिशय सुस्पष्ट, ट्रान्स्परंट भूमिका घेतलेली आहे. यामध्ये काय चौकशी होणार ? हे सगळे स्वयंस्पष्ट आहे. या व्यक्तीचा संबंध अंडरवर्ल्डशी आहे यामध्ये राज्य सरकार कंव्हीन्स आहे. याबाबतीत गृह विभाग कंव्हीन्स आहे. माननीय उपमुख्यमंत्री कंव्हीन्स आहेत. ते कंव्हीन्स झाल्यानंतर कोर्टासमोर पुरावे दिलेले आहेत. गृह विभागाचे पुरावे बरोबर नाहीत असे म्हणणे म्हणजे एकप्रकारे गृह विभागवर आरोप करण्यासारखे होईल. म्हणून यातील वस्तुस्थिती लक्षात घेता माननीय उपमुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, आपण याबाबतीत परखड भूमिक घेण्याची आवश्यकता आहे. जे प्रूव्ह झालेले आहे ते



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

महाराष्ट्राला निश्चितपणे अभिमानास्पद नाही. आपण याबाबतीत कोणतेही समर्थन करु शकत नाही. मला अशी विनंती करावयाची आहे की, यासंदर्भात सन्माननीय गृह राज्यमंत्री यांच्या बाबतीत शासनाने ताबडतोब निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. त्यांना या पदावरुन काढून टाकावे. त्यांना एक मिनिटही या पदावर राहण्याचा अधिकार नाही. महाराष्ट्राच्या दृष्टीने ते योग्य नाही. महाराष्ट्राचा लौकिक आणि सन्मान वाढावा म्हणून सरकारने याबाबतीत ताबडतोब कारवाई करावी अन्यथा सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी म्हटल्याप्रमाणे उद्या आम्ही प्रश्न विचारणार आणि आम्हाला उत्तर देणारे मंत्री यांचे सबंध आणि हे सगळे पाहिल्यानंतर आम्ही मुद्दाम चहापाण्यासाठी गेलो नाही. माननीय मंत्रिमहोदयाचे संबंध अंडरवर्ल्डशी असतील तर सरकारचा चहापान घ्यावयाचा काय ? हा चहा कोणाच्या पैशाचा आहे ? म्हणून माझी विनंती आहे की, यासंबंधात सरकारने ताबडतोब निवेदन करुन त्यांना काढून टाकण्याची गरज आहे. हे आवश्यक आहे. या सभागृहामध्ये माननीय गृहमंत्री उपस्थित आहेत. त्यांनी स्वत: याबाबतीत स्पष्ट केलेले आहे. त्यांनी या ठिकाणी हा निर्णय घोषित करुन टाकावा, सरकारची भूमिका स्पष्ट करावी. सभापती महोदय, मेहरबानी करुन त्यांना योग्य प्रकारे याचा खुलासा करण्याचे आदेश आपण द्यावेत अशी विनंती करतो.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, सरकारच्या ताब्यामध्ये असलेला श्री. राव हा आरोपी छोटा राजनशी बोलत आहे आणि त्यांचा जो संपर्क आहे त्यामध्ये अनेक ॲक्टीव्हीटीजमध्ये ज्यांचा सहभाग आहे त्यांच्याशी सातत्याने बोलणे होते, त्याचे पुरावे पोलिसांमार्फत कोर्टामध्ये देण्यात आलेले आहेत. जी टेप करण्यात आली होती ती कोर्टाला सादर करण्यात आली आहे. एका आरोपीने दुसऱ्या आरोपीबद्दल किंवा वॉंटेड माणसांबरोबर ज्या कोणाची नावे घेतलेली आहेत त्यामध्ये माननीय राज्यमंत्र्यांचे नाव आहे आणि ते एका संदर्भात आहे. ते नाव कोणत्या संदर्भात घेतले हे पाहणे आवश्यक आहे. उद्या एक आरोपी दुसऱ्या आरोपीबद्दल बोलताना देशातील मोठमोठ्या नेत्यांची नावे घेत राहिला, न्यायाधीशांची नावे घेत राहिला तर त्याचा रेफरन्स काय आहे ? कोणत्या परिस्थितीत ते नाव घेण्यात आले ? सभापती महोदय, हे सगळे तपासावे लागेल.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील पुढे सुरु...)

तुरुंगातील जे 11 लोक सस्पेण्ड करण्यात आले त्यातील 2 लोकांना मॅटच्या आदेशाप्रमाणे पूर्ववत कामावर घेतलेले आहे. जेव्हा मॅटचा आदेश एखाद्या कर्मचा-याला लागू होतो त्यावेळी शासनाची प्रस्थापित पध्दत अशी आहे की, एका केसमध्ये जो निर्णय केलेला असेल तो निर्णय तशाच प्रकारच्या दुस-या केसलाही लागू केलेला आहे. या सर्व घटनेची चौकशी मी आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी करु असे सांगितलेले आहे. कोणीही दोषी असला तरी त्याला पाठिशी घातले जाणार नाही अशी स्पष्ट भूमिका माननीय मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केलेली आहे. कोणत्या तरी तिस-या आरोपीने चौथ्या आरोपीबद्दल बोलताना कोणाचे तरी नाव घेतले म्हणून एखाद्याला तातडीने आरोपीच्या पिंज-यात उभे करणे हे अन्यायकारक ठरेल. कोणावरही अन्याय होउ नये ही सरकारची भूमिका आहे. आपण सरकारच्या भूमिकेवर विश्वास ठेवावा. या घटनेसंबंधी आम्ही हे अधिवेशन संपण्यापूर्वी सदनामध्ये निवेदन करु. या सदनाचे कामकाज नियमाप्रमाणे चालते. त्यासाठी नियम पुस्तिकाही तयार केलेली आहे. माननीय सदस्यांना 30 दिवस आधी तारांकित प्रश्न विचारता येतात. अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस नाही. जी वस्तुस्थिती असेल ती आम्ही राज्यातील तमाम जनतेसमोर ठेवू. कोणाला पाठिशी घालण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही. नियमाप्रमाणे कामकाज करायला विरोधी पक्षाच्या माननीय सदस्यांनी सहकार्य करावे..

श्री. दिवाकर रावते : मंत्री महोदय श्री. अनिस अहमद यांच्याबद्दल शासनाची काय भूमिका आहे ?

श्री. आर.आर.पाटील : श्री. अनिस अहमद यांच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, ते एक मंत्री असताना सुध्दा पोलीस त्यांच्याबाबतचा एफआयआर नोंदवून घेत आहेत. यावरुनच या शासनाचा कारभार किती पारदर्शी आहे हे आपणास दिसून येते. माननीय सदस्य श्री. गडकरी यांनी या शासनाचे पारदर्शी कारभाराबाबत जे अभिनंदन केले त्यामध्ये तथ्य आहे. आज महाराष्ट्राचा कारभार तसाच सुरु आहे. आताच मला मिळालेल्या माहितीप्रमाणे श्री. अनिस अहमद यांच्या बाबतीतील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. कोर्टाने अरेस्ट करु नये, चौकशी करा असे सांगितल्याची माहिती आहे. आम्ही या प्रकरणी माहिती घेत आहोत. पूर्ण माहिती न घेता चर्चा करणे योग्य ठरणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय गृहमंत्र्यांनी सभागृहाला असे सांगितले की, अधिवेशन संपण्याच्या आत या प्रकरणी निवेदन करण्यात येईल. सभापती महोदय, अधिवेशन संपायला अजून दीड महिन्याचा अवधी आहे. मग हा विषय दीड महिना हे शासन असाच ठेवणार आहे काय ? दीड महिना या राज्यामध्ये संशयाचे वातवावरण राहाणार आहे काय ? या प्रकरणी निर्णय घेण्यासाठी दीड महिन्याचा अवधी कशासाठी पाहिजे ? पोलीस विभागाने न्यायालयाला टेप सादर केलेली आहे. असे असताना आणखी कोणती चौकशी शासन करणार आहे ? ही केस स्वयंस्पष्ट असतना त्याबाबतीत 5-6 आठवडे लागण्याची आवश्यकता नाही.

सभापती महोदय, दुसरा विषय असा आहे की, या राज्यातील एखाद्या सर्वसामान्य माणसाला जर जातिवाचक शिव्या दिल्या तर पोलीस 5 मिनिटांचाही विलंब न लावता आरोपीला पकडतात आणि त्याच्यावर गुन्हा रजिस्टर केला जातो, त्याला जेलमध्ये टाकले जाते. माननीय मंत्री महोदय श्री. अनिस अहमद यांनी ॲट्रॉसिटीजचा गुन्हा केलेला आहे. असे असताना त्यांना न पकडता त्यांना पोलिसांनी न्यायालयात जाण्याची संधी दिली. माननीय गृहमंत्र्यांनी हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे असे सांगितले. मुद्दा एवढाच आहे की, मंत्र्यांनी ॲट्रॉसिटी ॲक्टखाली गुन्हा केलेला आहे. ॲट्रॉसिटीच्या गुन्ह्याबाबत डीवायएसपी लेव्हलवर चौकशी झाल्यानंतर गुन्हा रजिस्टर होतो. आता मंत्री महोदयांना न्यायालयात जाण्याची संधी दिल्यामुळे न्यायालयाने त्यांना अटक करु नये असे निर्देश दिले आहेत. जो मंत्री दलितांना शिव्या देतो अशा मंत्र्याला हे शासन मंत्रिमंडळामध्ये ठेवणार आहे काय ? दलितांना शिव्या देणारा मंत्री मंत्रिमंडळामध्ये राहिला तर या मंत्रिमंडळाला महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेण्याचा अधिकार राहाणार नाही. गृहराज्यमंत्र्यांची केस वेगळी आहे आणि श्री. अनिस अहमद यांची केस वेगळी आहे. म्हणून ज्या मंत्र्यांनी दलितांना शिव्या दिलेल्या आहेत आणि ज्यांच्या विरुध्द गुन्हा रजिस्टर झालेला आहे अशा मंत्र्यांना ताबडतोबीने मंत्रिमंडळातून काढणार आहात काय ?

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : माननीय सभापती महोदय, आता सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सभागृहासमोर जे निवेदन केले ते सभागृहाची दिशाभूल करणारे आहे. श्री. अण्णा हजारे यांनी अशाच प्रकारचे आरोप श्री. सुरेश जैन आणि श्री. नवाब मलिक या दोन मंत्र्यांवर केले होते आणि नंतर या दोन मंत्र्यांना मंत्रिमंडळातून काढून टाकण्यात आले होते. आता त्यांना क्लीन चीट मिळाली असली तरी सुध्दा मंत्रिमंडळात परत घेतले जात नाही. तसेच श्री. छगन भुजबळ यांच्यावर सुध्दा यापूर्वी उपमुख्यमंत्री असताना राजीनामा देण्याची पाळी आली होती. त्यांना तर कुठेच दोषी ठरविले नव्हते तरी त्यांना मंत्रिमंडळातून जावे लागले होते. सभागृहाच्या नेत्यांनी सांगितले होते की, मंत्रिमंडळामध्ये असे संशयास्पद चेहरे आम्ही ठेवणार नाही. या केसमध्ये तर आपल्याच गृहखात्याने एफआयआर दाखल केला असताना सुध्दा मंत्री महोदयांना मंत्रिमंडळात ठेवले आहे. सन्माननीय मुख्यमंत्री म्हणाले होते की, गृहमंत्री हे उपमुख्यमंत्री असले तरी त्या खात्याचा निर्णय घेण्याचा मलाही अधिकार आहे. सभापती महोदय, या सदनामध्ये उद्या जर मंत्री म्हणून श्री. अनिस अहमद बोलायला उभे राहिले तर आम्ही त्यांना का बोलू द्यावयाचे ? ते एकदा म्हणाले होते की, कै. यशवंतराव चव्हाण हे कोण ? हा किस्सा झाल्यानंतर सुध्दा त्यांची मुजोरी एवढी वाढली आहे की आपण काहीही बोललो तरी काही कारवाई होत नाही हे त्यांना माहीत झाले आहे. मला आश्चर्य वाटते की प्रा. जोगेंद्र कवाडे या विषयावर उठून बोलत का नाहीत ? श्री. रामदास आठवले हे काहीच का करीत नाहीत ? या शासनातील एक मंत्री दलितांना उघडपणे शिव्या देतो आणि त्यांच्याच पक्षातील आमदाराच्या पी.ए.ने नोंदविलेली ही तक्रार आहे. हे मंत्री आजमितीला दोषी आहेत किंवा नाहीत हे ठरायचे आहे. परंतु मंत्रिमंडळातील दोन मंत्र्यांवर चिखलफेक झालेली आहे. वर्तमानपत्राच्या माध्यमातून सुध्दा जनतेचा कौल घेतला गेला आहे आणि जनतेने त्यांना दोषी ठरविले आहे. दोष सिध्द होइपर्यंत आणि जनतेच्या भावनांची कदर करुन या संदर्भात शासनाने तात्काळ निर्णय घ्यावा. हे मंत्री सत्तेमध्ये असल्यामुळे त्यांच्याविरुध्द चौकशी कशी होणार हाही एक प्रश्न आहे. म्हणून आमची विनंती आहे की, या विषयाबाबत शासनाने त्वरीत निर्णय घ्यावा.

**सभापती** : विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सदनामध्ये नियम 289 खाली प्रस्ताव दिला आणि या प्रस्तावाच्या अनुषंगाने सर्वश्री पांडुरंग फुंडकर,नितीनजी गडकरी,मधुकर सरपोतदार आणि दिवाकर रावते यांनी आपापले विचार मांडले. त्याचप्रमाणे उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**

यांनी या विषयाबाबत शासनाची भूमिका विषद केली. याठिकाणी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिला आहे तो मी स्वीकारु शकत नाही. या सदनाचे नेते यांनी सांगितले की, या विषयाबाबत येत्या दीड महिन्यात अहवाल सादर केला जाईल. त्यापेक्षा मला वाटते या विषयावर लवकरात लवकर म्हणजे 15 दिवसांच्या आत दोन्ही प्रकरणांबाबत चौकशी करुन शासनाने आपली भूमिका मांडण्याचा प्रयत्न करावा.

आता प्रश्नोत्तरे सुरु करु या.

---

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एमदम बोलत असतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. आता मी प्रश्न क्र. 12746 पुकारतो.

**तोंडी उत्तरे**

**तारांकित प्रश्न क्रमांक : 12746**

( सन्माननीय सदस्यांनी उपप्रश्न विचारले नाहीत. )

---

**तारांकित प्रश्न क्रमांक - 14470**

( सन्माननीय सदस्यांनी उपप्रश्न विचारले नाहीत. )

---

श्री. आर.आर.पाटील : महोदय, माननीय मंत्री महोदय श्री. अनिस अहमद यांच्या संदर्भात मी सभागृहाला अशी माहिती देऊ इच्छितो की या प्रकरणाबाबतची संपूर्ण माहिती घेऊन आजची सभागृहाची बैठक संपण्यापूर्वी सभागहाला माहिती देण्यात येईल.

**सभापती** : मी यासंबंधी रुलींग देतांना माननीय मंत्री महोदयांना असे निदेश दिले की यासंबंधीची चौकशी करुन येत्या 15 दिवसात सदनाला अहवाल सादर करावा.

श्री. आर.आर.पाटील : मी अगोदर माझ्या निवेदनात जरी दीड महिना किंवा अधिवेशन संपेपर्यंत म्हणालो तरी एवढा कालावधी लागणार नाही, लवकरात लवकर यासंबंधीची माहिती सदनासमोर ठेवण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : महोदय, माननीय गृह राज्यमंत्र्यांच्या बाबतीत संशयाचे वातावरण आहे तोपर्यंत त्यांनी या सभागृहामध्ये विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देऊ नयेत अथवा सभागृहाच्या कोणत्याही कामकाजामध्ये भाग घेण्यासाठी त्यांना मनाई करावी, अशी आमची विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय श्री. अनिस अहमद हे उच्च न्यायालयात गेले व त्याद्वारे त्यांना अटक करु नये असे उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. एखादया मंत्र्यावर गुन्हा रजिस्टर्ड होणे, त्याला अटक न करणे हा भाग वेगळा आहे. पण या ठिकाणी एका मंत्र्याने दलित व्यक्तीला शिव्या दिल्याचे सिध्द झालेले असून त्यासंदर्भात पोलिसात गुन्हाही दाखल झालेला आहे, एफआयआर दाखल झाला आहे अशा मंत्र्यांना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

मंत्रिमंडळातून ताबडतोबीने काढून टाकले पाहिजे, त्यांचा राजीनामा मागितला पाहिजे व त्यांना अटक केली पाहिजे. आम्ही या ठिकाणी कोर्टाचा मुद्दा काढलाच नाही. कोर्टाने त्यांच्या कारवाईवर स्टे दिलेला आहे. म्हणून ज्यांच्यावर गुन्हा रजिस्टर्ड झालेला आहे अशा डागी मंत्र्यांना मंत्रिमंडळामध्ये ठेवण्यात येऊ नये एवढीच आमची मागणी आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया सभागृहात शांतता ठेवावी. मी कामकाज पत्रिकेवरील प्रश्न क्र. 3 पुकारत आहे.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सभासद बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**<u>तारांकित प्रश्न क्रमांक - 12763</u>**

( सन्माननीय सदस्यांनी उपप्रश्न विचारले नाहीत. )

---

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, सभागृहाला माननीय उपमुख्यमंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार अधिवेशनाच्या शेवटी या प्रश्नाचे उत्तर मिळणार आहे. परंतु दरम्यानच्या काळात आम्हाला उत्तरे अशाच मंत्र्यांकडून दिली जाणार आहेत, अशाच मंत्र्यांकडून धोरणात्मक निर्णय देखील जाहीर होणार आहेत व हे चुकीचे आहे. म्हणून आमची मागणी अशी आहे की, निदान या अधिवेशनामध्ये तरी या मंत्र्यांना कामकाजामध्ये सहभाग घेण्याची मुभा देऊ नये.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, कुठल्या तरी एखादया आरोपीने दुसऱ्या एखादया आरोपीबद्दल बोलतांना त्याचा रेफरन्स काय आहे हे न पाहता त्या आरोपीच्या बोलण्यावर विश्वास ठेवून एखादया मंत्र्याला प्रतिबंध करणे अथवा त्या मंत्र्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे हे योग्य नाही, असे मला वाटते.

श्री. नितीन गडकरी : महोदय, अशी परिस्थिती असेल तर मग कोर्टात जी कॅसेट सादर केलेली आहे त्याची शहानिशा न करताच ती कोर्टात दाखल केली आहे काय ? एफआयआर का दाखल करण्यात आलेला आहे ? याचे स्पष्टीकरण करावे.

.....3

अशोधित प्रत / शोधनेसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : मंत्र्यांवर कुठेही एफआयआर दाखल केलेला नाही. तसा कुठलाही पुरावा आढळून आलेला नाही. श्री. राव नांवाच्या गुन्हेगाराचे छोटा राजनबद्दल बोलणे असलेली टेप आम्ही कोर्टात सादर करीत आहोत, ते बोलणे कोणत्या संदर्भात आहे व ते खरे की खोटे आहे यासंबंधीची लवकरात लवकर चौकशी करण्यात येईल व सभागृहाला माहिती दिली जाईल.

श्री. नितीन गडकरी : महोदय, या कॅसेटमध्ये काय आहे हे न पाहता, त्याची शहानिशा न करताच कोर्टात कॅसेट कशी दाखल केली जाते ? कुठलीही चौकशी न करता कॅसेट कोर्टात का सबमिट केली ?

श्री. आर.आर.पाटील : राव नांवाचा आरोपी छोटा राजनबद्दल बोलला त्यासंदर्भातील कॅसेट कोर्टात सबमिट केली असून त्यामध्ये जे बोलले आहे ते कोणत्या प्रसंगात बोलले, ज्यांच्याबद्दल बोलले ते खरे की नाही याची चौकशी झाल्याशिवाय कोणालाही आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे योग्य होणार नाही.

श्री. नितीन गडकरी : अशा प्रकारे तपासणी न करताच कोर्टात कॅसेट दाखल का केली ? असे करुन आपल्याला माननीय गृह राज्यमंत्री श्री. सिध्दाराम म्हेत्रे यांना बदनाम करावयाचे होते काय ? राष्ट्रवादी आणि काँग्रेसमधील हे प्रकरण आहे काय ?

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी

सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. श्री.डी.के.राव या आरोपीच्या टेप प्रकरणाची पूर्ण चौकशी न करता संभाषणाची टेप न्यायालयाला सादर केली असेल तर सन्माननीय गृह राज्यमंत्री श्री.सिध्दाराम म्हेत्रे यांची बदनामी केल्यासारखे आहे. गृह विभागाने न्यायालयाला संभाषणाची टेप चौकशी न करता सादर का केली ? काँग्रेस पक्षाला वाली नाही म्हणून राष्ट्रवादीने असे तर केले नाही ना ? पण आता श्री.नारायण राणे साहेब हे काँग्रेस पक्षात गेल्यामुळे त्या पक्षाला वाली मिळालेला आहे. तेव्हा या प्रकरणातील नेमके खरे काय आहे ते शासनाने सांगणे आवश्यक आहे. एका आरोपीने केलेले वक्तव्य खरे आहे किंवा खोटे आहे हे तपासून पहावे लागेल, असे आर्ग्युमेंट माननीय गृह मंत्र्यांनी केले आहे ते मला मान्य आहे. परंतु, सन्माननीय गृहराज्य मंत्री श्री.सिध्दराम म्हेत्रे सारख्या व्यक्तिबद्दल कोणत्याही प्रकारे तपासणी न करता, शहानिशा न करता, पुरावे न बघता घिसाडघाईने काहीही करू नये. सन्माननीय गृह राज्यमंत्री श्री.सिध्दाराम म्हेत्रे हे काँग्रेसचे असल्याने त्यांची बदनामी राष्ट्रवादीने बदला घेण्यासाठी केली आहे असे वाटते. शासन एका राज्यमंत्र्याला चौकशी न करता बदनाम का करीत आहे ? असा माझा हरकतीचा मुद्दा आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी म्हणालो ते खरे आहे. श्री.डी.के.राव व श्री.छोटा राजन यांच्या दूरध्वनीवरील संभाषणाची टेप कोर्टाला सादर करण्यात आलेली आहे हे खरे आहे. पण त्यातील सन्माननीय गृह राज्यमंत्री श्री.सिध्दाराम म्हेत्रे यांच्या नावाचा जो उल्लेख करण्यात आलेला आहे, ती बाब पोलिसांनी तपासलेली नाही. श्री.डी.के.राव हा श्री.छोटा राजन याच्याशी सातत्याने दूरध्वनीवरून संपर्क साधायचा एवढेच यातील सत्य आहे.

Shri Nitin Gadkari: Sir, now, the matter is submitted to the Court. Then it is a clear cut indication that this is a policy or a decision taken by the Government in that case. Sir, when any matter is submitted by the Government to the Judge, Court or Judiciary, it means that there an official directive given by the Government to that case. Is it true?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : श्री.छोटा राजन याच्याशी श्री.डी.के.राव दूरध्वनीवरून बोलला हे सिध्द करण्यासाठी ती कॅसेट न्यायालयाला सादर करण्यात आली आहे. कॅसेटमधील बोललेले प्रत्येक वाक्य, संदर्भ खरे आहे किंवा नाही याची चौकशी झालेली नाही. पण कोर्टाला सादर केलेली टेप खरी आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, श्री.छोटा राजन व श्री.डी.के.राव या दोघांच्या संभाषणाच्या कॅसेटची तपासणी न करता, चौकशी न करता ती पुरावा म्हणून कोर्टाला सादर करण्यात आलेली आहे. यात तथ्य आहे किंवा नाही याची माहिती गृह विभागाला नाही. खरे म्हणजे गृह विभागाची तपासणी करण्याची भूमिका असली पाहिजे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य येथे श्री.डी.के.राव यांची बाजू घेत आहेत. त्याची तशी बाजू घेण्याची आवश्यकता नाही. श्री.डी.के.राव व श्री.छोटा राजन हे एकमेकांशी दूरध्वनीवरून बोलले याबाबत पोलिसांची खात्री आहे. परंतु, जे बोलणे आहे त्याबद्दल चौकशी झालेली नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, याचा अर्थ असा निघतो की, कॅसेटमधील दोन वाक्य बरोबर आहेत आणि दोन वाक्ये चुकीची आहे. यामुळे श्री.डी.के.राव कदाचित कोर्टामधून सुटूसुध्दा शकेल.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे चालावे असे मला वाटत नाही. श्री.राव काय बोलला व अन्य कोणी काय बोलले हे मला महत्त्वाचे वाटत नाही.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रमोद नवलकर....

त्यापेक्षा या बातम्या आल्यानंतर जनता काय बोलते हे महत्वाचे आहे. जनता विचारत आहे की, 11 लोकांना परत कामावर घेणे कठीण आहे. परंतु माननीय मंत्री महोदयांनी फक्त पाच लाख रुपये मागितले आहे. सर्वांनाच माहीत आहे की, श्री.आर.आर.पाटीलसाहेब स्वच्छ प्रतिमेचे आहेत. परंतु त्यांना देखिल त्यामध्ये गोवण्यात आले आहे. त्यामुळे माननीय गृह मंत्री महोदयांनी हे प्रकरण गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. परंतु एखाद्या मंत्र्यांवर आरोप असताना, सभागृहामध्ये ते दागी मंत्री धोरणात्मक निर्णय जाहीर करणार काय ? चौकशीनंतर जर ते दोषी आढळले तर दरम्यानच्या काळात त्यांनी सभागृहामध्ये जे निर्णय घेतले किंवा उत्तरे दिलीत तर ते योग्य होणार नाही. म्हणून यासंदर्भातील निर्णय होण्यापूर्वी विधान परिषदेच्या कामकाजामध्ये भाग घेण्यासाठी दागी मंत्र्याला मनाई करावी. त्यांना शेवटच्या बाकावर बसू द्यावे, परंतु कामकाजामध्ये भाग घेऊ देऊ नये.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी हरकतीच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा आहे. सभागृहाचे नेते हे राज्याचे गृहमंत्री आहेत. मी त्यांना विचारु इच्छितो की, डी.के.राव हा तुमच्याच ताब्यात आहे आणि त्याने जेलमधून संभाषण केले आहे हेही तुम्हीच सांगत आहात. हीच तुमच्या जेलची सिक्युरिटी आहे काय ? असे जर असेल तर माझ्या मते जेलमधून कोणीही फोन करु शकतो. जेलमधून झालेल्या संभाषणाच्या खात्रीबाबत आपण सांगत आहात. आपण या ठिकाणी सांगत आहात की, या प्रकरणी चौकशी करावयाची आहे. परंतु कोर्टामध्ये आपणच ती कॅसेट दाखल केलेली आहे. मग आघाडी सरकारमधील पक्षाच्या एका मंत्र्याला बदनाम करण्यासाठी हा डावपेच टाकला आहे काय ? असा पेच आपल्या वक्तव्यातून निर्माण होत आहे. शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या सावकारांवर कारवाई केली जाईल, लेडिज बार ताबडतोब बंद केले जातील अशा प्रकारच्या आपण घोषणा करता. मग या प्रकरणामध्ये आपण मागे का हटत आहात ? आपण या सदनाचे नेते आहात. त्यामुळे आपण दोन-चार दिवसांत या संदर्भातील नेमकी वस्तुस्थिती सांगतो असे सांगावयास हवे. परंतु या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी आपल्याला पाच आठवडयांचा कालावधी का लागतो हेच मला समजत नाही. सन्माननीय गृह राज्यमंत्री श्री.सिध्दाराम म्हेत्रे दोषी आहेत असे आमचे म्हणणे नाही. परंतु ते दोषी आहेत असे वातावरण

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

निर्माण झाले आहे. त्यामुळे सभागृह चालू असतना जर न्याय मिळत नसेल तर सदनामध्ये चर्चा कशासाठी आणि का म्हणून करावयाची ? असा प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे या प्रकरणी आपण योग्य निर्देश द्यावेत अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये हरकतीच्या मुद्यांना मी कधीच परवानगी देत नाही. परंतु अपवाद म्हणून सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रमोद नवलकर आणि नितीन गडकरी यांना परवानगी दिली. परंतु याचा अर्थ सर्वांनीच याचा आधार घ्यावा असे नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जे प्रश्न उपस्थित केले त्यातील काही प्रश्नांची उत्तरे देणे मला संयुक्ति वाटते. डी.के.राव हा तुरुंगात असताना तो छोटा राजनशी बोलतो आहे हे क्राईम ब्रँचच्या निदर्शनास आले. एखाद्या तुरुंगात एक माणूस सडका असू शकतो, परंतु ती नेमकी कोणती व्यक्ती आहे याचा शोध लावणारे मुंबई पोलीस आहेत. राव आणि छोटा राजन यांच्यामध्ये झालेल्या संभाषणाचा पुरावा म्हणून कोर्टामध्ये टेप दिली गेली आहे. राव आणि छोटा राजन एकमेकांच्या संपर्कात होते. त्या दोघांमध्ये जो संवाद झाला तो अनेक गोष्टींच्या संदर्भात झालेला आहे. त्यातील प्रत्येक कंटेन्ट खरा आहे की नाही हे तपासून पाहिले पाहिजे. ते कोणी संत नव्हेत की, त्यांनी नाव घेतले म्हणून मंत्री महोदयांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करावे लागेल.

श्री.नितीन गडकरी : मग गृह राज्यमंत्री श्री.सिध्दाराम म्हेत्रे यांना बळीचा बकरा का केले ?

श्री.आर.आर.पाटील : डी.के.राव आणि छोटा राजन या दोघांचे भाषण आहें. डी.के.राव छोटा राजनच्या संपर्कात आहे काय हे पाहण्यासाठी ती कॅसेट कोर्टामध्ये द्यावी लागली.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

सभापती महोदय, तो सुटू नये, राव छोटा राजनच्या संपर्कात आहे तसेच हा राव तुरुंगातून छोटा राजनशी बोलतो आहे हे प्रुव्ह करण्याकरिता त्या कॅसेटची गरज होती. यामध्ये कोणालाही पाठीशी घालण्यात आलेले नाही. तो जे काही बोलला, त्याचा देखील तपास करण्यात येईल. कोर्टामध्ये पूर्ण टेप दिली आहे. तो छोटा राजनशी बोलतो, तो त्याच्या संपर्कात आहे, एवढ्या बाबीसंदर्भातच त्या कॅसेटचा उपयोग होईल. या प्रकरणामध्ये तो दोषी आहे की नाही हे तपासात सिध्द होईल. दुसरी गोष्ट म्हणजे " सदरच्या अर्जावरील निर्णय होईपर्यंत श्री. अनिस अहमद यांना अटक करण्यात येऊ नये, पुढील तपास स्थगित ठेवण्यात यावा ", असे माननीय कोर्टाने अंतरिम आदेश दिलेले आहेत. सभापती महोदय, ही बाब न्यायप्रविष्ठ आहे. न्यायप्रविष्ठ असलेली कोणतीही बाब महाराष्ट्रातच नव्हेतर देशात कुठल्याही सभागृहात उपस्थित करु नये, असे निदेश दिलेले आहेत. एका केसमध्ये तपास पूर्ण नाही आणि एक केस न्यायप्रविष्ठ आसल्याने त्यास स्थगिती दिलेली आहे. कुठलीही बाब पूर्ण होईपर्यंत ....

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

**सभापती** : माननीय उप मुख्यमंत्रिमहोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे मग सन्माननीय सदस्यांनी बोलावे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी आपल्याला कोर्टाच्या सदर निर्णयाचा शेवटचा परिच्छेद वाचून दाखवितो. " सदर प्रकरणी माननीय कोर्टाने सादर केलेल्या अर्जावरील सुनावणी पूर्ण होईपर्यंत श्री. अनिस अहमद यांना अटक करु नये ", असे अंतरिम आदेश दिलेले आहेत. सदर अर्जावरील पुढील सुनावणी तारीख 27.3.2006 रोजी नेमलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या प्रकरणा विरोधात जिल्हाधिकारी व एस.डी.ओ. यांनी बयाण दिले आहे. श्री. अनिस अहमद यांच्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला आहे. सभापती महोदय, सन्माननीय आमदार श्री. नितीन राऊत यांच्या संदर्भातील प्रकरण माझ्या चेंबरमध्ये झाले. तेथे सन्माननीय आमदार श्री. नितीन राऊत यांच्या पी.ए. ना माननीय मंत्रीमहोदय श्री. अनिस अहमद यांनी जातीवाचक शिव्या दिल्या नाहीत, असे बयाण जिल्हाधिकारी व

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एस.डी.ओ. यांनी लेखी दिलेले आहे. मग यामध्ये प्रश्न असा उपस्थित होतो की, श्री. अनिस अहमद हे देखील अल्पसंख्यांक आहेत. त्यांनी शिव्या दिल्या नसताना त्यांच्याविरुध्द एफ.आय.आर का दर्ज आहे ? आपण एका बाजुने तबला व एका बाजुने ढोल वाजवत आहात.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य महोदय एका बाजूने दलितांसंबंधी बोलत आहेत तर एका बाजूने अल्पसंख्यांकाविषयी बोलत आहेत. तरी, सन्माननीय सदस्यांना काय म्हणावयाचे आहे हे समजत नसल्याने आपण सभागृह दहा मिनिटे स्थगित करावे.

श्री. नितीन गडकरी : हे आम्ही बोलत नाही. आपण जे बोलत आहात, त्यावरच मी आपल्याला हे सांगत आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, माझ्याकडे यासंबंधीचे स्टेटस आहेत. एफ.आय.आर. जर चुकीचा नोंदविण्यात आला असेल तर कितीही वरिष्ठ अधिकारी असो त्याची चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

**सभापती** : ही चर्चा आता मी येथेच थांबवितो. सन्माननीय सदस्य सर्वश्री. प्रमोद नवलकर, नितीन गडकरी यांनी जे दोन हरकतीचे मुद्दे उपस्थित केले, त्या संदर्भात मी माननीय उपमुख्यमंत्री यांना सुचना करीन की, हे प्रकरण फार गंभीर आहे. या अनुषंगाने ही चौकशी करावयाची आहे. तरी, आपण पहिल्या प्रकरणाची चौकशी 10 दिवसांत पूर्ण करावी. आपण या सभागृहाचे नेते आहात आणि या ठिकाणी दिलेल्या सूचना किंवा निदेश शासनास बंधनकारक आहेत.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणी माननीय मुख्यमंत्री जातीने पाहणार आहेत.

**सभापती** : सभागृहात दिलेले निदेश संपूर्ण सरकारला बंधनकारक आहेत. तरी, शासनाने दिलेल्या निदेशांचे पालन करावे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, खालच्या सदनामध्ये ज्या दिवशी उत्तर देण्यात येईल, त्याच दिवशी येथेही उत्तर दिले जाईल.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आमचा हा अपमान आहे. दोन्ही सभागृहे सार्वभौम आहेत. सभापती महोदय, हा आपला अपमान आहे. खालच्या सभागृहात काय झाले, त्याच्याशी आमचा काहीएक संबंध नाही.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, काल या प्रश्नावर माननीय मुख्यमंत्र्यांनी खालच्या सभागृहात उत्तर दिले होते. या सदनामध्ये यासंबंधीचे उत्तर मी देत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या आणि माझ्या उत्तरामध्ये तफावत राहू नये म्हणून एकाच दिवशी कार्यवाही व्हावी.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : वरचे सभागृह हे स्वायत्त आहे, या प्रकरणाच्या संदर्भात आपण येत्या 10 दिवसांत या सभागृहात उत्तर द्यावयास पाहिजे.

श्री. आर. आर. पाटील : या प्रकरणाच्या संदर्भात कोर्टातून काही पेपर मागवावे लागणार आहेत. एवढया मोठया प्रकरणाचा तपास करण्यासाठी वेळ मिळावयास पाहिजे यासाठी या सदनामध्ये अंतरिम अहवाल दिला जाईल.

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपल्या निदेशाचा येथे अवमान करण्यात येत आहे.....

**सभापती** : हा तपास लवकरात लवकर पूर्ण करुन शक्यतोवर 10 दिवसात आपण याबाबतचे उत्तर सभागृहात द्यावे.

श्री. आर. आर. पाटील : 10 दिवसांत पूर्ण तपास करुन उत्तर देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

**सभापती** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 1 वाजून 46 मिनिटांनी 1 वाजून 56 मिनिटांपर्यंत स्थगित झाली )

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**अध्यक्षस्थानी माननीय सभापती**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सभागृहाच्या नेत्यांनी एका प्रकरणामध्ये सदनाची जाणीवपूर्वक दिशाभूल केली आहे असा आमचा हरकतीचा मुद्दा आहे. जेलमध्ये असताना छाटा राजन व श्री.डी.के. राव यांच्या संभाषणाच्या एकूण किती टेप होत्या, ते किती तास बोलले, आपल्याला फक्त श्री.सिध्दाराम म्हेत्रेंची टेप कशी मिळाली, बाकीच्या टेप कुठे आहेत ? तसेच श्री.अनिस अहमद यांच्या बाबतीत सुध्दा दिशाभूल केली आहे. कोर्टात केस असताना त्याबाबत चर्चा करता येत नाही असे या ठिकाणी सांगण्यात येत आहे. परंतु या प्रकरणामध्ये श्री.अनिस अहमद यांना न्यायालयाने अंतरिम जामीन दिलेला आहे व 27 तारखेला म्हणणे मांडण्यासाठी तारीख दिलेली आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, मी या ठिकाणी आपल्याला बोलण्याची परवानगी दिली नव्हती.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आपण इतके सहिष्णू आहात की, आपण झालेला अपमान सुध्दा सहन करीत आहात.

( यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी .....

आपले हे सभागृह आहे, बाकी सगळे अदृश्य आहे. खालच्या सदनाबद्दल आम्हाला पूर्ण आदर आहे. परंतु तेथे काय चर्चा होते, काय निर्णय होतो त्याचा आमच्या या सभागृहाशी तसा काहीही संबंध नाही. आता आपण या ठिकाणी आदेश दिला की, या बाबतीतील जी काही माहिती असेल ती सभागृहासमोर आणावी, खुलासा करावा. पण माननीय उपमुख्यमंत्री वेगळेच सांगतात. खालच्या सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री या संदर्भात काय बोलले वगैरे ते सांगत आहेत. सभापती महोदय, खरे म्हणजे आपल्याकडे अशी प्रथा आहे, संकेत आहे की, आपण जो निर्णय दिला असेल, जो काही आदेश दिला असेल त्यावर कोणीही आर्ग्युमेंट करीत नाही, कसलेही भाष्य करीत नाहीत. आता कोर्टाच्या विरोधात जाऊन बोलावे लागेल असेही यामध्ये नाही. कोर्टाने केवळ अटकेला स्थगिती दिली आहे. तेव्हा या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी जे वर्तन केले आहे ते आपले आणि आपल्या सभागृहाचा अपमान करणारे आहे. तेव्हा त्यांनी प्रथमत: त्याबद्दल येथे दिलगिरी व्यक्त केली पाहिजे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आपला आणि या सदनाचा अवमान करण्याचा हेतू माझा केव्हाही नव्हता आणि भविष्यातही राहणार नाही. या विषयावर सविस्तर चर्चा झालेली आहे आणि या संबंधात शक्य तो 10 दिवसात माहिती द्यावी असे आदेशही आपण दिलेले आहेत. या शिवाय 'लौकरात लौकर माहिती द्या' असेही आपण सांगितले आहे. ....

( काही सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात. ... अडथळा ... )

मला या संदर्भात आणखीही सविस्तरपणे सांगावयाचे आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी आयोजित केलेल्या चहापानाच्या कार्यक्रमावर विरोधकांनी बहिष्कार घातला होता. त्यावेळी पत्रकारांना माहिती देताना या संदर्भात पत्रकारांनी विचारले असता 'या प्रकरणी आम्हीच चौकशी करू' असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले. ती चौकशी आम्ही दोघांच्याही बाबतीत करणार आहोत. असे असताना माननीय मुख्यमंत्र्यांच्या गैरहजेरीमध्ये अमुक इतक्या दिवसात आम्ही ही चौकशी करू असे मी सांगणे बरोबर नव्हते. तेव्हा दोन्ही सदनांमध्ये या संबंधात एकाच दिवशी उत्तर द्यावे हाही आमचा हेतू यामध्ये आहे. या सदनाचा अवमान करण्याचा यामध्ये अजिबात हेतू नाही. हे सदन वेगळे आहे आणि खालच्या सदनातील चर्चेचा उल्लेख येथे करणे योग्य नाही हे मलाही माहीत आहे. तरी लौकरात लौकर या बाबतीतील चौकशीचा अहवाल सदनाला दिला जाईल इतकेच मी या प्रसंगी सांगतो.

..... एल 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : ही चर्चा मी येथेच थांबवित आहे. तसेच आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. यानंतर पुढील कामकाज घेण्यात येईल.

..... एल 3 ..

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ज्ञानपीठ पुरस्कार विजेते श्री.विंदा करंदीकर यांच्या अभिनंदनाच्या ठरावासंबंधात ..**

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, खरे तर आजच मला या ठिकाणी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते श्री. विंदा करंदीकर यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडावयाचा होता. परंतु विधीमंडळाच्या दोन्ही सदनाच्या सदस्यांनी विनंती केल्यानंतर हा ठराव उद्याच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये दाखवून श्री.विंदा करंदीकरांचे आपल्याला मनमोकळेपणाने अभिनंदन करता येईल. तरी आपण देखील आजच्या ऐवजी उद्याच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये हा विषय दाखविण्याची परवानगी द्यावी ही विनंती.

**सभापती** : सभागृहाच्या उद्याच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये हा विषय दाखविण्यात येईल.

**औचित्याच्या मुद्याबाबत ....**

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मला एक गंभीर प्रश्न या ठिकाणी औचित्याच्या मुद्याद्वारे सभागृहामध्ये उपस्थित करावयाचा आहे. तरी आपण मला परवानगी द्यावी.

**सभापती** : खरे म्हणजे प्रथम आपण माझ्या चेंबर मध्ये येऊन औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागावयास पाहिजे होती. परंतु तसे न करता आपण या ठिकाणी औचित्याचा मुद्दा उपस्थित करू इच्छित आहात. एक अपवाद म्हणून मी आता आपल्याला यासाठी परवानगी देत आहे. मात्र यापुढे अशा पद्धतीने कोणालाही औचित्याचा मुद्दा येथे उपस्थित करण्यास मी परवानगी देणार नाही.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मी या ठिकाणी एक अत्यंत गंभीर असा प्रश्न औचित्याच्या मुद्याद्वारा उपस्थित करू इच्छितो. काल होळी-रंगपंचमीचा दिवस होता. त्यावेळी घणसोली या ठिकाणी रबाळे पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये दोन गटांमध्ये मारामारी झाली. पोलिसांनी ती शांत करण्याचा, त्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. पण आज सकाळी पुन्हा त्या ठिकाणी दोन गटामध्ये दंगल उसळली आणि माथाडी आणि गाववाले यांच्यामध्ये ही दंगल झाली तेव्हा तेथील पोलीस अधिकारी श्री.पठाण यांनी गोळीबार केला ....

..... एल 4 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा. कवाडे यांनी एका गंभीर प्रश्नाबाबत औचित्त्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी आपल्याकडे मागितली तेव्हा आम्हाला वाटले होते की, सोलापूरमध्ये जो अत्यंत निंदनीय प्रकार घडला आहे तो विषय मांडण्यासाठी ते उभे राहिले असतील. परंतु आता ते जो विषय येथे मांडीत आहेत त्या विषयी आम्ही अगोदरच नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे ...

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रावते यांना मी सांगू इच्छितो की, मी परवानगी दिलेली नसताना आपण अशा प्रकारे बोलत राहणे बरोबर नाही. त्यामुळे मला नाईलाजास्तव आपले बोलणे कामकाजातून काढावे लागत आहे. आपण जी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे त्याबाबत मी योग्य वेळी माझा निर्णय देणारच आहे. मी आता सन्माननीय सदस्य प्रा. कवाडे यांना बोलण्याची परवानगी दिली आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, या प्रश्नाचे गांभीर्य असे आहे की, आज सकाळी पुन्हा त्या ठिकाणी दंगल उसळली आहे आणि त्यावेळी पोलिसांनी गोळीबार केला. त्यामध्ये 10 लोक जखमी झालेले आहेत आणि किती ठार झाले याची माहिती आता माझ्याकडे नाही. तरी याबाबत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा केला तर बरे होईल.

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, याबाबत तातडीने दखल घेऊन तेथे पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला असून एसआरपी देखील रवाना करण्यात आलेले आहेत.

**सभापती** : ठीक आहे. यानंतर मी सन्माननीय सदस्या श्रीमती गोऱ्हे यांना बोलण्यास परवानगी देत आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण महाराष्ट्रातील संपूर्ण गावांच्या कानाकोपऱ्यातील जनतेच्या दृष्टीने माहितीच्या अधिकाराचे महत्त्व प्रस्थापित केलेले आहे. आजच आपण सकाळी जो शासनाचा निर्णय आमच्यासमोर मांडलेला आहे त्यामध्ये काही वाहिन्या, ज्यामध्ये 'सहारा' आणि 'इ टीव्ही' यांना सभागृहातील प्रश्नोत्तराच्या तासाचे प्रक्षेपण करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेतलेला आहे. या संदर्भात मला एक औचित्त्याचा मुद्दा येथे उपस्थित करावयाचा आहे. राज्यातील सगळ्या गोरगरीबांना परवडणारी आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये पोहोचलेली अशी जी दूरदर्शनची 'सह्याद्री वाहिनी' तिला खरे तर यासाठी आपण प्राधान्य दिले

..... एल 5 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पाहिजे होते. ज्यांना चॅनेल्सचे पैसे भरणे शक्य नाही अशा हजारो गावे-वस्त्या आहेत की त्या ठिकाणी 'सह्याद्री वाहिनी'वरील कार्यक्रम मोठ्या प्रमाणात पाहिले जातात. आपण यापूर्वी जी चर्चा केलेली आहे, मुद्दे मांडलेले आहेत त्यामध्ये याचा आर्थिक भार कोण उचलणार हा प्रश्न प्रामुख्याने उपस्थित केला होता. खरे तर हा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न नेहमीच सदनात मांडला जातो. ..

( यानंतर श्री. सरफरे ..... आय 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

साक्षरता अभियान सारख्या शासनाच्या अनेक महत्वाच्या योजना समाजाच्या हिताच्या व सामाजिक प्रबोधन करणाऱ्या आहेत त्यांची माहिती दूरचित्रवाहिनीव्दारे जनतेपर्यंत पोहोचविली जाते. त्याचप्रमाणे शेतीशी संबंधित अनेक चांगले कार्यक्रम दूरचित्रवाणीव्दारे प्रसारीत केले जातात. म्हणून या सभागृहाच्या कामकाजाचे प्रक्षेपण इतर वाहिन्यांव्दारे प्रक्षेपित केले जात आहे त्या संदर्भात मला आपल्याला विनंती करावयाची आहे की, प्रश्नोत्तराचा तास व इतर महत्वाचे कामकाज सभागृहामध्ये होते. गेली चार वर्षे या सदनाची सदस्या या नात्याने या ठिकाणी काम करीत असतांना जनतेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे व चांगले निर्णय सभागृहामध्ये होत असल्याचे माझ्या निदर्शनास आले आहे. त्यामधील अनेक महत्वाचे निर्णय लोकांपर्यंत पोहोचत नाहीत. त्या दृष्टीकोनातून माझी आपणास विनंती आहे की, सहयाद्री वाहिनीव्दारे जनतेपर्यंत हे कामकाज पोहोचविण्यासाठी आपण सभापती या नात्याने शासनाला निदेश द्यावेत अशाप्रकारे औचित्याचा मुद्दा मी उपस्थित करीत आहे.

**सभापती** : माननीय सदस्यांनी जो औचित्याचा मुद्दा मांडला आहे त्या संदर्भात निर्णय घेण्यापूर्वी संबंधित मंत्रिमहोदयांशी माझ्या दालनामध्ये चर्चा करुन व त्या संदर्भात आणखी माहिती घेऊन त्या संबंधी योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. व मु. शी. : अध्यादेश सभा□हासमोर ठेव□

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अ□मती□ भारतीय संविधा□च्या अ□च्छेद 213 (2) (अ) अ□वये स□2006 चा अध्यादेश □मां□ 1 उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणे अध्यादेश, 2006 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभा□हासमोर ठेव□यात आला आहे.

---

श्री. नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अ□मती□ भारतीय संविधा□च्या अ□च्छेद 213 (2) (अ) अ□वये स□2006 चा अध्यादेश □मां□ 3 महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अध्यादेश, 2006 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभा□हासमोर ठेव□यात आला आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2) (अ) अन्वये सन 2006 चा अध्यादेश क्रमांक 2 महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, अतिशय गंभीर मुद्दा आहे मला आपले संरक्षण पाहिजे. महाराष्ट्राच्या महामहिम राज्यपालांनी राज्यातील इरिगेशनच्या संदर्भात निर्देश दिलेले आहेत. त्या निर्देशाचे पालन न करता तीन विभागांना निधी शासनाने वाटलेला आहे. त्या संदर्भाने अध्यादेश काढलेला आहे. त्याबाबत राज्यपालांनी परवानगी दिलेली आहे काय ? परवानगी दिली नसेल तर हा अध्यादेश अयोग्य आहे. वैधानिक मुद्दा आहे, माझ्या माहितीप्रमाणे या अध्यादेशाला महामहिम राज्यपालांनी परवानगी दिलेली नाही, असे असतांना हे पैसे कसे काय वाटले ?

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, अध्यादेशाच्या खाली राज्यपालांची सही आहे, त्यामुळे राज्यपालांनी त्यास मान्यता नाही असे कसे काय म्हणता येईल ?

श्री.नितीन गडकरी : इरिगेशनचा निधी वाढविलेला आहे, त्या संदर्भातील फाईल राज्यपालांकडे गेलेली नाही. त्या संदर्भातील वर्तमानपत्रामध्ये बातमी वाचनात आलेली आहे. ही फाईल त्यांच्याकडे जाण्याच्या अगोदर राज्यपालांनी शासनाला निर्देश दिलेले आहेत, हे त्यांच्या निदर्शनास आणून दिलेले आहे काय ?

श्री.सुनील देशमुख : हा आकस्मिकता निधी वेगळा आहे. आकस्मिकता निधी हा 150 कोटीचा होता, तो वाढवून 950 कोटी केल्याच्या संदर्भातील अध्यादेश आहे.

श्री.नितीन गडकरी : इरिगेशनसाठीची रक्कम वाटण्याच्या संदर्भातील माझा मुद्दा आहे.

श्री.सुनील देशमुख : आकस्मिकता निधी 150 कोटीवरुन 950 कोटी करण्याबाबतचा अध्यादेश आहे.

श्री.नितीन गडकरी : निधीचे वाटप झालेले आहे काय ?
श्री.सुनील देशमुख : आता अध्यादेश काढलेला आहे.
**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यत आला आहे.

--

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2) (अ) अन्वये सन 2006 चा अध्यादेश क्रमांक 4 - महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

**पृ.शी. व मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादितचा (पुणे) सन 1999-2000 चा सदतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : सदतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

**पृ.शी. व मु.शी.** : सन 2005-2006 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे.

श्री.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005-2006 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2005-2006 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर विचार करण्याची या सभागृहाला शिफारस केली आहे. सभापती महोदय, विदर्भ व कोकणातील अपूर्ण पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आमचे शासन नेहमीच कटिबध्द राहिलेले आहे. विदर्भातील अपूर्ण पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रुपये दीडशे कोटी व कोकणातील पाटबंधारे प्रकल्पांसाठी रुपये पन्नास कोटी आकस्मिकता अग्रीम निधीद्वारे उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. हा फार मोठा अन्याय आहे. या ठिकाणी पहिल्यांदा राज्यमंत्री महोदयांनी आकस्मिकता निधी 900 कोटीपर्यन्त वाढविण्याबाबत अध्यादेश काढल्याचे सांगितले. मी या संदर्भाने मुद्दा उपस्थित केला असतांना सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी अध्यादेशावर राज्यपाल महोदयांची सही असल्यामुळे त्यांनी त्यास परवागी दिली असे स्पष्टीकरण केले ते मान्य आहे. आता या ठिकाणी 900 कोटी रुपयाचे वाटप केले गेलेले आहे. कोकणच्या जनतेच्या तोंडाला पाने पुसली, विदर्भातील जनतेच्या तोंडाला पाने पुसली याबाबत मंत्रिमंडळामध्ये सन्माननीय मंत्री श्री.नारायण राणे, श्री.सतिश चतुर्वेदी आणि अन्य मंत्री महोदयांनी या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला होता. घटनेच्या 271 (2) (6) खाली राज्यपाल महोदय निर्देश देत असतात ते निर्देश शासनावर बंधनकारक आहेत. आकस्मिकता निधीमधील 900 कोटी रुपये इरिगेशनकरिता वाढविलेले आहेत. 900 कोटी रुपयाचे वाटप करण्यात आले, त्या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांची परवानगी घेतलेली आहे काय ?

श्री.सुनील देशमुख : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या मनामध्ये काहीतरी संभ्रम निर्माण झालेला असावा. आकस्मिकता निधीची 950 कोटी रुपयाची मर्यादा वाढविणारा अध्यादेश काढलेला आहे. यामध्ये कापूस एकाधिकार योजनेतील चढउतार निधीचा 350 कोटी रुपयाचा हप्ता द्यावयाचा आहे. म्हणून ती मर्यादा वाढविलेली आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : आता आपण विदर्भासाठी 150 कोटी रुपये आणि कोकणासाठी 50 कोटी रुपये दिल्याचे वाचून दाखविले त्याची चर्चा कॅबिनेटमध्ये झाली आहे. ते वर्तमानपत्रामध्ये छापून आले. आपण हे जे पैसे वाटलेले आहेत ते इरिगेशनसाठी ॲलोकेट केलेले आहेत. इरिगेशनसाठी ॲलोकेशन करताना घटनेच्या कलम 371 (2) (8) अन्वये महाराष्ट्राच्या माननीय राज्यपालांनी तुम्हाला डायरेक्शन्स दिलेले आहेत आणि ते मेंडेटरी आहेत, घटनात्मक आहेत. या सभागृहात ॲडव्होकेट जनरल श्री. वहानवटी यांनी सांगितले की, हे निर्देश सरकारवर बंधनकारक आहेत. मग आपण जेव्हा हे पैसे वाटले तेव्हा या पैशाचे वाटप करण्याच्या आधी माननीय राज्यपाल महोदयांची परवानगी घेतली काय ?

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी निर्देशाप्रमाणे वाटप करण्याबाबतचा जो मुद्दा मांडलेला आहे तो पूर्णपणे रास्त आणि योग्य आहे. आम्ही महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये आज नवीन गोष्ट पाहिलेली आहे. म्हणून त्याबाबत लहानसा खुलासा मागू इच्छितो. पुरवणी मागण्या सादर झाल्यानंतर माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी दोन ओळीचे निवेदन केलेले आहे. वर्तमानपत्रात जे काही आलेले आहे त्याचा उल्लेख मी करीत नाही. पण पुरवणी मागण्या सादर केल्यानंतर माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, 150 कोटी रुपये विदर्भातील पाटबंधाऱ्यांसाठी आणि 50 कोटी रुपये कोकणासाठी दिलेले आहेत. माननीय राज्यपालांसबंधीचा जो विषय आहे तो मी या ठिकाणी उपस्थित करीत नाही. हे 150 कोटी रुपये आणि 50 कोटी रुपये आपण देत आहात याचे कारण कोकणाला आणि विदर्भाला जो निधी द्यावयास पाहिले होता तो दिला गेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. हे 150 कोटी रुपये आणि 50 कोटी रुपये या पुरवणी मागण्यांमध्ये समाविष्ट आहेत की ते ॲडिशनल आहेत ? त्याचा समावेश पुरवणी मागण्यांमध्ये असेल तर काही म्हणणे नाही. ते जर ॲडिशनल असतील तर ते केव्हा दिले जातील ? याचा खुलासा करावा.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, 150 कोटी रुपये आणि 50 कोटी रुपये मी आताच म्हटल्याप्रमाणे आकस्मिकता अग्रीम निधीव्दारे उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था केलेली आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : पुरवणी अर्थसंकल्पात त्याचा समावेश का केला नाही ? या ठिकाणी सभागृहात पुरवणी अर्थसंकल्प आणत असताना, सभागृहाचे कामकाज सुरु असताना तसेच सभागृह सुरु होण्यास आठ दहा दिवस असताना कोणत्याही प्रकारचा अध्यादेश काढता येत नाही. तुम्हाला ते बजेटमध्ये समाविष्ट करावे लागते. तसे का केले नाही ?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय वित्त राज्यमंत्र्यांचा जो प्रस्ताव आहे तो त्यांनी सभागृहापुढे ठेवलेला आहे. त्यावर या ठिकाणी आता चर्चा होणार नाही. याची चर्चा वेगळ्या मार्गाने उपस्थित करावयास पाहिजे.

श्री. नितीन गडकरी : मला चर्चा करावयाची नाही. या ठिकाणी आज पुरवणी मागण्या सादर होत आहेत. या ठिकाणी पुरवणी अर्थसंकल्पावर चर्चा आहे. ज्यावेळी विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असते त्यावेळी अध्यादेश काढत नाही. विधिमंडळाच्या अधिवेशनास पंधरा वीस दिवस असतात त्यावेळी अध्यादेश निघत नाही. आज विदर्भ अणि कोकणाला 150 कोटी रुपये आणि 50 कोटी रुपये आणि 200 कोटी रुपये देण्याबाबतचा अध्यादेश काढणे योग्य नाही. लोकशाहीचा असा संकेत आहे की, ज्यावेळी अधिवेशन सुरु असते त्यावेळी तुम्ही ते पैसे पुरवणी अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट करावयास पाहिजे. अशी कोणती परिस्थिती निर्माण झाली की, ज्यामुळे सभागृहामध्ये पुरवणी बजेट सादर होत असताना 200 कोटी रुपयांसाठी अध्यादेश काढावा लागला ? पहिली गोष्ट अशी की, तुमचा हा अध्यादेश काढणे वैधानिक नाही. याबाबत लोकसभेचे प्रिसिडेंट्स आहेत. मे. कौल आणि शकधर यांच्या पुस्तकात नमूद केले आहे. आपण अध्यादेश केव्हा काढतो ? विधिमंडळ किंवा पार्लमेंटचे कामकाज संस्थगित झालेले असते आणि त्यामुळे सभगृहापुढे जाण्यास वेळ नसतो आणि अर्जेन्सी असते त्यावेळी माननीय राज्यपालांना कंव्हीन्स केल्यानंतर माननीय राज्यपाल आध्यादेशावर सही करतात. आपण पुरवणी अर्थसंकल्प सादर केलेला आहे. पुरवणी अर्थसंकल्पावर चर्चा करणार आहोत. तुम्ही आता अध्यादेश कसा काय काढता ? जे 200 कोटी रुपये दिलेले आहेत ते तुम्हाला पुरवणी अर्थसंकल्पात दाखविता आले असते. तसे न दाखविता अध्यादेश काढत आहात. पुरवणी अर्थसंकल्प आधीच छापून टाकले होते काय ? यामध्ये विदर्भ आणि कोकणाचे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. नितीन गडकरी ...

नाव नव्हते म्हणून हे उशिरा सुचलेले शहाणपण आहे काय ? म्हणून आपण अध्यादेश काढला ते योग्य आहे काय ? ते वैधानिक आहे काय ? हे करीत असताना ही रक्कम पुरवणी अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट करता आली असती. पश्चिम महाराष्ट्राच्या बाबतीत मी बोलणे बरोबर नाही.

यानंतर श्री. शिगम ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु...)

पश्चिम महाराष्ट्रासाठी 750कोटी रु. दिले असल्याचे मी वृत्तपत्रात वाचले. कोकणासाठी जेव्हा 5 कोटी रुपये मिळाले त्यावेळी माननीय महसूल मंत्री श्री. राणेसाहेब म्हणाले की, कोकणासाठी पाचच कोटी रुपये ? तेव्हा 50 कोटी रु. दिले. (अडथळा) सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज सुरु असताना आणि पुरवणी मागण्या मांडल्या जात असताना शासनाने अध्यादेश काढण्याचे कारण काय ? अशा प्रकारे अध्यादेश काढणे योग्य आहे काय ? सभागृह संस्थगित झाल्यानंतर आणि इमर्जन्सी असेल तर एखाद्या महत्वाच्या बाबीसंबंधी अध्यादेश काढला जातो. याठिकाणी एका गोष्टीचा खुलासा होणे आवश्यक आहे की, हे जे तुम्ही 150 कोटी रु. आणि 50 कोटी रु. दिलेले आहेत ते तुम्ही माननीय राज्यपालांच्या लक्षात आणून दिलेले आहेत काय ? माननीय राज्यापांलाच्या हे निदर्शनास आणून दिलेले नसेल तर याबाबतीत तुम्ही माननीय राजपालांची आणि या सभागृहाची देखील दिशाभूल केलेली आहे.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी याठिकाणी अध्यादेश वाचला आहे. सन 2005-06च्या पुरवणी मागण्या मांडत असताना विदर्भासाठी 150 कोटी रु. आणि कोकणासाठी 50 कोटी रु. देण्यासंदर्भातील अधिक माहितीचे निवेदन माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी केलेले आहे. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी यासंदर्भात काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून या सभागृहाला सांगू इच्छितो की, भारतीय घटनेच्या अनुच्छेद 205 नुसार या सर्व तुरतुदी झालेल्या आहेत. सभागृहामध्ये पुरवणी मागण्या येत असतानाच 200 कोटी रुपये आकस्मिकता निधीमध्ये समाविष्ट केले. हे समाविष्ट करीत असताना पूर्वीची आकस्मिकता निधीची जी मर्यादा होती ती मर्यादा वाढविण्यासाठी अध्यादेश काढण्यात आलेला आहे. पुरवणी मागण्यांचा आणि अनुशेषाचा या अध्यादेशाशी काहीही संबंध नाही. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी अनुशेषाच्या रकमेचा उल्लेख केला. मी सांगू इच्छितो की, अनुशेषाच्या संदर्भात जे वाटप झालेले आहे ते घटनेच्या अनुच्छेद 371 प्रमाणे माननीय राज्यपालांना जे अधिकार प्रदान झालेले आहेत त्या अधिकाराच्या अंतर्गत वाटप झालेले आहे. असे वाटप झालेले असताना यावेळी विदर्भाला मिळणारी रक्कम कमी असल्याचे दिसून आले. कोकण आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी 67 कोटी रु. होते. वस्तुस्थिती पाहिल्यानंतर मंत्रिमंडळाने

...2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नारायण राणे पुढे सुरु...)

निर्णय घेतला. राज्य सरकारला वाटले की, 2005-06 हे वर्ष मार्च अखेरीस संपणार असल्यामुळे विदर्भासाठी 150 कोटी रु. आणि कोकणासाठी 50 कोटी रु. द्यावेत. परंतु ही रक्कम पुरवणी मागण्यांचे पुस्तक छापून झाल्यानंतर त्यामध्ये समाविष्ट करणे शक्य नव्हते. खरे तर राज्य शासनाने विदर्भाला 150 कोटी रु. अधिक दिले त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करायला पाहिजे. हे 150 कोटी आणि 50 कोटी रु. आकस्मिकता निधीतून देण्याची तरतूद केली. या तरतुदीसंदर्भातील अधिक माहिती माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी पुरवणी मागण्या मांडत असताना सभागृहाला दिली. ही माहिती विधानसभा आणि विधानपरिषदेच्या कामकाजाच्या नियमाप्रमाणे तसेच भारतीय घटनेला धरुन दिलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : पुरवणी मागण्यामध्ये ही तरतूद नव्हती म्हणून विदर्भासाठी 150 कोटी रु. आणि कोकणासाठी 50 कोटी रु. तरतूद केल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. प्रश्न असा आहे की, इतरांसाठी काय तरतूद केली हे इन्व्हिझिबल आहे. कारण पुरवणी मागण्या चर्चेला आलेल्या नाहीत. तेव्हा 150कोटी आणि 50 कोटी रु. जस्टिफाय होतात काय ?

..नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

पहिली गोष्ट अशी आहे की, 150 कोटी आणि 50 कोटी रु. दिले असे जे सांगितले ते पैसे माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार दिले गेले आहेत काय ?.....

**सभापती** : पुरवणी मागण्यांवर ज्यावेळी चर्चा होईल त्यावेळी माननीय सदस्यांना यावर विस्तृतपणे बोलता येईल.

श्री. नितीन गडकरी : माननीय सभापती महोदय, घटनेच्या कलम 371(2)(8) खाली 350 कोटी रुपये मिळणे आवश्यक होते. कोकणाला 125 कोटी रु. मिळणे आवश्यक होते. ते नियम बाजूला ठेवले आणि पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद नाही असे दिसून आल्यावर भीक मागितल्यासारखे 150 कोटी रुपये विदर्भाला आणि 50 कोटी रु. कोकणाला दिले. माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार पाटबंधारे खात्यासाठी निधीचे वाटप होणे बंधनकारक आहे. माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार जेवढी निधी निघाला तेवढा यावर्षी दिलेला आहे काय ? तेवढा निधी दिला असेल तर मी शासनाचे अभिनंदन करतो. पुरवणी मागण्यांवर चर्चा होईल त्यावेळी नियमानुसार निधी दिला आहे किंवा नाही हे पाहता येईलच. प्रश्न एवढाच आहे की, माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार पाटबंधारे प्रकल्पांसाठी निधीचे वाटप झाले आहे किंवा नाही ? 150 कोटी रुपये आणि 50 कोटी रुपयांचे वाटप हे राज्यपालांच्या निदेशानुसार झालेले नाही. डॉ. सुनील देशमुख यांच्यामुळे विदर्भाला 150 कोटी रु. आणि श्री. राणे साहेब यांच्यामुळे कोकणाला 50 कोटी रु. मिळाले. पाटबंधारे खात्याच्या बाबतीत माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार निधीचे वाटप करणे सरकारवर बंधनकारक आहे. इतर खात्याच्या बाबतीत नाही. पाटबंधारे खात्याच्या बाबतीत निधी वाटपाचे सूत्र राज्यपाल महोदयांनी ठरवून दिले आहे त्यानुसार लोकसंख्या,पिके आणि बॅकलॉग ही त्रिसूत्री ठरवून दिलेली आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : माननीय सभापती महोदय, तीन मुद्दे एकात एक असल्यामुळे एकाही मुद्याला न्याय मिळणार नाही. आकस्मिकता निधीतील रक्कम वाढवून घेण्यासाठी अध्यादेश काढला हा वेगळा मुद्दा आहे. हा निधी इतर कारणांसाठी सुध्दा वापरला जातो. दुसरा मुद्दा असा आहे की, माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार वाटप करावयाचे आहे ते केले किंवा कसे ? त्यासंबंधातील कागदपत्रे अजून आलेली नाहीत. बजेट येईल त्यावेळी ही गोष्ट स्पष्ट होईल. पुरवणी मागण्या सादर करीत असताना यापूर्वी झाली नव्हती अशी गोष्ट झालेली आहे. मागण्यांच्या सायटेशनमध्ये

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख ...

एक वाक्य असे आहे की, 150 कोटी रुपये विदर्भाला आणि 50 कोटी रुपये कोकणासाठी दिलेले आहेत. माननीय सदस्य श्री. नितीनजी गडकरी म्हणतात ते बरोबर आहे. याचे विवरणपत्र सादर करावे लागेल.अजून पुरवणी मागण्या सादर झालेल्या नाहीत. पुरवणी मागण्यांचे निवेदन केलेले असते त्याच्यामध्ये हा विषय टाकला जातो. 150 कोटी रुपये आणि 50 कोटी रुपये एवढा निधी उपलब्ध करुन दिला जाईल तो केव्हा दिला जाईल याचा खुलासा असणे अत्यंत आवश्यक आहे. याचा अर्थ उघडपणे असा होतो की, जो निधी दिलेला होता तो कमी दिलेला होता. जास्त दिला गेला आहे काय त्यावर पुरवणी मागण्या सादर झाल्यानंतर बोलता येईल. परंतु मुद्दा असा आहे की हा निधी केव्हा मिळणार ?

श्री. अजित पवार : माननीय सभापती महोदय, हा निधी 31 मार्च 2006 पूर्वी दिला जाईल.

श्री. नितीन गडकरी : माननीय सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज सुरु असताना अध्यादेश काढण्याची प्रथा किंवा परंपरा नाही. पुरवणी मागण्या असताना आणि अधिवेशन सुरु असताना शासनाने अध्यादेश का काढला ?

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

सभापती महोदय, प्रथा व संकेताला धरुन ही गोष्ट योग्य नाही व आज पहिल्यांदाच हे घडलेले आहे. विधानमंडळाचे अधिवेशन सुरु असतांना आणि आजच पुरवणी मागणी सभागृहात मांडत असतांना बजेटमधील एका हेडबद्दल आजच अध्यादेश काढणे हे कितपत योग्य आहे ? दुसरा मुद्दा म्हणजे फक्त पाटबंधारे खात्याच्या बाबतीत ॲडव्होकेट जनरल यांनी सभागृहातच सांगितलेले आहे की, घटनेच्या कलम 371 (2)(8) प्रमाणे माननीय राज्यपालांनी जे निदेश दिलेले आहेत त्यानुसार ॲलोकेशन ऑफ फंड्स दरवर्षी कशा प्रकारे करावयाचे यासंबंधीचे निदेश माननीय राज्यपाल दरवर्षी देतात. 15 दिवसांपूर्वी माननीय राज्यपालांनी शासनाकडे एक पत्र पाठविलेले असून त्या पत्रात त्यांनी असे म्हटले आहे की, अमुक रिजनला अमुक इतके पैसे द्यावेत अशा प्रकारे रिजनवाईज निदेश दिलेले आहेत. मार्च महिना संपण्यापूर्वी मागील वर्षीचे आणि यावर्षीचे जेवढे पैसे माननीय राज्यपालांच्या निदेशांप्रमाणे बंधनकारक आहेत त्या निदेशांना माननीय पाटबंधारे मंत्र्यांनी तर गेल्या तीन वर्षांपासून केराची टोपली दाखविलेली आहे. परंतु या अनुषंगाने मला एकच मुद्दा लक्षात आणून द्यावयाचा आहे की, 350 कोटी रुपये आकस्मिक निधीतून आपण पाटबंधारे विभागाला देऊच शकत नाही आणि ज्यावेळी ते आपण द्याल त्यावेळी या वर्षी कशा प्रकारे निधी वाटप करावयाचा आहे त्यासंबंधी माननीय राज्यपालांनी सूत्र ठरवून दिलेले आहे. माननीय राज्यपाल महोदयांनी मार्च महिन्यापर्यंत एक वर्षात किती पैसे द्यावयाचे आहेत यासंबंधीचे निदेश दिलेले आहेत. म्हणून शासनाने असे सांगावे की यावर्षी माननीय राज्यपालांच्या निदेशांप्रमाणे आम्ही पैसे दिलेले आहेत, मी खाली बसण्यास तयार आहे. माननीय राज्यपालांनी सांगितले की 800 कोटी रुपये द्या तर सरकारने फक्त 150 कोटी रुपयेच दिले, कोंकणसाठी 300 कोटी रुपये मिळू शकत असतील पण फक्त 50 कोटी रुपयेच देण्यात आले तरीही आम्ही टाळया वाजवितो. यावर्षाच्या अखेरीपर्यंत मिळणारी रक्कम 250 कोटीपेक्षा जास्त आहे. विदर्भाला मिळणारी रक्कम 1100 कोटीपर्यंत आहे. हे चित्र आता मार्चपर्यंत स्पष्टच होणार आहे. बजेटच्या अगोदर पुरवणी मागण्यांमध्ये हे टाकतात आणि त्याच दिवशी अध्यादेश काढला जातो आणि आमच्यासमोर आणला जातो हे गौडबंगाल काय आहे हेच मला समजत नाही. म्हणून यासाठी वेळ हवा असेल तर तो शासनाने घ्यावा परंतु अशा प्रकारे सभागृहाचा अवमान करणे योग्य नाही

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

हे डिस्क्रीशन सभागृहासमोर आले पाहिजे. माननीय राज्यपालांचे निदेश सरकार पाळत नाही व त्या पापात आम्ही सहभागी होऊ इच्छित नाही. म्हणून यासंदर्भात खुलासा होणे आवश्यक आहे.

डॉ. सुनील देशमुख : महोदय, माननीय राज्यपालांनी 15 दिवसांपूर्वी निदेश दिले होते ते सन 2006 ते सन 2010 चे होते. विदर्भाला 150 कोटी पेक्षा जास्त रक्कम मिळत असेल तर त्यामध्ये काय चुकीचे आहे.....

श्री. नितीन गडकरी : या मार्च महिन्यामध्ये, या संपणाऱ्या वर्षात माननीय राज्यपालांनी मागील वेळी जे निदेश दिलेले आहेत ते पूर्णपणे पाळले गेले आहेत, हे माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात जाहीर करावे.

डॉ. सुनील देशमुख : सन 2005-06 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर विचार करण्याची शिफारस सभागृहाला करीत आहे. ते विवरण पत्र सभागृहात येईल, त्यावर चर्चा होईल, त्यामध्ये कमी जास्त होईल व पुन्हा त्यासंबंधीचा निर्णय होईल.

श्री. नितीन गडकरी : माझी माननीय सभापतींना विनंती आहे की, अशा प्रकारे माननीय राज्यपालांनी दिलेल्या आदेशांचा भंग सभागृहात आपण खपवून घेऊ नये.

डॉ. सुनील देशमुख : जे विवरणपत्र सभागृहाला शिफारशीसाठी ठेवत आहे त्याच्या पूर्वीच त्यावर भाष्य करणे बरोबर होणार नाही.

श्री. आर.आर.पाटील : महोदय, सप्लीमेंटरी बजेट सादर न करता त्यातील तरतुदी सदनाला सांगणे हे योग्य नाही.

श्री. नितीन गडकरी : आमची मागणी आहे की, पुन्हा ॲडव्होकेट जनरलना सभागृहात बोलाविण्यात यावे.

यानंतर श्री. भारवि .....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

**सभापती** : मी माझे रुलिंग देत आहे. तेव्हा कृपा करून सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. येथे सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला. विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र, कोकण या विभागांसाठी पाटबंधारे विभागाच्या तरतुदीसंबंधी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी हरकतीच्या मुद्दाद्वारे आपले विचार मांडले. त्यांचा मुद्दा असा होता की, घटनेच्या कलम 371 (2) (8) नुसार राज्यपालांना विशेषाधिकार आहेत. त्यानुसार वैधानिक विकास मंडळांसाठी तरतूद उपलब्ध करून देणे अतिशय गरजेचे आहे. त्याच बरोबर अन्य 2-3 मुद्दे देखील त्यांनी उपस्थित केले. सर्वसाधारणपणे अपवादात्मक परिस्थितीमध्ये अध्यादेश काढावा लागतो. त्याबाबत कळत न कळत फरक करणे गरजेचे आहे, असे मला वाटते. हरकतीच्या मुद्दावर सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी तसेच सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी देखील आपले विचार मांडलेत. या हरकतीच्या मुद्दावर सन्माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे व सन्माननीय वित्त राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी देखील आपले विचार मांडलेत. या सर्व मुद्दांचा विचार करण्यासाठी मी माझा निर्णय राखून ठेवत आहे. या हरकतीच्या मुद्दावरील माझा निर्णय मी 1-2 दिवसात देईन. गरज वाटल्यास कायदेतज्ज्ञांचा सल्ला घेऊन मी माझा यासंबंधीचा निर्णय देईन. त्यामुळे आता आपण पुढील कामकाजाकडे वळू या.

दिनांक 16 मार्च 2006 रोजी विधानमंडळास सादर करण्यात आलेल्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रामध्ये ज्या मागण्या समाविष्ट केलेल्या नाहीत, अशा दिनांक 10 मार्च, 2006 पर्यंतच्या आकस्मिकता निधीतून मंजूर केलेल्या आगाऊ रकमाची सूची सभागृहासमोर ठेवण्यात आली आली आहे.

...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.व मु. शी**. : विधेय□I□II संमती व अधिसंमती

**सभापती** : दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याची यादी सचिव वाचू□I दा□II वतील.

**सचिव** : खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली.

(प्रेस : येथे सोबतची यादी छापावी.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते व इतर वि.प.स. यांनी "राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता पाहिली ते आठवीपर्यंत कला विषय अनिवार्य ठरविण्यात येणे तसेच शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक 15/2/1994 च्या आदेशान्वये कला विषयासाठी दहा टक्क करभार देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी व इतर वि.प.स. यांनी "महाराष्ट्रातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी शासकीय सेवेत घेण्याचे आश्वासन शासनाने देऊनही व शासनाने या संदर्भात 35 आदेश निर्गमित करुनही काहीच कार्यवाही न होणे, या संदर्भात पाच लाख युवकांची फसवणूक होणे, यातील काही कर्मचारी वयाची अट ओलांडण्याची शक्यता असल्यामुळे त्यांच्यात नाराजी पसरणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी व इतर वि.प.स.यांनी "राज्यात अनेक जिल्हयांत दिनांक 3 ते 9 मार्च, 2006 दरम्यान अवेळी पाऊस, वादळी वारे व गारपिटीमुळे शेती-बागायती यांचे प्रचंड नुकसान होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. या विषयाच्या अनुषंगाने लक्षवेधी सूचना स्वीकारण्यात आली आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "राज्यात फेब्रुवारी, 2006 व मार्च, 2006 मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिकच्या इयत्ता बारावीच्या परीक्षेतील मराठीच्या विषयामध्ये संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांविषयी लिहीण्यात आलेला आक्षेपार्ह मजकूर असलेला उतारा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. या विषयाच्या अनुषंगाने लक्षवेधी सूचना स्वीकारण्यात आलेली आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : महोदय, लक्षवेधी सूचना उद्या-परवा चर्चेला आली तर बरे होईल.

**सभापती** : आपण सकाळी मला दालनात भेटलेला आहात. तसेच मी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना सुध्दा सांगू इच्छितो की, या विषयाबाबत लक्षवेधी सूचना लवकरात लवकर चर्चेला घेण्यात येईल.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी व इतर वि.प.स.यांनी "फेब्रुवारी 2006 च्या दुसऱ्या पंधरवाडयात नवापूर, जि.नंदूरबार येथे बर्ड फ्ल्यूच्या साथीमुळे हजारो कोंबडया मेल्या, त्यानंतर शासनाने तेथील लाखो कोंबडया मारण्याचे आदेश देणे, त्यामुळे शेतकऱ्यांचे वीस कोटींपेक्षा जास्त रुपयांचे नुकसान होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. या विषयाशी संबंधीत लक्षवेधी सूचना स्वीकारण्यात आलेली आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "दक्षिण मुंबईतील क्रॉफर्ड मार्केट, साबू सिध्दीक मार्ग, रमाबाई आंबेडकर नगर व महापालिका वसाहत परिसरात जलवाहिनी फुटल्यामुळे पाणी दूषित होणे व त्यामुळे दिनांक 14 मार्च, 2006 पासून उलटया जुलाब होऊन त्यात दोघांचा मृत्यू होणे आणि 100 लोकांना लागण होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु शासनाने यावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 20 फेब्रुवारी, 2006 रोजीच्या सुमारास अमरावती जिल्हयातील मोर्शी तालुक्यातील टंचाईग्रस्त गावासाठी चारगड धरणातील पाणी सोडावे या मागणीसाठी निदर्शने करणाऱ्या नागरिकांवर पोलिसांनी केलेला लाठीमार व सोडण्यात आलेला अश्रूधूर, त्यात खेड येथील रहिवासी प्रफुल्ल किसन राऊत या तरुणाचा पोलीस गोळीबारात झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. या विषयाशी संबंधीत लक्षवेधी सूचना स्वीकारण्यात आलेली आहे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या विषयासंदर्भात आम्ही सुध्दा नोटीस दिलेली आहे. ती ॲडमीट होत असताना काही मुद्यांकडे दुर्लक्ष होऊ नये म्हणून काही गोष्टी आपल्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. महोदय, तेथील जनतेची मागणी पिण्याचे पाणी मिळण्याबाबतची आहे. मार्च, 1989 च्या नोटीफिकेशनप्रमाणे 17 गावे लाभक्षेत्रात जाहीर करण्यात आली होती. परंतु 1998 च्या नोटीफिकेशननुसार 17 गावांतून, 6 गावे वगळण्यात आली आहेत. त्यामुळे या मुद्याकडे दुर्लक्ष झाले तर तेथील जनतेला न्याय मिळणार नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुखसाहेब आपण मला डिटेल्स द्या.

प्रा.बी.टी.देशमुख : महोदय, मी नोटीसच दिलेली आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, 1982 पासून सतत 14 वर्षे आम्ही या विषयाबाबत सभागृहात पाठपुरावा केलेला आहे. जो प्रकल्प पूर्वी मध्यम होता तो लोअर करण्यात आलेला आहे. तसेच पूर्वी या प्रकल्पाची सिंचन क्षमता 2700 हेक्टर इतकी होती, परंतु आता ती 1200 हेक्टरपर्यंत आलेली आहे. शिवाय 17 गावांपैकी 6 गावे वगळण्यात आलेली आहेत.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी. देशमुख ....

सभापती महोदय, निम्न चारगड या संबंधातील प्रकरण प्रशासकीय मान्यतेसाठी जमा आहे. त्या लोकांना न्याय मिळाला पाहिजे. हा मुद्दा मी आपल्या लक्षात आणून दिलेला आहे. ज्याप्रमाणे आपण इतर महत्वाच्या बाबीकडे लक्ष देता त्याप्रमाणे याही प्रकरणासंदर्भात उत्तर द्यावे, अशी आपणास विनंती आहे.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. निलम गोऱ्हे यांनी " दिनांक 12 मार्च, 2006 रोजी वा त्या सुमारास रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील लोटे औद्योगिक वसाहतीत फाययबरचे उत्पादन करणाऱ्या मोरेक्स पेट्रो केमिकल्स कंपनीस लागलेली आग, त्यात कंपनी बेचिराख होणे तसेच कंपनीत झालेल्या नऊ स्फोटांनी सारा परिसर हादरुन जाणे व त्यामुळे इ ालेले नुकसान " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या संदर्भात शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे व इतर वि.प.स. यांनी " अहमदनगर येथील सेक्स स्कँडल राज्यभर गाजत असतानाच याच शहरात कॉन्हेंट स्कूलमध्ये इयत्ता दहावीत शिकणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याचे दिनांक 14 मार्च, 2006 रोजीच्या उघडकीस येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या संदर्भात शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे व इतर वि.प.स. यांनी " दिनांक 14 मार्च, 2006 रोजीच्या सुमारास सोलापूर शहरात एका दलित महिलेला विवस्त्र करुन धिंड काढल्याची घडलेली घटना " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या संदर्भात शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे व इतर वि.प.स. यांनी " दिनांक 14 मार्च, 2006 रोजी कोल्हापूर येथील कळंबा मध्यवर्ती कारागृहानजिक असलेल्या शासनाच्या समाजकल्याण विभागाच्या तेजस्विनी महिला वसतिगृहातील कर्मचाऱ्यांनीच बलात्कार

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय सभापती ....**

केल्याची घडलेली घटना " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या संदर्भात शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे व इतर वि.प.स. यांनी " दिनांक 15 मार्च, 2006 रोजीच्या सुमारास रायगड जिल्ह्यातील महाड औद्योगिक वसाहतीमध्ये वसुंधरा रसायन लि. या कंपनीत विषारी वायू पसरल्याने दोन कामगारांचा जागीच मृत्यू होणे व 14 कामगारांना बाधा होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या संदर्भात शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत व इतर वि.प.स. यांनी " दिनांक 15 मार्च, 2006 रोजी नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात असलेल्या विषाणूजन्य तापाच्या साथीने 73 जणांना झालेली लागण " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या संदर्भात शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे व इतर वि.प.स. यांनी " दिनांक 15 मार्च, 2006 च्या सुमारास जागतिक महिला दिनाच्या पूर्व संध्येपासून नवी मुंबई परिसरात महिलांवरील अत्याचाराच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असून नेरुळ येथे एका विहिरीत महिलेचा सापडलेला मृतदेह, दोन महिन्यांपूर्वी नवी मुंबई परिसरात अज्ञात अर्भके आणि पुरुषांचे मृतदेह सापडण्याचे सत्र सुरु असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या संदर्भात शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी " दिनांक 9 मार्च, 2006 रोजी पुणे जिल्ह्यातील हिजवडी येथे जमीन देण्यास लोकांचा विरोध असताना एम.आय.डी.सी. चे अधिकारी बळजबरीने पोलिसांच्या मदतीने इन्फोटेक पार्कसाठी चौथ्या टप्प्याची जमीन संपादित करण्यासाठी गेले असता माण येथे पोलिसांनी त्यांच्यावर केलेला गोळीबार

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय सभापती ....**

व लाठीहल्ला, व गोळीबारात काही शेतकरी, महिला व मुले गंभीर जखमी होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. याबाबतीत लक्षवेधी सूचना स्वीकृत करण्यात आलेली आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी " दिनांक 11 मार्च, 2006 रोजी तेलगाव सीना या सोलापूर जिल्ह्यातील गावी एका महिलेची व तिच्या मुलाची नग्न धिंड काढण्यात येणे "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या संदर्भात शासनाने तातडीने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी " छोटा राजन व डी.के.राव यांच्या संवादाच्या कॅसेटमध्ये गृह राज्यमंत्री श्री. सिध्दाराम म्हेत्रे यांच्या नावाचा उल्लेख आल्यामुळे या गुंडांचा संबंध थेट राजकीय व्यक्तींशी येणे, त्यामुळे या गुंडांना अटक केल्यानंतर पोलीस कोठडीत चांगल्याप्रकाराची वागणूक मिळणे, कधी कधी मोबाईल सेवाही उपलब्ध होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. या बाबीसंदर्भातील लक्षवेधी सूचना स्वीकृत करण्यात आलेली आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील व इतर वि.प.स. यांनी " मुंबई उपनगरातील गिरण्यांच्या जमिनींच्या विकासासंदर्भात अलिकडेच सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयामुळे गिरणी कामगार हवालदिल झाला असणे "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**माननीय सभापती ....**

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील व इतर वि.प.स. यांनी " दिनांक 14 मार्च, 3006 रोजी मिरज, जिल्हा सांगली येथील न्यू इंग्लिश स्कूलमधील दहावीच्या परीक्षा केंद्रावर इंग्रजी माध्यमाच्या परीक्षार्थींना भूगोल व अर्थशास्त्र या विषयांच्या प्रश्नपत्रिका कमी पडणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणासंदर्भात शासनाने निवेदन करावे.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण व इतर वि.प.स. यांनी "म्हाडाच्या मुंबई इमारात दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबिरातील बिंबीसार नगर, गोरेगांव (पूर्व) (नवीन बहुमजली इमारत) येथील.....

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, ही नियम 93 अन्वये सूचना मी दिलेली नाही. माझी सूचना वेगळी आहे.

**सभापती** : ठीक आहे, आपण मला दालनामध्ये येऊन भेटा. आपण ती तपासून घेऊ.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे व इतर वि.प.स यांनी "मुंबई गृहनिर्माण मंडळाच्या 42 कोटी रुपयांच्या अपहाराची फाईल तब्बल तीन वर्षे दडपून ठेवण्यात येणे, संक्रमण शिबिर व मालवणी येथील पोलीस सहकारी गृहनिर्माण महासंघ येथील भूखंडाच्या वाटपात म्हाडाला सुमारे 42 कोटी रुपयांच्या आर्थिक खाईत टाकण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो विषय नियम 93 चा होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालावे.

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महाराज, यामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. यावर शासनास निवेदन करावयास सांगावे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी या विषयावर लक्षवेधी सूचना द्यावी.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. विनोद तावडे व इतर वि.प.स. यांनी " राज्याच्या विक्रीकर विभागात कोटयावधी रुपयांचा गैरव्यवहार उघडकीस येणे, विक्रीकर विभागात सी फॉर्म बनावट छापून पर राज्यातून केलेल्या खरेदीवरील विक्रीकरात कोटयावधी रुपयांचा घोटाळा करणारे रॅकेट असणे तसेच या विभागातील अधिकाऱ्यांचाही सहभाग असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो विषय नियम 93 चा होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे, यावर शासनाने निवेदन करावे.

श्रीमती कांता नलावडे : अध्यक्ष महाराज, मी नियम 93 अन्वये एक सूचना दिली होती.

**सभापती** : ठीक आहे, आपण मला माझ्या दालनात भेटावे.

---

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी.**: बीड जिल्हयातील साक्षाळ पिंप्री व पौडुळ या गावात पाटाच्या पाण्यावरुन झालेली मारामारी व पोलिसांनी केलेला गोळीबार.

**मु.शी.**: बीड जिल्हयातील साक्षाळ पिंप्री व पौडुळ या गावात पाटाच्या पाण्यावरुन झालेली मारामारी व पोलिसांनी केलेला गोळीबार यासंबंधी सर्वश्री. विनायकराव मेटे, रणजितसिंह मोहिते- पाटील, प्रा. फौजीया खान, सर्वश्री. गुरुनाथ कुलकर्णी, जितेंद्र आव्हाड, राजेंद्र जैन, सदाशिवराव पोळ, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. लक्ष्मण जगताप, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. विनायकराव मेटे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

" मराठवाडयातील बीड जिल्हयात साक्षाळ पिंप्री व पौडुळ या गावात पाटातून जाणारे तलावाचे पाणी शेतीला घेण्याच्या कारणावरुन तीव्र मतभेद होणे, यातून दोन्ही गावच्या रहिवाशांनी दिनांक 4 मार्च 2006 रोजी एकमेकांवर जोरदार हल्ला करुन गोफनीने दगडांचा मारा करणे, त्यात 200 व्यक्ती जखमी होऊन काहींची प्रकृती चिंताजनक होणे, पोलिसांनी केलेल्या गोळीबारात बऱ्याच व्यक्ती जखमी होणे, परिणामी तेथील जनतेत निर्माण झालेली संतापाची लाट, पोलिसांनी केलेल्या गोळीबाराची चौकशी करण्याची तेथील जनतेकडून होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

श्री. आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदानाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवदेन छापावे ) ...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायकराव मेटे : सभापती महोदय, बीड जिल्हयातील शिरोळ तालुक्यातील साक्षाळ-पिंप्री व पौडुळ या गावामध्ये 4 मार्च 2006 रोजी फार मोठी दंगल झाली. पाटातून जाणारे पाणी शेतीला घेण्यावरुन भांडणे झाली. ही भांडणे 1,2,4,10 अशा लोकांमध्ये न होता ती एका गावातील 400 ते 500 लोक व दुसऱ्या गावातील 400 ते 500 लोक यांच्यामध्ये झाली, मोठ्या प्रमाणात हाणामारी झाली. ही मारामारी आटोक्यात आणण्यासाठी पोलिसांनी हवेत गोळीबार केला. आमच्या हिश्श्याचे पाणी आम्हाला मिळाले नाही म्हणून ही मारामारी झालेली आहे. साक्षाळ पिंप्री येथील पाटातून जाणारे तलावाचे पाणी कालव्याची कामे पूर्ण न झाल्यामुळे खालील गावांना मिळत नाही. हे पाणी काही लोक नदीमध्ये वळवितात, वरच्या गावातील लोकांना हे मान्य नाही.

यानंतर श्री. सांगळे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे ...

अपूर्ण असलेल्या कालव्याचे काम पूर्ण न झाल्याने ही भांडणे होत आहेत. तेथील परिस्थिती पोलिसांनी व्यवस्थितरित्या न सांभाळल्यामुळे दंगल झाली. परिणामी मोठा तणाव निर्माण झाला. म्हणून माझी माननीय पाटबंधारे मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, खालच्या कालव्याचे अपूर्ण असलेले काम पूर्ण झाल्यास गावांमध्ये तंटे निर्माण होणार नाहीत. यादृष्टीने शासन कार्यवाही करील का ?

श्री.आर.आर. पाटील : कालव्याचे अपूर्ण असलेले काम पूर्ण करण्यासाठी संबंधितांना सूचना देण्यात येतील. नदीचे पाणी सोडले तर 650 हेक्टर्स जमीन ओलिताखाली येते. पौंडुळ या गावातील तलावामध्ये 110 हेक्टर्सला पाणी पुरवठा करणारी लिफ्ट इरिगेशन आहे. त्यामुळे या तलावातील पाणी दोन्ही गावांना अपुरे पडते ही वस्तुस्थिती आहे. यासाठी अधिक्षक अभियंता यांना संयुक्त बैठक घेण्याच्या सूचना दिल्या जातील. तसेच पूर्वी केलेल्या नियोजनाप्रमाणे पाण्याचे वाटप करण्यात येऊन कामांमध्ये असलेल्या त्रुटी दूर करुन पुन्हा अशा प्रकारची दंगल होणार नाही याची दक्षता घेतली जाईल.

श्री.दिवाकर रावते : या संबंधी गावक-यांनी वारंवार तक्रारी केलेल्या आहेत. वरच्या आणि खालच्या गावाचा तणाव प्रशासनाच्या आणि पोलिसांच्या निदर्शनास आलेला असताना सुध्दा एवढी दंगल होऊन अनेक लोक जखमी होईपर्यंत या प्रकरणी लक्ष घालण्यात आले नाही हा मूळ मुद्दा आहे. आता या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर. पाटील साहेबांनी या संदर्भात संयुक्त बैठका घेतल्या जातील, कामे केली जातील असे सांगितले. परंतु अगोदर लक्ष न दिल्यामुळे ही घटना घडल्यामुळे यासाठी कोणाला जबाबदार धरणार आहात ?

श्री.आर.आर. पाटील : या प्रकरणी अधीक्षक अभियंता, पाटबंधारे विभागास सूचना देण्यात येतील. साक्षाळपिंप्री येथील ग्रामस्थांनी तलावातील पाणी सोडण्यासाठी पौंडुळ येथून जात असताना पौंडूळ येथील ग्रामस्थांनी त्यांना विरोध केला. अशाप्रकारे त्यांनी शासकीय यंत्रणेचे सहकार्य न घेता स्वत:हून पाणी नेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे ही तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. म्हणून भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी योग्य ती दक्षता घेण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : घडलेल्या घटनेसाठी कोणते अधिकारी जबाबदार आहेत याचे उत्तर अजून आलेले नाही ?

श्री.आर.आर. पाटील : घडलेल्या घटनेसाठी संबंधित लोक जबाबदार आहेत. त्यांना कोणते नेते पाठिशी घालत आहेत याचा शोध घेण्यात येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, साक्षाळपिंप्री येथील लोक सैनिक आहेत. त्यांना थांबविण्याचे आणि मदत करण्याचे काम आम्हीच केलेले आहे, सेनेच्या नेत्यांनी केलेले नाही.

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या ठिकाणी पाण्याचा प्रश्न आहे, नेत्यांचा नाही.

श्री.विनायक मेटे : कालव्याचे काम पूर्ण होणे हाच आमचा मुख्य उद्देश आहे. या ठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर. पाटील यांनी कालव्याचे काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिलेले आहे त्यामुळे मी त्यांचे आभार मानतो.

---

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: धुळे, जळगांव व नंदुरबार जिल्हयातील उपसा जलसिंचन योजना

**मु.शी.**: धुळे, जळगांव व नंदुरबार जिल्हयातील उपसा जलसिंचन योजना. या विषयावर सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, संजय दत्त, रमेश निकोसे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.चंद्रकांत रघुवंशी ( धुळे तथा नंदुरबार स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

" धुळे, नंदुरबार व जळगांव जिल्हयात गेल्या अनेक वर्षांपासून पाण्याची सतत भेडसावणारी समस्या, त्यामुळे धुळे, जळगांव व नंदुरबार जिल्हयातील उपसा जलसिंचन योजना शासनाने ताब्यात घ्याव्यात म्हणून धुळे जिल्हयातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे सतत केलेली तातडीची व आग्रही मागणी, त्यावर या उपसा जलसिंचन योजना तापी पाटबंधारे महामंडळाकडे हस्तांतरीत करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय तथापि, सदर योजना तापी महामंडळाने अद्यापही प्रत्यक्ष ताब्यात न घेतल्यामुळे जिल्हयातील सहकारी बँकांपुढे निर्माण झालेल्या आर्थिक अडचणी तसेच स्थानिक शेतकरी वर्ग देशोधडीस लागून त्यांच्यावर उपासमारीची आलेली पाळी, पर्यायाने त्या परिसरात पसरलेला तीव्र असंतोष, सदरच्या योजना तापी पाटबंधारे विकास महामंडळाने त्वरीत ताब्यात घेण्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व याबाबत शासनाची भूमिका."

श्री.अजित पवार ( जलसंपदा मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेवरील निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केलेल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( निवेदन )

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

( यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सुचनेवरील मा.जलसंपदा मंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, खरे तर हा विषय तापी पाटबंधारे महामंडळापुरता मर्यादित होता. परंतु या लक्षवेधी सुचनेला उत्तर देताना मात्र पूर्ण राज्याच्या बाबतीत उत्तर देण्यात आलेले आहे. आमची या संबंधातील भूमिका एवढीच आहे की, तापी खोऱ्या मध्ये आपण बॅरेजेस करीत आहोत आणि ही बॅरेजेस पूर्ण होण्यासाठी राज्य सरकारनेही निधी उपलब्ध करून दिला आहे. त्याबद्दल मी राज्य सरकारचे आभार मानतो. परंतु ही बॅरेजेस पूर्ण झाल्यानंतर ते पाणी नदी पात्रातून उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातूनच शेतकऱ्याच्या शेतापर्यंत जाणार आहे. एकीकडे पाटबंधारे विभागाने किंवा तापी पाटबंधारे महामंडळाने नवी उपसा सिंचन योजना करण्यासाठी कोट्यवधी रूपयांची अंदाजपत्रके तयार केली. एक एक उपसा सिंचन योजना 500, 600, 1000 कोटीच्या आहेत. एकीकडे सर्वसामान्य शेतकऱ्याने सहकाराच्या माध्यमातून निर्माण केलेल्या उपसा सिंचन योजना काही अडचणींमुळे आज बंद आहेत. अशा जवळ जवळ 64 ते 65 उपसा सिंचन योजना आहेत आणि त्या योजना तापी पाटबंधारे महामंडळाच्या माध्यमातून ताब्यात घ्याव्यात आणि चालवाव्यात असा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतलेला असताना देखील त्याची अमलबजावणी होत नाही. तेव्हा त्या निर्णयाची अमलबजावणी किती दिवसात होणार आहे आणि ज्या जिल्हा मध्यवर्ती बँकांनी किंवा राष्ट्रीयीकृत बँकांनी त्यासाठी कर्ज उपलब्ध करून दिले आहे त्यांनी देखील त्या महामंडळाचे रोखे घेण्यास होकार दिलेला आहे. म्हणजे एकीकडे बँकांचे म्हणजेच पर्यायाने शासनाचे देखील पैसे यातून वसूल होणार आहेत आणि सर्व सामान्य शेतकऱ्याला देखील न्याय मिळेल. म्हणून माझी या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्या उपसा सिंचन योजना तापी पाटबंधारे महामंडळाच्या ताब्यात घेण्यासंदर्भात, मध्यंतरी अधिवेशन नसल्याने काढावयाच्या अध्यादेशाचा मसुदा देखील तयार आहे अशी आमची माहिती आहे तर त्याची अमलबजावणी शासन किती दिवसात करील ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, अशा प्रकारचा निर्णय मंत्रिमंडळामध्ये झालेला होता. परंतु नंतर एक गोष्ट लक्षात आली की, या उपसा सिंचन योजना ताब्यात घेताना शासनाच्या तापी पाटबंधारे महामंडळावर जवळपास साडेतीनशे कोटी रूपयांपेक्षा देखील जास्त आर्थिक बोजा पडतो आहे. तेव्हा शासनाला एका विभागातील या उपसा सिंचन योजना ताब्यात घेऊन त्याचा संपूर्ण आर्थिक भार स्वीकारून नंतर त्याला पूरक अशी आणखी मदत करणे, हे नुसते केवळ तापी

..... एक्स 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

खोऱ्यामध्ये करून चालणार नाही तर राज्यातील इतर विभागामधील अशाच बंद पडलेल्या उपसा सिंचन योजना ज्या आहेत त्याही योजना चालविण्यासाठी ताब्यात घ्याव्यात अशी मागणी होऊ लागली आहे. म्हणजे या भागातील बंद पडलेल्या सहकार तत्त्वावरील उपसा सिंचन योजना आपण ताब्यात घेत आहात आणि त्याचा सगळा खर्च राज्य सरकार देत आहे किंवा तापी पाटबंधारे महामंडळ देत आहे., तर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या संदर्भात असे सांगितले की, राज्यातील सर्वच उपसा सिंचन योजनांची माहिती मागविण्यात यावी. त्याप्रमाणे माहिती घेतली असता महाराष्ट्रात अंदाजे सुमारे 4800 एवढ्या उपसा सिंचन योजना सहकारी तत्त्वावर कार्यरत आहेत असे समजले. या सर्व योजनांना पैसे द्यायचे म्हटले तर फार मोठे आर्थिक बर्डन पडणार आहे. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी असेही सांगितले की, तेथील बँका या महामंडळाचे कर्जरोखे घेण्यास तयार आहेत. अलिकडच्या काळामध्ये महामंडळामध्ये पैसे उभे करीत असताना राज्य सरकार कर्ज रोख्यातून पैसे उभे करीत नाही तर सरळ बजेटमध्ये तरतूद करून पैसे देत असते. पूर्वीच्या काळात अशा पद्धतीने कर्जरोखे उभे करण्याची पद्धत अमलात आणण्यात आली होती परंतु सध्या ती पद्धत बंद करण्यात आलेली आहे. या सगळ्या योजना ताब्यात घेऊन तेथील बँकांना देखील त्यातून मदत व्हावी असे सन्माननीय सदस्यांचे आणि त्या भागातील सर्व लोक प्रतिनिधींचे म्हणणे आहे. परंतु अशा प्रकारच्या ज्या इतर उपसा सिंचन योजना राज्यभरामध्ये आहेत त्यांच्याबाबतीत अंतिम निर्णय मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर किंवा मंत्रिमंडळामध्ये होत नाही तो पर्यंत या संदर्भातील पुढील कार्यवाही जलसंपदा विभागाला करता येत नाही.

( यानंतर श्री. सरफरे ..... वाय 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी धुळे, नंदूरबार व इतर जिल्हयातील उपसा सिंचनाबाबतची स्थिती याठिकाणी सांगितली. मराठवाडयातील संभाजीनगर जिल्हयातील गोदावरी उपसा सिंचन योजनेचे एक अत्यंत मूर्तिमंत उदाहरण आपणास सांगणार आहे. ही योजना उभी करतांना त्यामध्ये शेतकऱ्यांची फसवूणक करण्यात आली आहे. कुणीतरी सहकार सम्राटांनी 5-50 कोटींची ही योजना केली व त्यामधून 5-10 कोटी स्वत:च्या खिशामध्ये घातलें. शेतकऱ्याच्या जमिनीवर कर्ज घेऊन त्यांच्या शिरावर कर्जाचा बोजा ठेवला. जिल्हा सहकारी बॅंकामधून त्यांच्या नावावर कर्ज घेण्यात आले. त्या कर्जाच्या परतफेडीमुळे शेतकरी नागवला गेला. आज त्या सिंचन योजनेंचे काही कोटींचे ॲसेट्स अस्तित्वात आहेत. त्या सिंचन योजनेंच्या निमित्ताने पाण्याचे रिझर्व्हेशन झाले आहे. शेतकरी पाण्यासाठी आसूसलेला आहे, परंतु त्याला पाणी मिळत नाही. तर मग हे सरकार कशासाठी पाहिजे? सरकारने 4800 योजनांचा आकडा याठिकाणी सांगितला. या योजनांचा 50 वर्षानी निर्णय लागणार असेल तर शेतकऱ्यांनी करायचे काय? हे शेतकऱ्यांना लुटणारे सरकार आहे काय? याचा विचार केला पाहिजे. याचा लॉजिकली शेवट कुठेतरी व्हायला पाहिजे. कर्जाच्या थकबाकीमुळे जिल्हा सहकारी बँक अडचणीत आली आहे. सहकार महर्षि श्री. रामकृष्ण बाबा पाटील हे त्यामध्ये सहभागी आहेत. परंतु त्यांच्यावर कोणतीच कारवाई होत नाही. जिल्हा सहकारी बँक अडचणीत आल्यामुळे शेतकऱ्यांना कर्ज मिळत नाही, योजनांचे व्हॅल्युएशन होत नाही. सुरुवातीला शेतकऱ्यांना पाणी देतो असे आमिष दाखवून त्यांच्या नावावर कर्ज घेतले व त्यांच्या डोक्यावर कर्जाचा बोजा ठेवला आहे. त्यांना पाणी मिळाले नाही. पाण्याची अनुमती देण्याचे व प्रोजेक्ट रिपोर्ट मान्य करण्याचे काम जलसंपदा विभागाचे आहे. प्रोजेक्ट रिपोर्टचा अभ्यास करुन व त्याला मान्यता देवून तो वित्तीय संस्थांना सादर करण्यात आला आहे. जिल्हा सहकारी व राज्य सहकारी बँकानी त्यांना आर्थिक पुरवठा केला आहे. एवढे होऊन सुध्दा जर मंत्रिमंहोंदय सर्व योजना पेंडींग ठेवण्याचा विचार करणार असतील तर मग शेतकऱ्यांनी कायदा हातात घेऊन पाहिजे तसा गोंधळ घालावा अशी आपली अपेक्षा आहे काय? माझे असे म्हणणे आहे की, आज त्या योजनेची एकंदरीत किंमत काढून ती योजना गोदावरी सिंचन महामंडळामध्ये समाविष्ट करुन आणि ज्यांच्यामार्फत शेतकऱ्यांच्या पैशाची लूट चालविली आहे त्या संचालक मंडळातील सदस्यांवर तीन महिन्याच्या आत फौजदारी कारवाई हे शासन करणार आहे काय? हे करीत असतांना त्या उपसा सिंचनासाठी करण्यात आलेला खर्च व त्यामध्ये शेतकऱ्यांच्य पैशाची झालेली लूट, त्या योजनेचे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी...

मालकी हक्क ताब्यात घेऊन शेतकऱ्याना पाणी देण्याचा मूलगामी क्रांतिकारी निर्णय तीन महिन्याच्या आत शासन घेईल काय?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना धुळे, नंदूरबार व जळगाव जिल्हयातील उपसा सिंचन योजनांसंबंधी आहे. माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी औरंगाबाद येथील उपसा सिंचन योजनेसंबंधी मुद्दा उपस्थित केला आहे तो या लक्षवेधी सूचनेशी निगडीत नाही. त्याकरीता माननीय सदस्यांनी जर वेगळा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर देण्यात येईल.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सभागृहामध्ये राज्यातील 4800 उपसा सिंचन योजनांचा उल्लेख केला आहे. तेव्हा याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचा प्रश्न आहे. आज त्या ठिक्राणी उपसा सिंचन योजना बंद असल्यामुळे शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही. त्या ठिकाणी असलेल्या उपसा सिंचन योजना चालू करण्यासंबंधी प्रोजेक्ट रिपोर्ट तयार आहे. परंतु यामध्ये शेतकरी, जिल्हा सहकारी बँक व सरकार असे तिघेही अडचणीत आले आहेत. त्यामुळे याचाही विचार झाला पाहिजे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन सहकारी संस्था स्थापन करुन उपसा सिंचन योजना केल्या त्यामध्ये राज्य सरकारचा काहीही सहभाग नव्हता. त्या योजना चालू करण्यासाठी राज्य सरकारच्या जलसंपदा विभागाने पाणी उपलब्ध असल्यास पाण्याचा उचल करण्यास त्यांना परवानगी दिली. त्यानंतर त्या संस्थांच्या संचालक मंडळाने उपसा सिंचन योजना व्यवस्थित चालविण्याकरीता सहकारी बँकांकडून कर्ज घेतले. परंतु कर्ज देतांना बँकेच्या अधिकाऱ्यांनी ज्या उपसा सिंचन योजनेला आपण पैसे उपलब्ध करुन देत आहोत त्या योग्य आहेत कां? व्हायेबल आहेत का? त्या चालतील कां? याचा विचार करुन त्यांनी पैसे उपलब्ध करुन द्यावयास हवे होते. आज महाराष्ट्रात इतक्या मोठया प्रमाणात योजना बंद पडल्या आहेत. त्या बंद पडण्यामागील अनेक कारणे असतील, त्यामध्ये चुकीच्या पध्दतीचे व्यवस्थापन झाले असेल, किंवा काही ठिकाणी पाईप लाईन खराब झाल्यामुळे असेल अशी वेगवेगळी कारणे असतील. त्या संदर्भात शासनाने लक्ष घातले पाहिजे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. परंतु आज राज्यामध्ये पाच सिंचन महामंडळे व जलसंपदा विभागाने हातामध्ये घेतलेली जी अपूर्ण कामे आहेत ती पूर्ण करण्याकरीता त्यांना प्राधान्याने पैसे उपलब्ध करुन

अशोधित प्रत / शीघ्रलेखीय नोंद

श्री. अजित पवार...

देण्याची गरज आहे. ती कामे पूर्णत्वाला नेण्यासाठी काही ठिकाणी गॉर्जफिलिंग करावयाचे आहे, काही ठिकाणी ग्राऊटींग करावयाचे आहे. ही कामे केल्यामुळे शेतकऱ्याच्या शेतामध्ये चाऱ्या किंवा पाटचाऱ्यांमधून पाणी जाणार आहे. आज त्या भागामध्ये उपसा सिंचन योजना करावयाची झाली तर त्याकरीता दुप्पट खर्च येतो. तसेच, उपसा सिंचन योजना केल्यानंतर ती चालविण्यासाठी कायम स्वरुपी वीजेचा खर्च करावा लागतो. महाराष्ट्राच्या काही भागातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता काही भागात उपसा सिंचन केल्याशिवाय शेतकऱ्याच्या शेतामध्ये पाणी जात नाही. राज्याची सद्याची आर्थिक परिस्थिती विचारात घेता धरणे, चाऱ्या व पाटचाऱ्या, केटीवेअर, बॅरेजेसच्या कामांना अग्रक्रम देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या ठिकाणी माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी ज्या उपसा सिंचन योजनेविषयी मुद्दा उपस्थित केला, त्या संदर्भात शासनामार्फत चौकशी चालू आहे. त्या मध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्याच्या दृष्टीने ती बाब तपासून घेऊन दोषी असलेल्या व्यक्तींवर कारवाई करण्यासंबंधी निश्चितपणे खबरदारी घेतली जाईल.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, माझा मूळ प्रश्न वेगळा आहे. या ठिकाणी आपण नंदूरबार जिल्हयाचा संपूर्ण महाराष्ट्राशी संबंध जोडू नका. कारण आज संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दरडोई उत्पन्नामध्ये सुध्दा नंदूरबार जिल्हा हा शेवटच्या क्रमांकावर आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी (पुढे सुरु...

36 व्या क्रमांकावर नंदुरबार जिल्हा आहे. संपूर्ण महाराष्ट्राची तुलना एकत्र केली तर या जिल्ह्यावर अन्याय केल्यासारखे होईल. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, बॅरेजेसची कामे पुढच्या वर्षी म्हणजे 2007 साली पूर्ण होणार आहेत. माझे असे म्हणणे आहे की, बॅरेजेसची कामे पूर्ण झाली तरी कॅनॉलने शेतकऱ्यांच्या शेतात पाणी गेल्याशिवाय एक एकरही शेती ओलीताखाली येणार नाही. बॅरेजेसमधील पाणी उपसा सिंचन योजनेद्वारे उचलल्या शिवाय पर्याय नाही. सर्वसामान्य शेतकऱ्यांनी उपसा सिंचन योजना केलेल्या आहेत. त्यांची विजेची बिले थकलेली आहेत, शेतकरी अडचणीत आलेला आहे. तापी नदी आज कोरडी पडलेली आहे, त्यामुळेही तेथील लिफ्ट इरिगेशन योजना बंद पडलेल्या आहेत. माझी विनंती आहे की, संपूर्ण महाराष्ट्राचा विचार करुन तोच नियम नंदूरबार, धुळे,जळगाव जिल्ह्याला लावला जात आहे. या जिल्ह्यातील सिंचन योजना तापी महामंडळाने ताब्यात ध्याव्यात, असा मंत्रिमंडळामध्ये निर्णय झालेला आहे, त्याची आपण तात्काळ अंमलबजावणी करावी. पुढील वर्षापर्यन्त या सिंचन योजना सुरु झाल्याशिवाय बॅरेजेस बांधून काही उपयोग होणार नाही. बॅरेजेस बांधण्यामध्ये निधी खर्च झाला तर सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाणी जाणार नाही. म्हणून माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, पूर्ण महाराष्ट्राचा एकत्रित विचार न करता नंदूरबार, धुळे, जळगाव या जिल्ह्यांच्याबाबतीत जो मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेला आहे त्याची अंमलबजावणी आपण करणार आहात काय ?

श्री.अजित पवार : राज्याच्या एकंदरीत निधीची उपलब्धता लक्षात घेंता, आता पुरवणी मागण्यांमध्ये वित्त राज्य मंत्री महोदयांनी तापी खोऱ्यातील कामे पूर्ण करण्यासाठी 385 कोटी रुपयाच्या निधीची तरतूद नंदुरबार, जळगाव, धुळे या परिसरातील कामे पूर्ण करण्यासाठी केलेली आहे. एवढ्या मोठ्या रक्कमेतून चार बॅरेजेसची 50-50 कोटी रुपयाची कामे करतो आहोत. यामधून जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढावे, त्यांच्या शेतामध्ये पाणी उपलब्ध व्हावे, त्यांना चांगल्या प्रकारची पिके घेता यावीत, अशी यामागची भूमिका आहे. यासाठी 385 कोटी रुपये उपसा सिंचन योजनांचे पुनरुज्जीवन करण्याकरिता खर्च केले तर पुन्हा या कामासाठी पैसे उपलब्ध होणार नाहीत. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी काही आदेश दिलेले आहे, त्या संदर्भाने माहिती घेतली. आता 385 कोटी रुपयामध्ये त्या परिसरातील बॅरेजेसच्या कामावर खर्च केला तर आजुबाजूच्या विधन विहिरींना पाणी उपलब्ध होऊ शकेल, बाजूला विहिरी आहेत त्या ठिकाणीही पाणी वाढेल. उपसा सिंचन योजनेच्या संदर्भाने सन्माननीय सदस्य श्री.रघुवंशी यांनी पुन्हा पुन्हा सांगितले की,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.अजित पवार (पुढे सुरु.....

राज्याच्या बरोबरीने नंदुरबार,धुळे,जळगाव जिल्ह्ये घेऊ नका, त्यांचा वेगळा विचार करा. शेवटी राज्य चालवत असतांना चांद्यापासून बांद्यापर्यन्त एकाच प्रकारे सगळ्यांचा विचार करावा लागतो. या संदर्भाने मंत्रिमंडळामध्ये चर्चा झाली. त्यानंतर माहिती मागविण्यात आली. आता 385 कोटी रुपये उपलब्ध करुन पाणी अडविले पाहिजे. उपसा सिंचन योजनेच्या संबंधाने काही तरी ठोस अशाप्रकारची भूमिका घ्यावी लागणार आहे. वन टाईम सेटलमेंट करावे लागणार आहे, या सदर्भाने नाबार्ड काही निधी देणार आहे. या संदर्भाने पंतप्रधानांनी राज्यामध्ये एक टीम पाठविलेली होती. त्यांनी विदर्भ भागातील परिस्थिती कशाप्रकारची आहे हे पाहिलेले आहे. या सगळयाचा विचार करुन नंदुरबार, धुळे जळगाव या जिल्ह्यातील उपसा सिंचन योजनेच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करुन त्याबाबत अंमलबजावणी करता येईल, त्याबाबतची कार्यवाही करण्याची भूमिका जलसंपदा विभागाची राहील.

--

3....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

**लक्षवेधी सूचना क्रमांक 3 पुढे ढकलण्याबाबत.**

**उपसभापती** : लक्षवेधी 3 री पुढे ढकलण्यात आलेली आहे.

--

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : औरंगाबाद शहरात व बीड जिल्ह्यात लाखो लिटर्स रॉकेलचा होत असलेला काळाबाजार.

**मु. शी.** : औरंगाबाद शहरात व बीड जिल्हयात लाखो लिटर्स रॉकेलचा होत असलेला काळाबाजार यासंबंधी सर्वश्री दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री अनिल परब, अरविंद सावंत, विनायक मेटे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" औरंगाबाद शहरातील व बीड जिल्ह्यातील जनतेला वितरित करण्यासाठी लाखो लिटर्स रॉकेलचा कोटा पुरविण्यात येणे, सदर रॉकेल गरजू ग्राहकांना अत्यल्प प्रमाणात मिळणे, उर्वरित लाखो लिटर्स रॉकेलचा करण्यात येत असलेला काळाबाजार, सदर काळ्याबाजाराच्या राजरोस चालणाऱ्या व्यवहाराला तेथील पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांची असलेली साथ, निळ्या रंगाचे रॉकेल पांढऱ्या रंगामध्ये बदलणारी माफिया टोळी शहरातील बायजीपुरा, रेंगटीपुरा, कैसर कॉलनी इत्यादी भागात सक्रीय असणे, सदर रॉकेल पेट्रोलमध्ये मिळवून करण्यात येणारी भेसळ व त्यामध्ये कोट्यवधी रुपयांचा होत असलेला व्यवहार, बोगस रॉकेल परवान्याचा सुळसुळाट, रॉकेलच्या काळ्याबाजाराप्रकरणी स्थानिक पोलिसांना देण्यात येणारे हप्ते, या प्रकरणी तेथील जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे तक्रारी करुनही त्याची दखल न घेणे, परिणामी जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता या प्रकरणी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना "

श्री. सुनील तटकरे ( अन्न व नागरीपुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, शिधापत्रिकाधारकांना केरोसीनचा पुरवठा करण्यात येत असून अत्यल्प प्रमाणात केरोसीन मिळत असल्याची शिधापत्रिकाधारकांची तक्रार नाही. सभापती महोदय, सर्वसामान्य शिधापत्रिकाधारकांना वितरकांकडून केरोसीन मिळत नाही अशा तक्रारी मोठ्या प्रमाणावर झालेल्या आहेत. म्हणजे उत्तरात आपण असत्य माहिती दिलेली आहे. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, औरंगाबाद शहरातील बायजीपुरा, रेंगटीपुरा, कैसर कॉलनी भागात निळ्या रंगाचे रॉकेल पांढरे करणारी माफिया टोळी सक्रीय असल्याची बाब जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आलेली नाही. आपण असे म्हणत असाल तर ए.सी.पी. श्री. परशुराम पवार यांच्या नेतृत्वाखाली रेंगटीपुरा येथे घाडी टाकल्या आणि लाखो रुपयांचे रॉकेल पकडले गेले हे सत्य आहे काय ? याची शासनाला कल्पना आहे काय ? रेंगटीपुऱ्याच्या पोलीस धाडीमध्ये धाड टाकल्यानंतर, श्री. आशीष जयस्वाल यांनी जी धाड टाकली त्यामध्ये लाखो लिटर केरोसीन सापडले आणि आरोपी पकडले गेले ही बाब खरी आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी या ठिकाणी विशिष्ट पोलीस अधिकाऱ्यांनी ज्या धाडी टाकल्या त्याबद्दल त्यांनी सांगितले. परंतु या सबंध शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी तपासणी करण्याची मोहीम होती घेतलेली होती त्यामध्ये काही ठिकाणी तशा पध्दतीची नोंद झाली. त्या पध्दतीने काही दुकानदारांवर कारवाई करण्यात आली आहे.

श्री. दिवाकर रावते : त्या ठिकाणी लाखो लिटर्स केरोसीन पकडण्यात आले.

श्री. सुनील तटकरे : त्या ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे.

श्री. दिवाकर रावते : आपण उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, असे काही अस्तित्वात नाही. आपण सभागृहाची दिशाभूल करणारे उत्तर का दिले ?

श्री. सुनील तटकरे : उत्तरामध्ये कोणत्या विषयावर तसे म्हटले आहे ? आम्ही दुकानांच्या तपासण्या केल्या त्यामध्ये जे आढळून आले ते उत्तरात नमूद केले आहे. याबाबतचा जो शब्दप्रयोग आहे त्यातील हा फरक आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : अशा दुकानातून रॉकेल गायब झाल्याची माहिती मिळाली. हे रॉकेल कोण घेऊन जातात, कोण काळाबाजार करतात याची माहिती आपण सदनाला देऊ शकाल काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी जी तक्रार केली त्याच्याही अगोदर वेगवेगळ्या वृत्तपत्रांमधून आलेल्या बातम्यांच्या आधारे त्रिसदस्यीय समिती नेमली आणि त्या माध्यमातून या सर्वच गोष्टींची माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला. पुढील पोलीस तपास चालू आहे आणि आपण जे सांगत आहात त्या पध्दतीने त्यामध्ये योग्य ती कारवाई निश्चितपणे केली जाईल ?

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, आपण आकस्मिक तपासण्या केल्या. त्या तपासणीमध्ये आपल्याला काय आढळून आले ? अशा प्रकारे केरोसीनचा बोगस धंदा करणारे किती लोक आढळून आले ? अनेक दिवसांपासून रेशनिंग कमिटीचा प्रश्न प्रलंबित आहे. परवाच्या बैठकीमध्ये आपण आठ दिवसात, अधिवेशनापूर्वी होईल असे सांगितले होते. आता अधिवेशन सुरु झाले तरी त्या कमिट्या झालेल्या नाहीत.

श्री. सुनील तटकरे : रेशनिंग कमिट्या सगळीकडे स्थापन झालेल्या आहेत. आपल्याकडे एखाद-दुसऱ्या ठिकाणी कमिटी स्थापन व्हावयाची राहिली असेल.

डॉ. दीपक सावंत : आम्हाला कोणतेही पत्र आले नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : अजून कमिट्या झालेल्या नाहीत.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, कोठे कोठे कमिट्या स्थापन झालेल्या आहेत याची माहिती उद्या संध्याकाळपर्यंत सभागृहाच्या पटलावर ठेवतो. सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न अधिक गांभीर्याचा आहे. त्या ठिकाणी आपण जी पाहणी केली त्यामध्ये जे दोषी परवानाधारक आढळून आले त्यामध्ये घाऊक परवानाधारक 15 होते त्यापैकी आपण 5 परवाने रद्द केलेले आहेत.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सुनील तटकरे पुढे सुरु....)

एक परवाना निलंबित केलेला आहे. बाकीच्यांच्या बाबतीत कारवाई सुरु आहे. त्याचप्रमाणे अर्धघाऊक 8 परवान्यांपैकी 1 परवाना रद्द झालेला आहे. किरकोळ वितरकांच्या संदर्भात एकूण 59 तपासण्या केल्या. त्यामध्ये 44 किरकोळ वितरकांचे परवाने रद्द झालेले आहेत.

श्री. दिवाकर रावते : चौकशी समिती कधी नेमली ? चौकशी समितीचा अहवाल कधी अपेक्षित आहे ?

श्री. सुनील तटकरे : चौकशी समिती नेमलेली आहे. श्री. हुबळीकर उपायुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद, श्री. मांढुरके, अप्पर जिल्हाधिकारी, लातूर आणि श्री. विजयकुमार फंडे, निवडणूक उपजिल्हाधिकारी, जालना यांची चौकशी समिती नेमलेली आहे. या समितीने शिफारशी देखील दिलेल्या आहेत. 22 घाऊक परवानाधारक दोषी असल्याचा त्यांनी निष्कर्ष दिलेला आहे. त्यापैकी 7 परवाने रद्द करण्यात आले आहेत. 15 परवानाधारकांची 100 टक्के अनामत रकमा जप्त केलेल्या आहेत. जिल्ह्यातील एकूण 8 परवानाधारक दोषी असल्याचे आढळून आले आहेत. त्यापैकी 3 परवाने रद्द केलेले असून 5 परवानाधारकांच्या 100 टक्के अनामत रकमा जप्त केलेल्या आहेत.

श्री. विनायक मेटे : बीड जिल्ह्यांच्या संदर्भात प्रत्येक अधिवेशनामध्ये प्रश्न उपस्थित होतो. प्रत्येक वेळी माननीय मंत्री महोदय कारवाईचे आश्वासन देतात. चौकशी केल्याचे, कारवाई केल्याचे नाटक होते. मी मागील वेळेस सांगितले होते की, बीड शहरातून दररोज धान्याचे 8-10 ट्रक हैद्राबादमध्ये जातात. बीड जिल्ह्यातील 90 टक्के जीपगाड्या ह्या रॉकेलवर चालतात असे चौकशीअंती आढळून आलेले आहे. हे रॉकेल कोठून येते ? याबाबतीत मी तहसिलदार आणि जिल्हाधिका-यांकडे तक्रारी केल्या. दोन-तीन महिन्यापूर्वी एका माणसाचे शव पेटविण्यासाठी रॉकेल मिळाले नाही त्यामुळे डिझेलने ते शव पेटवावे लागले अशी अवस्था बीड जिल्ह्यामध्ये आहे. केजचे तहसिलदार श्री. मिराशे यांना व्यापा-यांनी मारुति 800 गाडी भेट म्हणून दिलेली आहे. ते तहसिलदार रोज त्या गाडीतून ये-जा करतात. अशा अधिका-यांवर शासन काय कारवाई करणार आहे? अशा अधिका-यांची चौकशी करुन शासन त्यांना सस्पेण्ड करणार आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : रॉकेल आणि धान्य वितरणाच्या बाबतीत सभागृहातील सर्व ज्येष्ठ माननीय सदस्यांनी वारंवार चर्चा उपस्थि करुन गांभीर्याने याबाबतीत भूमिका मांडलेली आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सुनील तटकरे...)

गेल्या महिन्या-दोन महिन्यामध्ये या यंत्रणेतील दोष दूर करण्याच्या दृष्टीने वेगवेगळी उपाययोजना सुरु केलेली आहे. यामध्ये पूर्णपणे पारदर्शकता आणण्यासाठी जिल्हयामध्ये किंवा मुंबई शहरामध्ये जे काही घाऊक परवानाधारक, अर्धघाऊक परवानाधारक आणि किरकोळ वितरक आहेत त्यांची यादी विधानसभा आणि विधानपरिषद सदस्यांना वितरित करण्यासंबंधीच्या सूचना दिलेल्या आहेत.

श्री. दिवाकर रावते : या सूचना केव्हा दिल्या ?

श्री. सुनील तटकरे : गेल्या महिन्यापासून हे सुरु केले...

श्री. दिवाकर रावते : अधिकारी ऐकत नाहीत.

श्री. सुनील तटकरे : असे होणार नाही. तुमचे कोणी ऐकत नसतील, पण माझे कोणी ऐकत नाही असे होईल काय ? माझे ते ऐकतात.

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : माननीय सभापती महोदय, मंत्रीमहोदयांना मार्गदर्शन करण्यासाठी माझा हरकतीचा मुद्दा आहे. मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये 8 दिवसांमध्ये दक्षता समित्या होतील असे आश्वासन मंत्रीमहोदयांनी दिले होते. आज वर्ष झाले तरी या समित्या झालेल्या नाहीत. मंत्रीमहोदय जे आश्वासन देतात त्याची अंमलबजावणी अधिकारी करीत नाहीत म्हणजे अधिकाऱ्यांवर आपले नियंत्रण नाही. आपल्या खात्यामध्ये पारदर्शकता आणीत आहोत असे आपण वारंवार सांगता परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. राज्यातील विविध भागांमध्ये अनेक ठिकाणी धाडी घातल्या आणि करोसिन पकडले गेले. आताच माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी बीड जिल्हयातील उदाहरण दिले. तहसीलदारांवर आपले नियंत्रण असते. केरोसिन परवान्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात द्यावी लागते. परंतु कुठलीही प्रोसेस फॉलो केली जात नाही. मंत्री म्हणून आपण काम करीत आहात परंतु त्याचा अधिकाऱ्यांवर कोणताही परिणाम होत नाही. संभाजीनगरमध्ये धाडी घातल्या. परंतु संबंधितांवर कोणती कारवाई केली ? केरोसिन आणि धान्य वाटपामध्ये भ्रष्टाचार होत आहे म्हणून संबंधितांवर कारवाई होणे आवश्यक आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर सातत्याने गांभीर्याने चर्चा झालेली आहे आणि यातील दोषांबाबत अनेक तक्रारी आल्या होत्या. म्हणून या व्यवस्थेमध्ये फेरबदल करण्याच्या दृष्टीने विविध उपाय आखले आहेत. त्याची अंमलबजावणी प्रत्येक जिल्हयामध्ये सुरु केली. सर्व जिल्हयांमध्ये जाऊन मी माहिती घेतली. महाराष्ट्रामध्ये प्रत्येक रेशन दुकानामध्ये जी कार्डे आहेत किंवा किरकोळ रॉकेल परवानाधारक आहेत त्याला जोडलेली कार्डे आहेत त्यातील ग्राहकांची नांवे त्याचप्रमाणे अंत्योदय,अन्नपूर्णा किंवा बीपीएल खालील लाभार्थींची यादी तयार केलेली आहे आणि ती विधानसभा तसेच विधानपरिषद सदस्यांना देण्यास सांगितलेले आहे. त्यांना देण्यात येणारे नियतन सुध्दा प्रत्येक आमदाराला तसेच जिल्हा परिषद सदस्यांना देण्याचे आदेश मागील महिन्यात पारित करण्यात आलेले आहेत. जिल्हा माहिती कार्यालयामार्फत आणि वर्तमानपत्राच्या माध्यमातून सूचना देण्याबाबत सांगितलेले आहे. मुंबईतील बोगस रेशन कार्डासंबंधातील मोहीम सुरु करण्यात आली आहे. मुंबई सर्व आमदारांची बैठक बोलाविण्यात आली होती. आपले ज्येष्ठ सहकारी त्या बैठकीला हजर होते. आपण व्यस्त असल्यामुळे येऊ शकला नाही. मुंबईतील किती बोगस कार्ड निलंबित केली याची माहिती त्यावेळी मी सदस्यांना दिली होती. त्याचप्रमाणे ठाणे,पुणे याठिकाणी सुध्दा मी स्वत: जाऊन माहिती घेतलेली आहे. प्रत्येक गोष्टीमध्ये

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ..

पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. यापूर्वी या व्यवस्थेमध्ये दोष होते हे मला मान्य आहे. म्हणूनच त्यामध्ये फेरबदल करण्यात आला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी स्पेसिफिक उदाहरण देत आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार याची मला माहिती पाहिजे. केरोसिन वाटपामध्ये गैरप्रकार चालजतात. गरजूंना ते न मिळता ब्लॅकमध्ये विकले जात आहे. हॉटेलमध्ये वापरले जात आहे. टॅक्सीमध्ये तसेच काळी-पिवळी जीपमध्ये वापरले जात आहे. हॉटेलमध्ये देण्यात येणाऱ्या कोटयापलिकडे विकत घेतले जात आहे. याबाबतीत नियंत्रण आणण्यासाठी शासन कोणत्या पध्दतीने उपाययोजना करणार आहे ?

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

येत्या महिन्यात यासंदर्भात एक स्वतंत्र असा सेल राज्यात शासनाने चालू करावा व संबंधितांविरुध्दच्या कारवाईचा अहवाल सभागृहासमोर सादर करावा अशी आमची अपेक्षा आहे.

श्री. सुनील तटकरे : महोदय, केरोसीनच्या बाबतीत आम्ही आश्वासित केरोसीनची व्यवस्था केली आहे. त्यामुळे केरोसिनची बचत होऊन पुरवठयात वाढ झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जे जे मुद्दे उपस्थित केले त्या सर्व गोष्टी लक्षात घेऊन आम्ही उपाययोजना करु व हे अधिवेशन संपण्यापूर्वी राज्यात किती प्रमाणात ड्राइव्ह पूर्ण होईल, किती रेशन कार्ड्स तात्पुरते निलंबित करण्यात आले, त्यातून किती केरोसीन वाचलेले आहे व उरलेल्या ग्राहकांना ते किती प्रमाणात वाढवून देत आहोत ही सर्व माहिती पटलावर ठेवण्यात येईल आणि ज्या ज्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले असेल त्यांच्याविरुध्द खातेनिहाय चौकशी करुन उचित कारवाई करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्ये केरोसिनच्या बाबतीत कशा प्रकारे काळा बाजार होतो हे शोधून काढले असे सांगण्यात आले, किती लायसन्स रद्द करण्यात आले व कशा प्रकारे काळा बाजार झाला हे सांगितल्यानंतर त्याला जबाबदार असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांच्याविरोधात कारवाई जर केली नाही तर या सभागृहात लक्षवेधी सूचना उपस्थित करुन उपयोग होणार नाही आणि शासनाचा देखील या खात्यावर वचक राहणार नाही. म्हणून जबाबदार अधिकाऱ्यांच्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात येईल हे शासनाने जाहीर करावे.

श्री. श्रीकांत जोशी : महोदय, औरंगाबाद शहरात सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या संदर्भात काय परिस्थिती आहे हे देखील सदनाच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. मी माननीय मंत्री महोदयांना आपल्या मार्फत विचारु इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी 15 दिवसांपूर्वी औरंगाबाद शहरातील वर्तमानपत्रांतून या केरोसीनच्या बाबतीत लेखमालाच चालविली आहे व त्यामध्ये सर्व अड्डयांसह माहिती दिली आहे. या शहरात 12 नाफ्थ्याचे टँकर्स दर महिन्याला येतात आणि पेट्रोल पंपावर जातात व पेट्रोलमध्ये नाफ्था मिसळला जातो. यासंदर्भात जेवढया तक्रारी झाल्या व त्यानुसार जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी कारवाया केल्या त्यापैकी किती कारवायांवर उपायुक्तांनी स्थगिती दिलेली आहे ? माझ्या माहितीप्रमाणे अशा प्रकारे 350 बातम्या छापून आलेल्या आहेत. त्यापैकी किती कारवायांमध्ये उपायुक्तांनी स्टे दिलेला आहे व हे किती दिवस चालणार आहे? किती अधिकाऱ्यांना शासनाने कारवाई करुन घरी पाठविले आहे

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न विचारले त्यानुसार मी सांगू इच्छितो की, जे जे परवाने रद्द केले त्याची माहिती यापूर्वीच दिलेली आहे. तसेच उपायुक्तांनी किती प्रकरणांमध्ये कारवाईला स्टे दिलेला आहे त्यासंबंधीची माहिती मी उद्यापर्यंत घेतो व ती स्थगिती योग्य होती की अयोग्य याबाबतची छाननी करुन उचित कारवाई करण्याचे आदेश दिले जातील. तसेच आपण सांगत आहात त्याप्रमाणे या सर्व प्रकरणाची चौकशी विभागीय आयुक्तांनी केली असल्यामुळे त्यामध्ये जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश आजच देण्यात येतील व त्यासंबंधीची माहिती 15 दिवसात सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरावजी चव्हाण नेहमीच सांगत असत की, ज्याप्रमाणे घोडेस्वाराची घोडयावर पक्की मांड असते त्याप्रमाणेच प्रशासनावर देखील शासनाची पक्की मांड असल्याशिवाय प्रशासन नीट चालत नाही. मघाशी माननीय पुरवठा मंत्र्यांनी सांगितले की, आमची मांड पक्कीच आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनायकराव मेटे यांनी या ठिकाणी अत्यंत पोटतिडीकीने त्यांच्या भागातील प्रश्न मांडला की, त्या भागात रॉकेलचा वापर सरसकट जीपमधून केला जातो. अशा प्रकारे 800 गाडया त्या भागात चालतात. त्यासंदर्भात शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

यानंतर श्री. भारवि .....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

**उपसभापती** : महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री कै.यशवंतराव चव्हाण यांचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी येथे केला आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांना विचारू इच्छितो की, त्यावेळी विधान परिषदेचे उपसभापती कोण होते ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री विनायकराव मेटे, गुरूनाथ कुलकर्णी यांनी बीड जिल्हयातील मुद्दा उपस्थित केला आहे. तेथील तहसिलदारासंबंधी त्यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. त्यासंबंधीच मी असे सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी ज्या तहसिलदारासंबंधी सांगितले आहे, त्यांची चौकशी विभागीय आयुक्त यांच्या मार्फत करण्यात येईल. यात ते दोषी आढळले तर त्यांच्याविरूध्द कारवाई करण्यासंबंधी महसूल विभागाला कळविण्यात येईल.

श्री.धोंडिराम राठोड : सभापती महोदय, बोगस रॉकेल परवान्याचा प्रश्न देखील महत्त्वाचा आहे. आज राजरोस बोगस रॉकेल परवाना मिळत आहे. त्यावर शासनाचे नियंत्रण आहे काय ? 10-15 वर्षापूर्वी रद्द झालेल्या रॉकेल परवान्याचे मंत्रालयातून नूतनीकरण करून दिले जात आहे. जालना जिल्हयातील डी.एस.ओ.ने रद्द झालेल्या परवान्याचे नूतनीकरण करून दिले नाही म्हणून त्यास बदनापूर येथील दुकानदाराने भर रस्त्यात मारले. डी.एस.ओ.ने नूतनीकरणास मान्यता दिली नाही तर गुंड प्रवृत्तीचे दुकानदार शासनाच्या अधिकाऱ्यांना मारतात हे योग्य आहे काय ? असे प्रकार घडले आहेत काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रालयातून रद्द झालेल्या रॉकेल परवान्याचे नूतनीकरण करण्यात येते असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. म्हणजे सदर परवान्याचे नूतनीकरण मंत्रिमहोदय करतात काय ? तसेच, मंत्रालयातून नूतनीकरण करण्यास डी.एस.ओ.कडून नकार दिला जातो म्हणून त्यांना मारले जाते काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.धोंडिराम राठोड यांचा प्रश्न हा मूळ लक्षवेधी सूचनेशी संबंधित नाही. त्यामुळे त्यांना हा प्रश्न अन्य आयुधांच्या मार्फत उपस्थित करावा. मूळ लक्षवेधी सूचनेतील विषय हा औरंगाबाद शहर आणि बीड जिल्हया पुरताच मर्यादित आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.सुनील तटकरे यांनी महाराष्ट्रातील वितरण व्यवस्थेमध्ये कशा पध्दतीने सुधारणा केली आहे, कारभारात कशाप्रकारे पारदर्शकता आणली आहे यासंबंधीची माहिती येथे दिली. त्यामुळेच जालना जिल्हयातील विषय मूळ विषयाशी निगडित असा आहे. औरंगाबाद शहर आणि बीड जिल्हयातील अधिकाऱ्यां विरूध्द कोणती कारवाई करण्यात येईल व या प्रकरणी गुंतलेल्या अधिकाऱ्यांची नावे काय आहेत ? या प्रश्नांसंबंधीच उत्तरे द्यावीत असे मी मंत्रिमहोदयांना सांगितले होते. परंतु, त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात कोणती कारवाई करण्यात येत आहे यासंबंधीचे उत्तर दिले. त्यातून सन्माननीय सदस्य श्री.धोंडिराम राठोड यांचा प्रश्न उपस्थित झाला. मंत्रिमहोदयांनी महाराष्ट्राची चर्चा स्वत:हून ओढून घेतली. त्यामुळे रद्द करण्यात आलेल्या रॉकेल परवान्याचे नूतनीकरण करण्यासंबंधीचा प्रश्न येथे उपस्थित झाला.

श्री.सुनील तटकरे. : सभापती महोदय, औरंगाबाद शहर आणि बीड जिल्हयातील केरोसिनच्या प्रश्नासंबंधी लक्षवेधी सूचना विचारली आहे. लक्षवेधी सूचनेतील विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्रभर कोणती कारवाई करण्यात आली आहे व त्यासंबंधी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे हे आपल्या समोर ठेवले आहे. जालना जिल्हा महाराष्ट्रामध्ये आहे याची मला कल्पना आहे. परंतु, लक्षवेधी सूचनतील विषय हा जालना जिल्हयातील विषयाशी संबंधित नाही हे कृपा करून लक्षात घ्यावे.

...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सभापती तालिका नामनिर्देशित करणे.

**उपसभापती** : मी महाराष्ट्र विधान परिषद नियम 8 (1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित केल्याचे घोषित करतो :-

1 श्रीमती सुधा जोशी.

2 श्री.गुरूनाथ कुलकर्णी.

3 श्रीमती कांता नलावडे.

4 श्री.अरविंद सावंत.

विशेष उल्लेखाच्या सूचना नसल्यामुळे आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि सायंकाळी 4.15 वाजता पुन: भरेल.

(3.39 ते 4.15 वाजे पर्यंत मध्यंतर)

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

:: **स्थगितीनंतर** ::

( **सभापतीस्थानी माननीय उपसभापती** )

**शासकीय विधेयके**

**पृ.शी**. : कारखाने (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO.1 OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE FACTORIES ACT, 1948, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

डॉ.विमल मुंदडा ( सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 1- कारखाने अधिनियम, 1948, महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 1 मांडते.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी**. : स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे

(स्थापना व विनियमन) विधेयक.

**L.C. BILL NO.X OF 2006.**

**(A BILL TO PROVIDE FOR ESTABLISHMENT OF SELF-FINANCED UNIVERSITIES IN THE STATE; TO REGULATE THEIR WORKING AND FUNCTIONS AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)**

श्री.सुरेश शेट्टी (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 10-राज्यात स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठांची स्थापना करण्याची तरतूद करण्यासाठी, त्यांच्या कामकाजाचे व कार्यांचे विनियमन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 10 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी**. : राज्य सार्वजनिक उपक्रम (पुनर्रचना व इतर विशेष तरतुदी) (सुधारणा) विधेयक.

**L.C. BILL NO.XI OF 2006.**

**(A BILL TO AMEND THE MAHARASTHRA STATE ENTERPRISES (RESTRUCTURING AND OTHER SPECIAL PROVISIONS) ACT, 2000.)**

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 11-महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम (पुनर्रचना व इतर विशेष तरतुदी) अधिनियम, 2000 यामध्ये सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 11 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**<u>संत तुकाराम महाराजांच्या झालेल्या अवमान प्रकरणी निवेदन करण्याबाबत</u>**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, तुकाराम महाराजांच्या संदर्भात दुपारपर्यंत निवेदन करण्यात येईल असे सभागृहाच्या नेत्यांनी सांगितले होते. परंतु अद्यापपर्यंत ते निवेदन झालेले नाही. शासनाकडून हे निवेदन कधी होणार आहे ? या सदनामध्ये 12 सदस्य हे शिक्षक प्रतिनिधी आहेत. त्यामुळे या विषयाचे महत्व या सदनामध्ये अधिक आहे. अत्यंत चुकीची अशी गोष्ट महाराष्ट्रामध्ये घडलेली आहे. त्यात सुधारणा करणे आवश्यक आहे म्हणून आम्ही आग्रह धरीत आहोत. त्यामुळे हे निवेदन नेमके केव्हा होणार आहे ?

**उपसभापती** : आपण निदर्शनास आणून दिल्यानंतर मी सभागृह नेत्यांना निरोप दिलेला आहे.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

**उपसभापती** : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी मांडला असून त्यास सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी अनुमोदन दिले आहे. सदरहू प्रस्ताव प्रस्तुत झालेला आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेकरिता गुरुवार, दिनांक 16 मार्च व सोमवार, दिनांक 20 मार्च, 2006 असे एकूण दोन दिवस चर्चा होणार आहे. चर्चेसाठी एकूण सुमारे 4 तास उपलब्ध आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तराचा एक तास सोडून उर्वरित 3 तासांचा वेळ सन्माननीय सदस्यांना भाषणाकरिता देण्यात येईल. प्रस्तावकांना 10 मिनिटे देण्यात येतील व प्रस्तावाला पाठिंबा देणारे अनुमोदक 10 मिनिटे भाषण करतील. तसेच माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या भाषणासाठी 30 मिनिटे देण्यात येतील. ज्या सन्माननीय सदस्यांना चर्चेत भाग घ्यावयाचा आहे त्यांनी आपली नावे आपल्या पक्षाच्या प्रतोदांच्यामार्फत माझ्याकडे 10 मिनिटांत नावे पाठवावीत. नावे प्राप्त झाल्यानंतर वेळेचे बंधन घालावे काय याचा विचार करता येईल.

आता प्रस्ताव मांडणाऱ्या सदस्या श्रीमती सुधा जोशी ह्या भाषण करतील. तद्नंतर प्रस्तावाला अनुमोदन देणारे सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी भाषण करतील.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाची इंग्रजी प्रत न मिळाल्याबाबत</u>**

श्री. मधुकर सरपोतदार : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय राज्यपालांनी इंग्रजीमध्ये भाषण केले आणि आम्हाला त्या भाषणाची मराठी भाषेतील प्रत मिळालेली आहे. आम्हाला इंग्रजी भाषेतील प्रत मिळालेली नाही. त्या संदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाचे जे मराठीमध्ये भाषांतर आहे, ते इंग्रजीमध्ये केलेल्या भाषणाचेच आहे हे समजायला आम्हाला मार्ग नाही म्हणून माझी आपणास विनंती आहे की, सभागृह 10 मिनिटे तहकूब करुन सन्माननीय सदस्यांना इंग्रजी भाषेतील अभिभाषणाची प्रत उपलब्ध करुन द्यावी.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना दोन्ही भाषेतील प्रती देण्यात आलेल्या आहेत.

श्री. मधुकर सरपोतदार : इतर सन्माननीय सदस्यांना इंग्रजीतील प्रती मिळाल्या की नाही हे मला माहित नाही. परंतु मला माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाची इंग्रजी प्रत मिळालेली नाही.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना ताबडतोब अभिभाषणाची इंग्रजी प्रत उपलब्ध करुन द्यावी.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी केलेले अभिभाषण जरी इंग्रजीमध्ये असले तरी त्याचे भाषण मराठीतून ऐकण्यासाठी इअरफोन्स होते. हे भाषण आपण सर्वांनी ऐकलेले आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा.

( चर्चा पुढे सुरु ....

श्रीमती सुधा जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडते.

" राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधानपरिषदेचे सदस्य त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. "

माननीय सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे. सन 2005-2006 हे वर्ष अनेक नाट्यपूर्ण घटनांनी भरलेले आहे. जुलै महिन्यात राज्यावर फार मोठी नैसर्गिक आपत्ती आली. अभूतपूर्व असा पाऊस पडून मुंबई, कोकणात हा:हाकार उडाला. तसेच त्यानंतर राज्याच्या इतर भागामध्ये अतिवृष्टीचे संकट भेडसावत होते. 1200 लोक मृत्यूमुखी पडले, 27 हजार जनावरे दगावली. जवळजवळ 17 हजार घरे पडली. या संकटाचा मुकाबला शासनाने मोठ्या धैर्याने व सक्षमपणे केला. लोकांना संकटप्रसंगी तात्काळ मदत मिळावी या हेतूने प्रेरित होऊन राज्यातील स्वयंसेवी संस्था, लोकप्रतिनिधी या सगळ्यांनी मेहनत केली.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी पुढे सुरु...

तरी कमतरता राहणे अपरिहार्य होते, आणि प्रसार माध्यमांनी ही कमतरता पुढे आणण्यात कोणतीच कसर सोडलेली नाही. थोडेफार प्रमाणात त्याचे भांडवल केले, मला येथे एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की, ज्या कमी वेळात आपण बहुतांशी पूर परिस्थितीने बाधीत झालेल्या लोकांना सहाय्य करुन त्यांचे पुनर्वसन केले आहे. ही बाब अत्यंत प्रशंसनीय अशी आहे. अमेरिके सारख्या बलाढय आणि संपन्न राष्ट्रातही न्यूऑर्लीसमध्ये कॅटरिनाचा हाहा:कार उडाला. तेव्हा तेथील जनतेची दैना उडाल्यानंतर कित्येक महिने त्यांचे पुनर्वसन करण्यास त्यांना वेळ लागला आहे. त्या मानाने आपल्या शासनाने अत्यंत त्रोटक व तुटपुंजी साधन सामुग्री असतांना धडक कार्यक्रम हाती घेऊन केलेले काम नक्कीच प्रशंसनीय आहे. शेतकऱ्यांच्या पिकांची नुकसान भरपाई सरकारने दिली, तसेच इतर पुरग्रस्तांना नुकसान भरपाई दिली आहे. यासाठी शासनाने आतापर्यंत 1200 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. या संदर्भात दूरगामी योजना करण्याबाबत शासनास बरेच काम करावयाचे आहे. पूर येण्याच्या कारणांचा पुष्कळ ऊहापोह करण्यात आलेला आहे. पातळ आणि छोटया प्लॉस्टिकच्या पिशव्यांवर बंदी घालण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. यामध्ये पळवाटा शोधून प्लॉस्टिकच्या पिशव्यांचा वापर अजूनही सुरु आहे म्हणून यामध्ये शासनाने दक्ष राहून जे दोषी असतील त्या दोषीवर शासनाने कडक कारवाई केली पाहिजे अशी माझी सूचना आहे. मिठी नदीच्या संदर्भात "मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण " व "महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण " यांची स्थापना झालेली आहे. माझी माननीय अर्थमंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी या दोन्ही प्राधिकरणांसाठी अर्थसंकल्पामध्ये मोठया प्रमाणात आर्थिक तरतूद करावी तसेच माननीय मुख्यमंत्री महोदयांनी केंद्र सरकारकडून या प्राधिकारणासाठी भरघोस अशी मदत आणावी, ज्यायोगे या दुरगामी योजना शक्य तितक्या लवकर अंमलात येऊ शकतील.

आपल्या पुढील दुसरे संकट म्हणजे गेल्याच महिन्यात नंदूरबार जिल्हयामध्ये बर्ड फ्लू ची साथ मोठया प्रमाणात आली होती, त्यामध्ये शासनाने धडक कृती कार्यक्रम आखून या साथीची लागण इतरत्र फारसी पसरु दिली नाही. तसेच दोन दिवसांपूर्वी जळगांव जिल्हयामध्ये बर्ड फ्लू ची लागण झाल्याची बातमी आलेली आहे. या संदर्भात देखील शासन कडक उपायोजना करुन ही साथ आटोक्यात आणेल याबाबत आम्हाला खात्री आहे.

.....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या भाषणावर सभागृहामध्ये चर्चा सुरु असतांना त्यांची नोंद कोणतेही मंत्री महोदय घेत नाहीत.

**उपसभापती** : सभागृहात मंत्री महोदया उपस्थित आहेत त्या नोंदी घेत आहेत.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थिती बिघडली आहे त्यास महाराष्ट्रातील दुष्काळजन्य परिस्थिती कारणीभूत झाली आहे.

यानंतर श्री. सांगळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.अरविंद सावंत**

श्रीमती सुधा जोशी ....

जमिनीची कमी उत्पादकता, शेतीवरील वाढते खर्च यामुळे ब-याच प्रमाणात शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत. यासाठी शेतक-यांची हलाखी दूर करण्यासाठी दूरगामी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. विदर्भातील कापूस उत्पादकांच्या समस्यांवर शासनाने एक खास पॅकेज योजिलेले आहे. तसेच कमी खर्चात शेतीची उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने महापीक अभियान योजना आखली आहे. यावर्षी झालेली अतिवृष्टी व अवर्षणग्रस्त भागात महापीक अभियान योजनेचा चांगला परिणाम झाल्याचे माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात म्हटले आहे. बेकायदेशीर सावकारांवर कारवाई करण्याबाबत शासनाने अतिशय कडक पावले उचलली आहेत ही समाधानाची गोष्ट आहे, पण शेतक-यांना सुलभ हप्त्याने कर्जपुरवठा होण्याबाबत शासनाने नाबार्ड आणि जिल्हा बँकांमार्फत धडक कार्यवाही करण्याबाबतची सूचना शेती खात्याला द्यावी अशी मी शासनाला विनंती करते. राज्यापुढील विजेचे संकट हे पूर्वीच्या युती सरकारच्या असमंजस वृत्तीचा व धोरणांचा परिपाक आहे यात शंका नाही. यावर गेल्या 6-7 वर्षांपासून शासनाकडून उपाय योजिले जात आहेत. तात्कालिक उपाय योजून विजेचा तुटवडा कायमचा झटकन नाहीसा होईल असे नाही. तरी सुध्दा भारत सरकारचे भरीव अर्थसहाय्य व आमच्या सरकारची धडक कृती या परिस्थितीतून बाहेर काढण्याकरिता कारणीभूत ठरली आहे. यासाठी नवीन परियोजना हाती घेऊन खाजगी क्षेत्राच्या गुंतवणुकीतून जनरेशन कॅपॅसिटी वाढवून लवकरच विजेची टंचाई दूर करण्याचा शासनाने निर्धार केला आहे. तो अतिशय स्तुत्य आहे. मुंबई शहरात भारनियमन करायला लागू नये म्हणून माननीय केंद्रिय उर्जा मंत्री व माजी मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदेजी यांनी आपल्या पदाचा कार्यभार सांभाळल्यानंतर अल्पावधीतच केलेल्या धडक कृतीबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करते. राज्य वीज मंडळाचे विभाजन करुन तीन स्वायत्त कंपन्या करण्यात आल्या आहेत. या प्रत्येक कंपन्यावर दिलेली जबाबदारी पार पाडली जाईल अशी मला खात्री आहे. विजेच्या चोरीबाबत कडक उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. तसेच डिस्ट्रीब्युशन नेटवर्कमध्ये सुधारणा करणे महत्वाचे आहे. 7000 गावांना सिंगल फेज पुरवठा पोहचलेला आहे. सन 2006-07 मध्ये आणखी 10,000 गावांना सिंगल फेज पुरवठा केला जाणार आहे. शासनाने अक्षय प्रकाश योजनेची अंमलबजावणी सुरु आहे. तसेच उर्जा अंकुर निधी स्थापन करुन अपारंपारिक उर्जाची निर्मिती करण्याचा शासनाने जो विचार केला आहे तो अतिशय स्त्युत्य आहे. सभापती महोदय, मुंबई शहर हे केवळ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी ....

महाराष्ट्राचा केंद्रबिंदू नाही तर भारतातील सर्वात महत्वाचे अर्थव्यवहाराचे केंद्र आहे. त्यामुळे मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनविण्याचा आपण संकल्प सोडलेला आहे व यासाठी माननीय पंतप्रधानांनी लक्ष घातलेले आहे. मुंबईतील तीन महत्वाच्या प्रकल्पांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत तरतूद केलेली आहे. 11,000 कोटी रुपयांचे 4-5 प्रकल्प केंद्रीय सहाय्यासाठी शासनाने सादर केलेले आहे. याबाबत पाठपुरावा करुन केंद्र सरकार आणि नियोजन आयोग यांच्याकडून जास्तीत जास्त निधी मिळविण्याची आवश्यकता आहे. या प्रकल्पांव्यतिरिक्त एमएमआरडीए आणि महानगरपालिका यांनी रस्ते विस्ताराचा धडक कार्यक्रम हाती घेतलेला आहे. आज मुंबईमध्ये सगळीकडे रस्ते खोदलेले दिसून येतात. या प्रसंगी खोदलेले सर्व रस्ते पावसाळयापूर्वी व्यवस्थित करावे अशी मी शासनाला विनंती करते. या संदर्भात मी शासनाला आणखी एक विनंती करु इच्छिते की, व्हीटी ते पनवेल या मार्गावर सबरबन सेवा सुरु आहे. परंतु कोकण रेल्वेच्या लांब पल्ल्याच्या जलद गाडया मुंबई, ठाणे, दिवा व पनवेल अशा मार्गाने जातात. या गाडया व्हीटी-पनवेल थेट मार्गावर आणण्यासाठी शासनाने रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा करावा. त्यामुळे कोकणच्या प्रवाशांचा वेळ 1-2 तासांनी वाचू शकेल.

( यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी ....

शिवडी-न्हावा ट्रान्स हार्बर जलसेतू मार्गी लावताना त्याच्या जोडीने रेल्वे मार्ग आणण्याच्या सुचनेचाही जरूर विचार करावा आणि त्याही योजनेचा यामध्ये अंतर्भाव व्हावा ही माझी आणखी एक विनंती आहे. सभापती महोदय, मुंबईतील सर्वात मोठी समस्या ही घरांची आहे म्हणून निवाऱ्यासाठी झोपडपट्ट्या वाढत आहेत. या झोपडपट्टीवासीयांसाठी, गरीबांसाठी गृहनिर्माण आणि पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी मुंबई सह मोठ्या शहरांसाठी जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी क्षेत्र नवीकरण कार्यक्रम आणि इतर शहरांसाठी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम राबविण्याचा निर्णय हा अत्यंत स्तुत्य असाच आहे.

सभापती महोदय, आयटी क्षेत्रामध्ये आपल्या राज्याने चांगलीच प्रगती केली आहे आणि त्याबद्दल आपल्या राज्याला पुरस्कार देखील मिळाले आहेत. त्याबद्दल संबंधितांचे मनापासून अभिनंदन. पण अजूनही हैद्राबाद आणि बंगलोरच्या तुलनेने नाव घेण्याजोगे एकही शहर आपल्याकडे नाही असे खेदाने म्हणावे लागते आहे. पुणे शहराचा त्या दृष्टीने आपल्याला विकास करता येणे शक्य आहे. आयटी कॅपिटल ऑफ इंडिया तेथे आपण उभारू शकतो. पुणे येथे त्या दृष्टीने पायाभूत सुविधा देण्यासाठी मुंबईच्या धर्तीवर प्लॅनिंग केले पाहिजे. मध्यंतरी शेतकऱ्यांच्या जमिनीबद्दल निर्माण झालेला वाद, मुख्यत्वे करून पुण्यामध्येच निर्माण झाला होता, तो वाद सामंजस्याने सोडविला पाहिजे. आयटी क्षेत्राच्या दरम्यान विकासासाठी शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा विचार करून कारवाई करून त्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून पावले उचलणे आवश्यक आहे. वीज तुटवडा या समस्येचे पुण्यातून अग्रक्रमाने उच्चाटन करणे, रस्ते, पाणी यासाठी ठोस योजना बनविणे या गोष्टींकडे प्राधान्याने लक्ष देणे आवश्यक आहे असे मला आवर्जून येथे सांगावयाचे आहे.

मला हे नमूद करावयास अत्यंत आनंद होतो आहे की, आपल्या रोजगार हमी योजनेच्या धर्तीवर भारत सरकारने आता राष्ट्रीय ग्रामीण विकास अधिनियम, 2005 जारी केला आहे. आपली योजना त्यांना पथप्रदर्शक वाटली आणि त्यांनी तत्सम योजना देशातील 200 जिल्ह्यांमध्ये नेण्याचे ठरवून आपला एक प्रकारे गौरवच केला आहे. आपले राज्य हे प्रगतीशील पावले उचलणारे राज्य आहे याचेच हे द्योतक आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यामध्ये आपल्या राज्यातील 12 जिल्ह्यांची निवड केली आहे. पण दुर्दैवाने कोकणातील एकही जिल्हा त्यात नाही हे खेदाने नमूद करावेसे

..... जेजे 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वाटते. महाराष्ट्र राज्याने 2 फेब्रुवारी 2006 पासून रोजगार मागणाऱ्या व्यक्तींसाठी एकात्मिक ग्रामीण रोजगार हमी योजना सुरू केली आहे. आपल्या रोजगार हमी योजनेशी निगडित फलोत्पादन योजनेला जे यश मिळाले आहे ते लक्षात घेऊन भारत सरकारच्या कृषी खात्याने फलोत्पादनाच्या सर्वांगीण विकासासाठी नुकताच राष्ट्रीय फलोत्पादन अभियान हा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू केला आहे. त्या अंतर्गत आपल्या 23 जिल्ह्यांसाठी 161 कोटी रूपयांच्या कृती योजनेस मंजुरी दिली आहे. जलसाठ्याचा जास्तीत जास्त उपयोग व्हावा म्हणून ठिबक सिंचन पद्धतीचा फलोत्पादनात उपयोग करण्यासाठी अनुदानात भरघोस वाढ करून ते 25 टक्के वरून 50 टक्क्यांवर नेले आहे.

आदिवासी कल्याण, आदिवासी मुलोंच्या शिक्षणा संदर्भात अनुसूचित जाती कल्याण, एकंदरीतच शिक्षण, आरोग्य, बालकल्याण यांसाठी आपले सरकार प्रयत्न करीत आहे. 65 हजार अंगणवाड्यांना आहार पुरवठा करण्यासाठी महिलांचे स्वयं सहाय्यता गट तसेच महिला मंडळे यांना सहभागी करण्याचे ठरवून सुमारे 53 लाख बालकांना पूरक आहार देण्यात येईल. या योगे महिला मंडळे बचत गट सक्षम होतील आणि हजारो महिलांना रोजगार मिळेल. हा कार्यक्रम महिलांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये जलस्वराज्य प्रकल्पाचा उल्लेख आहे आणि त्यात असे म्हटले आहे की, 'महिलांना सक्षम करणे ही या प्रकल्पाची ठळक वैशिष्टये आहेत.ञ मला याचा नीटसा अर्थ कळला नाही. पिण्याच्या पाण्यासाठी डोक्यावर हंडे घेऊन मैलोन् मैल वणवण फिरायला लागणार नाही म्हणजे एक प्रकारे महिलांना सक्षम केले असे आपल्याला म्हणावयाचे आहे का ? ...

( यानंतर श्री. सरफरे .... केके 1 ..श

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्रीमती सुधा जोशी...

बाल कामगार प्रथेच्या उच्चाटनासाठी संयुक्त कृती दलाची स्थापना केली आहे. या योजनेची सुरुवात मुंबई, ठाणे या जिल्हयांपासून झाली आहे. मुलांचे बालपण हिरावून घेणाऱ्या या प्रथेचा नायनाट करण्यासाठी डोळयात तेल घालून शासनाने दक्ष राहायला पाहिजे. कुठल्याही पळवाटा काढून मुलांचे शोषण हे प्रस्थापित लोक करतात. परंतु त्याचबरोबर या मुलांचे काम काढून घेतल्यावर त्यांच्या शिक्षणाची आणि त्यांचे पोट भरण्याची योजना आखणेही जरुरीचे आहे. हे विसरुन चालणार नाही. पोलीस खात्याच्या आधुनिकीकरणाची योजना स्तुत्य आहे. पोलीसांची 10500 नवी पदे निर्माण करण्यात येणार आहेत. अनुकंपा तत्वावर भरती करण्यासाठी असलेली प्रतिक्षा यादी देखील खूप मोठी आहे. तिचाही सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात यावा.

यंदा मुंबई विद्यापीठाचे शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष सुरु होत आहे. त्यासाठी भारत सरकारने भरघोस अनुदान जाहीर केले आहे. महाराष्ट्र सरकारनेही तसेच भरघोस अनुदान आपल्या अर्थसंकल्पात जाहीर करावे आणि मुंबई विद्यापीठानेही उच्च प्रतीचे उपक्रम राबवून आपली उज्ज्वल परंपरा राखावी. आणि जागतिक कीर्ति संपादन करुन जगातल्या नामांकित विद्यापीठांमध्ये महत्वाचे स्थान मिळवावे.

एक खास बाब ज्यांचा माननीय राज्यपालांनी उल्लेख केला ती म्हणजे ज्येष्ठ श्रेष्ठ कवी माननीय श्री. विंदा करंदीकर यांना मिळालेला ज्ञानपीठ पुरस्कार. हा मराठी साहित्याला देशाने केलेला मानाचा मुजरा आहे. उत्तुंग व्यक्तमत्वाच्या ऋषीतुल्य विंदांना माझे शतश: प्रणाम. आपले सभागृह देखील त्यांचा यथोचित सन्मान करील. पुन्हा एकदा माननीय राज्यपाल महोदयांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार मानते आणि माझे भाषण पूर्ण करते.

धन्यवाद.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सदनाच्या माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांनी माननीय राज्यपाल महोदयांनी या सदनाच्या सदस्यांसमोर केलेल्या अभिभाषणाबद्दल अभिनंदन करणारा ठराव मांडलेला आहे आणि तो ठराव मांडीत असतांना त्यांनी याठिकाणी आपले विचार व्यक्त केले आहेत. त्या ठरावाला अनुमोदन देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे. सभापती महोदय, राज्यपाल महोदयांचे अभिभाषण म्हणजे काय? राज्यपाल महोदयांचे अभिभाषण म्हणजे हे राज्य शासन कोणत्या दिशेने जात आहे? कोणत्या दिशेने काम करीत आहे? हे काम करीत असतांना राज्याच्या निरनिराळया विभागामध्ये विखुरलेल्या जनतेचे निरनिराळे प्रश्न असतील ते प्रश्न हे शासन कशापध्दतीने सोडवीत आहे यासंबंधी उद्बोधक असे मार्गदर्शन ते आपल्या अभिभाषणामध्ये नेहमी करतात. सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, 1999 सालापासून या सदनामध्ये दोनच सदस्य राज्यपाल महोदयांच्या अभिनंदनाचा ठराव मांडतात. माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी ठराव मांडतात तर श्री. गुरुनाथ कुलकर्णी त्या ठरावाला अनुमोदन देतात. सभापती महोदय, आपल्याला माहीत आहे की, 1999 मध्ये युती सरकारकडून लोकशाही आघाडीकडे हे सरकार आल्यानंतर त्या वेळेपासून किती आर्थिक टंचाईमध्ये सापडले आहे यासंबंधीचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये झाला आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (पुढे सुरु...

संपूर्ण आर्थिक शिस्त मोडली गेल्यामुळे हे राज्य संकटात आले. याबाबतीत राज्यपाल महोदयांनी मार्गदर्शन केलेले आहे, ते सभागृहासमोर मांडण्यात आले. मला आठवते की, सन 1999 मध्ये युती शासनाच्या साडेचार वर्षाच्या कालखंडामध्ये जवळजवळ 23 हजार कोटी रुपयाचा महसूल राज्य शासनाकडे जमा होत होता. त्यानंतर हे शासन सत्तेवर आल्यानंतर 31 मार्च हे वर्ष संपते त्यावेळेस 51 हजार कोटी रुपयाचे महसुली उत्पन्न राज्याने मिळविलेले आहे. म्हणून सन्माननीय राज्यपाल महोदय सातत्याने अभिभाषणातून राज्य शासनाची दिशा, त्या संदर्भातील मार्गदर्शन करत असतात. म्हणून मी माझ्या वतीने, माझ्या पक्षाच्या वतीने माननीय राज्यपाल महोदयांचे या निमित्ताने अभिनंदन करतो आणि आभारही व्यक्त करतो. राज्यपाल महोदयांनी राज्यातील निरनिरळे प्रश्न यामध्ये हाताळलेले आहेत...

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय सदस्यांचा मंत्रिमंडळात सहानुभूतीने विचार करावा असा उल्लेख करता येईल.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन 2005-2006 हे वर्ष राज्याला कष्टमय गेलेले आहे. दिनांक 26 आणि 27 जुलैला राज्यामध्ये जी अतिवृष्टी झाली, त्यामुळे संपूर्ण राज्य हादरुन गेलेले होते. मुंबईमध्ये तसेच संपूर्ण महाराष्ट्रामध्ये इतका कधीही पाऊस झालेला नव्हता. दोन-चार तासामध्ये जवळपास 48 इंच पाऊस झाला. असा पाऊस कधीही पहायला मिळालेला नाही. मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, मराठवाडा या सर्व भागामध्ये मोठ्याप्रमाणात अतिवृष्टी झाली. अशा परिस्थितीला शासन सामोरे गेलेले आहे. या काळामध्ये 1200 जणांचे मृत्यू झालेले आहेत आणि 27 हजार जनावरे मेलेली आहेत, हजारो लोकांचे संपूर्ण संसार उध्वस्त झाले. अशा परिस्थितीमध्ये राज्य शासनाने खंबीर पावले उचलली. लोकांना धान्य उपलब्ध करुन दिले, रॉकेल उपलब्ध करुन दिले. तसेच 450 कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करुन दिला. अमेरिका आर्थिकदृष्ट्या समर्थ देश असूनही अमेरिकेतील कतरिना येथे वादळ झाले, तेव्हा त्या ठिकाणी एक महिना कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडलेली होती. त्या ठिकाणी कोण कोणाचे नव्हते. त्या लोकांकडे जे काही होते, त्याची लुटमार झाली, महिलांवर अन्याय, अत्त्याचार झाले. परंतु महाराष्ट्र राज्य हे सुसंस्कृत राज्य आहे. मुंबईसारख्या ठिकाणी अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण होऊन देखील या ठिकाणी कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (पुढे सुरु....

झालेला नाही. उलट अडचणीत सापडलेल्या लोकांना इतर लोकांनी मदत केली. मग ते हिंदु असतील, शीख, ईसाई असतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य हे वेगळ्या प्रकारे विषय मांडत आहेत. त्यांनी कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात आपले मत मांडलेले आहे. मला निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, कालच सोलापूरमध्ये एका दलित महिलेला नग्न करुन तिची धिंड काढलेली आहे. तीन वर्षापूर्वी गोंदिया या ठिकाणी नग्न महिलेची धिंड काढण्यात आली होती. त्यामुळे सन्माननीय सदस्य ज्या पध्दतीने विषय मांडत आहेत, ते विसंगत आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी दिनांक 26 आणि 27 जूनला मुंबईमध्ये अतिवृष्टी झाली, त्या संदर्भातील कायदा व सुव्यवस्थेचा विषय मांडला. राज्याच्या अन्य ठिकाणी कोणत्या घटना घडतात, हे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मांडले. तो या ठिकाणी माझा चर्चेचा विषय नाही. मी दिनांक 26 आणि 27 जून रोजी अतिवृष्टी झाली,त्या संदर्भातील विषय मांडला. या संदर्भाने सनमाननीय राज्यपाल महोदयांनी दिशा दाखविलेली आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील विजेची टंचाई लक्षात घेऊन, येत्या पाच वर्षामध्ये 29,000 कोटी रुपयाची गुंतवणूक करुन सुमारे 7,500 मेगावॅट इतक्या क्षमतेची विजेची निर्मिती करण्याची योजना आखलेली आहे, त्याबरोबरच पारेषण यंत्रणेमध्ये सुधारणा करण्यासाठी 11,000 कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची योजना आखल्याचा उल्लेख राज्यपाल महोदयांनी केलेला आहे, त्याच्याशी मी सहमत आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

सभापती महोदय, यापूर्वीही या सभागृहामध्ये विजेच्या प्रश्नावर चर्चा झाली. आज या राज्यामध्ये 4500 मेगावॅट विजेची कमतरता आहे. राज्य शासनाच्यावतीने अभिवचन देण्यात आलें आहे की, ज्यावेळी हे सरकार पाच वर्षाची आपली टर्म पूर्ण करील आणि नव्याने निवडणुकीला सामोरे जाईल त्यावेळी हे राज्य विजेच्या बाबतीत सरप्लस राहील. याबाबत माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात उल्लेख केलेला आहे. म्हणून मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करतो. राज्यपालांनी अतिवृष्टीच्या संकटात सरकारने केलेली 1200 कोटी रुपयांची मदत, पोलीस दलाचे आधुनिकीकरण करणे, रोजगार हमी योजना, पडीक जमिनीचा विकास, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, इ ोपडपट्टी विकास योजना, बर्ड फ्लू, माहितीचा अधिकार अशा योजनांसह वीज निर्मिती आणि आर्थिक गुंतवणूकीबाबत माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये आढावा घेतलेला आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी या ठिकाणी अतिशय महत्वाचे विचार मांडत असताना समोर जे माननीय मंत्रिमहोदय बसलेले आहेत त्यांनी सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील एकही शब्द लिहिलेला नाही. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. मस्के हे कोरा कागद दाखवत आहेत.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या अभिभाषणमध्ये माननीय राज्यपाल महोदयांनी ऑगस्ट, 1999 ते ऑगस्ट 2005 या कालावधीत सुमारे 53 हजार कोटी रुपयांच्या 3833 गुंतवणुक प्रस्तावांना मान्यता दिल्याबाबतचा उल्लेख केलेला आहे. राज्यात खाजगी क्षेत्रांनी 12,500 मेगावॅट विद्युत निर्मितीची क्षमता असलेले वीज प्रकल्प प्रस्तावित केले असून 2006-07 या वर्षात परळी, पारस आणि घाटघर येथे प्रत्येकी 250 मेगावॅट वीज निर्मिती करण्याचे अभिवचन दिलेले आहे. पारेषण यंत्रणेत सुधारणा करण्यासाठी पुढील पाच वर्षात 4900 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची योजना असल्याचे माननीय राज्यपाल महोदयांनी सांगितलेले आहे. अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पाच्या संदर्भात "ऊर्जा अंकुर निधी" स्थापन करण्याचा निर्धार माननीय राज्यपालांनी बोलून दाखविलेला आहे. मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनविण्यासाठी मुंबईच्या विकास प्रकल्पांसाठी जागतिक बँक आणि जपान सरकार यांनी आर्थिक सहाय्य देण्याची तयारी दर्शविली असून त्याचा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी .....

उल्लेख माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये केलेला आहे. पर्जन्य जलवाहिन्या आणि मलनि:स्सारण प्रकल्प, मध्य वैतरणा पाणी पुरवठा प्रकल्प, मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प, वांद्रे-वरळी सागरी जोडमार्ग प्रकल्प आणि मिठी नदी विकास प्रकल्प यासाठी 1 हजार कोटी रुपयांची मागणी केंद्र सरकारकडे तातडीने करण्यात येत असून जरी केंद्र शासनाने ताबडतोब या पैशाची व्यवस्था केली नसेल तर त्या पैशाची वाट न पाहता मुंबई नागरी सुविधा प्रकल्प, वांद्रे-वरळी सागरी जोडमार्ग आणि मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाचे काम सरकारने या पूर्वीच सुरु केलेले आहे अशी माहिती माननीय राज्यपालांनी दिलेली आहे. पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाचा आढावाही माननीय राज्यपालांनी घेतलेला आहे. गेल्या पाच सहा वर्षापासून आपण पाहतो की, या राज्याचे पोलीस दल कोणतीही आधुनिक हत्यारे नसताना कामकाज करीत होते. गेल्या चार पाच वर्षामध्ये राज्य शासनाकडून आणि केंद्र शासनाकडून पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी अधिकाधिक निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याचा पाठपुरावा राज्य शासनाने प्रामाणिकपणे केलेला आहे. पोलिसांना आधुनिक शस्त्रे पुरवणे, ड्युटीच्या ठिकाणी त्यांच्या गरजा पूर्ण करणे, त्यांच्या हाऊसिंगचा प्रश्न सोडवणे याबाबतीतही या अभिभाषणात उल्लेख केलेला आहे. त्याचबरोबर ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेले ज्येष्ठ साहित्यिक श्री. विंदा करंदीकर यांचे माननीय राज्यपाल महोदयांनी जनतेच्यावतीने अभिनंदन केलेले आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न केली 40 वर्षे प्रलंबित आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी पुढे सुरु...)

मागच्या वेळी जेव्हा माननीय राज्यपाल महोदय हे पहिल्या प्रथम आपल्या राज्याचे राज्यपाल म्हणून आले त्यावेळी त्यांच्या संदर्भात काही प्रश्न निर्माण करण्याचा प्रयत्न आपल्या राज्यामध्ये झाला. माननीय राज्यपाल महोदय हे अगोदर कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री होते. त्यानंतर केन्द्र शासनाने त्यांची महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्ती केली. माननीय राज्यपाल हे कर्नाटक राज्याचे माजी मुख्यमंत्री असल्यामुळे ते महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादासंबंधी किती बोलतील यासंदर्भात शंका उपस्थित करण्यात येत होत्या. परंतु माननीय राज्यपाल महोदयांच्या मागील आणि याही वेळच्या अभिभाषणामध्ये महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादासंबंधी स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद सुटावा, तेथील मराठी माणसाला न्याय मिळावा अशी भूमिका राज्य शासनाने वारंवार घेतलेली आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद हा सर्वोच्च न्यायालयामध्ये गेलेला असून त्यामधून चांगला निवाडा बाहेर येऊन हा वाद संपुष्टात येईल अशी अशा माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये व्यक्त केलेली आहे, त्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन करतो, आभार मानतो आणि माननीय सदस्य श्रीमती सुधाताई जोशी यांनी जो अभिनंदनाचा ठराव मांडलेला आहे त्याला अनुमोदन देऊन माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे पुनश्च एकदा आभार मानून मी माझे दोन शब्द संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

(सुधारणा मांडण्यात आल्या नाहीत.)

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्रीमती सुधाताई जोशी यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल अभिनंदनाचा प्रस्ताव मांडलेला आहे. माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी त्या प्रस्तावाला अनुमोदन दिलेले आहे. महामहिम राज्यपाल हे प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला राज्य सरकारचे धोरण ज्यामध्ये प्रतिबिंबीत असते असे अभिभाषण दोन्ही सभागृहासमोर करतात. त्या अभिभाषणामध्ये या राज्याची पुढच्या कालखंडातील वाटचाल कशी राहील याचे दिगदर्शन केलेले असते. मी या अभिभाषणाचे समर्थन करणारच नाही. परंतु या अभिभाषणातून महाराष्ट्रातील जनतेला काय मिळाले याचा मात्र उहापोह निश्चितच करणार आहे. खरे म्हणजे माननीय राज्यपालांचे अभिभाषण हे राज्य सरकारचे धोरण असते. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील क्रमांक 3, 4, 5, आणि 6 या मुद्यांमध्ये या राज्यामध्ये 26 जुलैला जे अतिवृष्टीचे संकट ओढवले त्यासंबंधी उहापोह केलेला आहे. 23 जुलैला आपल्या विधिमंडळाचे अधिवेशन संपले आणि 26 जुलैला या राज्यामध्ये अतिवृष्टीला सुरुवात झाली. गेल्या 50 वर्षामध्ये कधी पडला नसेल इतका पाऊस त्यावेळी पडला. ही अतिवृष्टी केवळ मुंबई शहरापुरती मर्यादित नव्हती. महाराष्ट्रातील जवळपास 14 जिल्ह्यांमध्ये या अतिवृष्टीचा फटका बसला. कोटयवधी रुपयांचे नुकसान झाले. जवळपास 1200 माणसे मृत्यूमुखी पडली. 27000 जनावरे या महापुरात वाहून गेली. शेतक-यांच्या जमिनीचे अतोनात नुकसान झाले. नद्यांच्या काठावर जी शेत जमीन होती ती शेत जमीन संपूर्णपणे खरवडून गेली. अनेक घरांची पडझड झाली, तर अनेक घरे उद्ध्वस्त झाली. आपद्ग्रस्त शेतक-यांना 450कोटी रु.चे सानुग्रह अनुदान दिल्याचे सांगितले गेले. हे अनुदान उशिरा दिले गेले. त्यावेळी जो सर्वे करण्यात आला त्यामध्ये राजकारण केले गेले.

...नंतर कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

अनेक शेतकरी मदतीपासून वंचित राहिले. त्यांना आवश्यक ती मदत मिळाली नाही. माझी माहिती चुकीची नसेल तर आजतागायत सुध्दा पुरामध्ये सापडलेल्या शेतकऱ्याला खऱ्या अर्थाने मदत मिळालेली नाही. पश्चिम महाराष्ट्रात सुध्दा अनेक शेतकरी असे आहेत की ज्यांच्यापर्यंत मदत पोहोचली नाही. सरकार गतीमान आहे असे सांगितले जाते. मुंबईवर असे महाभयानक संकट आले त्यावेळी सरकारने सांगितले की मुंबईवरील संकट हे मिठी नदीमुळे आले. नदीला आलेल्या पुरामुळे आजूबाजूच्या परिसरामध्ये आणि घरांमध्ये पाणी घुसले त्यामुळे अनेक घरे उध्वस्त झाली आणि पाण्याखाली गेली. तसेच घरातील सामानही पाण्याखाली गेले. मुंबईमध्ये भविष्यात अशा प्रकारचे संकट उभे राहू नये यासाठी दिनांक 19 ऑगस्ट,2005 रोजी शासनाने मिठी नदी विकास संरक्षण प्राधिकरणाची स्थापना केली. मागील वर्षी ऑगस्टमध्ये या प्राधिकरणाची स्थापना झाल्यावर आता 15/20 दिवसांपूर्वी मिठी नदीच्या सुधारणेच्या कामास सुरुवात झालेली आहे. म्हणजे 6 महिन्यानंतर कामाला सुरुवात झाली आहे त्यावरुन हे सरकार किती गतीमान आहे याची आपणांस कल्पना येईल. पाऊस उघडल्यानंतर लगेचच कामाला सुरुवात झाली असती तर आजपर्यंत मिठी नदीचे पात्र मोकळे झाले असते. सरकारने प्लॅस्टीक पिशव्यांवर बंदी आणली याचा उल्लेख करण्यात आला. या प्लॅस्टीक थैल्यांमुळे मुंबईमध्ये महापूर आला आणि शहरामध्ये प्लॅस्टीक थैल्यांमुळे हा:हाकार माजला असे चित्र रंगविण्यात आले. परंतु मुळात प्लॅस्टीक थैल्या हे कारण नाही. मिठी नदीचे पात्र गेल्या 25-30 वर्षापासून अरुंद होत गेल्यामुळे आणि आलेल्या प्रचंड पावसामुळे नदीतील पाणी फुगले आणि आजूबाजूच्या परिसरामध्ये पाणी शिरले. मी त्या परिसराचा दौरा केला होता. मिठी नदीचे पात्र दिवसेंदिवस अरुंद होत आहे. तसेच पात्रामध्ये अवैध बांधकाम झालेले आहे. अतिक्रमण झालेले आहे. या पात्रामध्ये इतक्या प्रचंड प्रमाणात अवैध बांधकाम आणि अवैध धंदे चालू आहेत त्यातून हा प्रश्न निर्माण झाला आहे. आज मिठी नदीच्या काठावर अनेक घरे वसलेली आहेत. मिठी नदीचे पात्र अरुंद झाल्यामुळेच हे प्रकार घडत आहेत. या परिसरातील लोकांची मागणी आहे की, मिठी नदीचे पात्र रुंद झाले पाहिजे. याबाबत सरकारकडे वारंवार तक्रारी केल्या पण सरकारने ऐकले नाही. त्यामुळे भारतीय जनता पार्टीच्या एका पदाधिकाऱ्याने हायकोर्टात धाव घेतली. त्यानंतर शासनाला जाग आली आणि शासनाने मिठी नदीच्या रुंदीकरणाच्या कामाची घोषणा केली. आताच या कामाचे भूमिपूजन झालेले आहे. याठिकाणी

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MHM/ MAP/ SBT/ पूर्वी श्री.शिगम 17:00

श्री. पांडुरंग फुंडकर ...

सांगितले की, सरकार गतीमान आहे. 19 ऑगस्ट 2005 रोजी मिठी नदीच्या रुंदीकरणाच्या कामाची घोषणा करण्यात आली आणि प्रत्यक्षात काम जानेवारी महिन्यामध्ये सुरु करण्यात आले. आता आम्हांला चिंता आहे की पावसाळयापूर्वी मिठी नदी मोकळी होणार आहे किंवा नाही ? महाराष्ट्रात आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण स्थापन झाले आहे. नैसर्गिक संकट सांगून येत नाही. पूर्वीच या राज्यामध्ये हे प्राधिकरण व्हावयास पाहिजे होते. जे कार्यान्वित होते ते कोठे काम करीत होते हे समजत नाही. आता पुन्हा एकदा सरकारने या प्राधिकरणाचा पुनरुच्चार केला आहे. हे प्राधिकरण किती प्रमाणात कार्यान्वित राहील हे सांगता येणार नाही. प्लॅस्टीक पिशव्यांवर बंदी घातल्याने मुंबईवरील संकट थांबणार नाही. राज्यपालांच्या अभिभाषणातील 3,4,5 आणि 6 मुद्यांमध्ये अतिवृष्टीवर भर देण्यात आला आहे. परंतु अतिवृष्टीमध्ये सापडलेल्या लोकांना पाहिजे त्या प्रमाणात मदत झालेली नाही.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

केंद्रशासनाकडून जी मदत जाहीर केली होती ती सुध्दा त्या लोकांपर्यंत पोहचली नाही आणि त्याचे वाटप झालेले नाही. सातव्या मुद्दयामध्ये माननीय राज्यपालांनी सांगितले की, कर्जबाजारीपणा आणि नापिकी यामुळे वैफल्यग्रस्त होऊन शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या. गेल्या सहा वर्षांमध्ये या राज्यात जवळपास 1200 शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या आहेत. हे राज्य कुठल्या क्षेत्रात नंबर वन नसेल पण हिंदुस्थानामध्ये आत्महत्त्यांच्या बाबतीत मात्र नंबर वनचे राज्य जरुर म्हणता येईल. अशा प्रकारे या आत्महत्त्यांच्या बाबतीत अभिभाषणामध्ये इतके थातुरमातूर उत्तर अपेक्षित नव्हते. आत्महत्त्यांच्या मुद्दयाला इतके गौण स्थान या अभिभाषणामध्ये देण्यात आलेले आहे. या आत्महत्त्यांच्या संदर्भात शासनाने डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये विदर्भासाठी पैकेज जाहीर केले व त्या पॅकेजमुळे तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या थांबल्या काय ? असा माझा सरकारला सवाल आहे. डिसेंबरच्या अधिवेशनात ज्यावेळी पॅकेज जाहीर केले होते त्यावेळी शासनाच्या वतीने असे सांगण्यात आले होते की, शेतकऱ्यांचा चढउतार निधी जो कापूस उत्पादक शेतकऱ्यांकडून 3 टक्के रकमेपोटी सन 1972 पासून कपात केलेला जवळपास 750 कोटीचा निधी आम्ही देऊ व अशा प्रकारे एक हजार कोटीचे पॅकेज जाहीर केले होते. परंतु ज्यावेळी सरकारने 1000 कोटीचे पॅकेज जाहीर केले त्यामध्ये 750 कोटी शेतकऱ्यांची 3 टक्क्याच्या माध्यमातून कपात केलेली रक्कम समाविष्ट केली. अशा प्रकारे सरकारने 1000 कोटीचे पॅकेज जाहीर करुन शेतकऱ्यांवर उपकार केलेले नाहीत. कारण त्यात 3/4 रक्कम त्यांचीच आहे. सरकार हे पैसे का देत आहे तर सरकारची कापूस एकाधिकार योजना चालविण्याची कुवत राहिलेली नाही. गेल्या दोन वर्षांपासून राज्यात कापूस एकाधिकार खरेदी योजनाच अस्तित्वात नाही. मागील दोन तीन अधिवेशनांपासून आम्ही सांगत आहोत की, कच्चा कापूस पणन कायदयासंबंधीचे विधेयक सभागृहात आणावे, कारण या कायदयाची मुदत संपलेली आहे. मुदत संपलेली असल्यामुळे या कायदयान्वये कापसाची खरेदी करता येणार नाही. मागील वर्षीच्या बजेट अधिवेशनात आम्ही ही मागणी केली, जुलै आणि डिसेंबर या दोन्ही अधिवेशनांमध्ये सुध्दा आम्ही सातत्याने मागणी करीत आहोत पण माननीय मंत्री महोदयांचे त्यावर एकच उत्तर आहे की, हे विधेयक आपण पुढील अधिवेशनामध्ये आणू. डिसेंबर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

महिन्यात मागणी केली असता त्यावेळी सांगण्यात आले की, हे विधेयक विधि व न्याय विभागाकडे पाठविलेले आहे. या विधेयकाच्या माध्यमातून कायदयाला दरवर्षी मुदतवाढ घेणे एवढेच फक्त सभागृहाचे काम होते पण ते सरकारकडून करण्यात आले नाही. म्हणून आम्ही विचारले की, हे बिल जर मंजूर होत नसेल आणि हा कायदा अस्तित्वात नसेल तर या राज्यातील कापूस एकाधिकार खरेदी योजनेअंतर्गत कपात करण्यात आलेला शेतकऱ्यांचा चढ-उतार निधी सरकारला आपल्याजवळ ठेवता येणार नाही. कारण हा कायदाच अस्तित्वात नसल्यामुळे त्या कायदयाअंतर्गत कपात करण्यात आलेला पैसा शेतकऱ्यांना दिलाच पाहिजे, तो शासनाला आपल्याजवळ ठेवता येणार नाही. त्यावेळी मंत्री महोदयांनी सांगितले होते की, शेतकऱ्यांकडून कापण्यात आलेली 750 कोटीची रक्कम आम्ही देण्याचा विचार करीत आहोत. आम्हाला असे वाटले की या अधिवेशनामध्ये माननीय मंत्री महोदय घोषणा करतील व सलगपणे हा पैसा शेतकऱ्यांना वाटप करण्यात येईल पण मोठया हुशारीने सरकारने पॅकेज जाहीर केले, त्याला राज्यभर प्रसिध्दी मिळविली, विदर्भातील सहा जिल्हयांसाठी पॅकेज जाहीर करतो म्हणून मोठया प्रमाणात प्रसिध्दी झाली परंतु त्यामध्ये ही शेतकऱ्यांकडून 1972 पासून 3 टक्क्याच्या माध्यमातून कपात करण्यात आलेली रक्कम सुध्दा समाविष्ट करुन टाकली. अशा प्रकारे हे पॅकेज जाहीर करुन त्यामध्ये हा पैसा टाकला. मागच्या डिसेंबरमध्ये पॅकेज जाहीर केले परंतु त्याची अंमलबजावणी मात्र अद्यापही झालेली नाही. आत्महत्त्या झालेल्या शेतकऱ्यांसाठी पॅकेज जाहीर केले, मला तर वाटले होते की, सरकार आत्महत्त्या झालेल्या शेतकऱ्यांच्या दारात जाऊन त्याला ताबडतोब मदत देईल, त्याच्या मुला-बाळांना धीर देईल, त्याच्या पत्नीला लगेच मदत करील परंतु पॅकेज डिसेंबरमध्ये जाहीर केले आणि जी.आर. मात्र 27.2.2006 रोजी निघाला.....

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

चलना शिवाय किसान क्रेडिट कर्ज मंजुरीबाबतचा जी.आर.दिनांक 8.2.2006 रोजी, राष्ट्रीय कृषि विमा योजना अंतर्गत विमा हप्त्यात सवलत देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक 24.2.2006 रोजी, शेती संलग्न व्यवसायाला चालना देण्यासंबंधीचा शासन निर्णय दिनांक 27.2.2006 रोजी, सामुहिक विवाह योजनेचा शासन निर्णय दिनांक 17.2.2006 रोजी, भांडवल निधीची परतफेड करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक 18.2.2006 रोजी, शेतकऱ्यांच्या मार्गदर्शनसाठी हेल्पलाईन सुरू करण्यासंबंधीचा शासन निर्णय दिनांक 23.2.2006 रोजी निर्गमित करण्यात आला.

सभापती महोदय, पॅकेज जाहीर झाल्यानंतर शासनाने जी.आर.निर्गमित केले आहेत. सामुहिक विवाह योजनेसंबंधीचा जी.आर.दिनांक 17 फेब्रुवारी 2006 रोजी निर्गमित करण्यात आला व त्यात नमूद करण्यात आले आहे की, 31 मार्च 2006 नंतर शेतकऱ्यांच्या मुलींकरिता विवाहासाठी पैसे मिळणार नाहीत. म्हणजे शेतकऱ्यांच्या मुलींसाठी ही सवलत फक्त सव्वा महिन्यासाठी देण्यात आली. शासनाने शेतकऱ्यांसाठी पॅकेजची घोषणा डिसेंबरमध्ये केली व त्या संदर्भातील शासन निर्णय फेब्रुवारीमध्ये निर्गमित करण्यात आले. ज्या शेतकऱ्यांच्या मुलींची लग्ने 31 मार्च 2006 नंतर होणार आहेत, त्यांना शासनाच्या जी.आर.प्रमाणे लग्नासाठी अनुदान मिळणार नाही. त्यामुळे ही जी मुदत आहे, ती वाढवून दिली पाहिजे. शासनाने जर खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांसाठी पॅकेज जाहीर केले असेल तर त्यासाठी मुदतीचे कारण असता कामा नये. कापूस 6 जिल्हयांमध्ये पिकतो. विदर्भाच्या पश्चिम भागामध्ये कापूस पिकतो म्हणून विदर्भाच्या पूर्व भागामध्ये मदत करणे गरजेचे नाही असे धोरण स्वीकारणे योग्य नाही. विदर्भाच्या पूर्व भागामध्ये धान पिकवणारे शेतकरी आहेत. आज विदर्भ, मराठवाडा, खानदेश मधील शेतकरी आत्महत्या करीत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे लोण आता कोकणात येऊन ठेपले आहे. आज संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. विदर्भातील सहा जिल्हयांसाठी शासनाने थातुरमातूर असे पॅकेज जाहीर केले आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना पॅकेजमध्ये विशेष सवलत देण्याचे जाहीर केले. सन्माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख सभागृहात आहेत. ते विदर्भातील आहेत. मी त्यांना विचारू इच्छितो की, आपल्या शासनाने आज विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी किती मदत दिली ? हेक्टरी एक हजार रुपये दोन हेक्टरच्या मर्यादेपर्यंत शासनाने मदत जाहीर केली आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

म्हणजेच एकरी 400 रुपये मदत दिली आहे. अशाने शासनाने कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा विश्वासघात केला आहे. लोकशाही आघाडीने जाहीरनाम्यामध्ये कापसाला 2700 रुपये भाव देऊ असे सांगितले होते. परंतु, शेतकऱ्यांसाठी जे पॅकेज शासनाने जाहीर केले आहे, ते उपकाराच्या भावनेतून जाहीर केले आहे असे दिसते. केंद्र सरकारच्या हमी भावाप्रमाणे कापूस खरेदी करू असे आश्वासन शासनाने दिले होते. त्याप्रमाणे शासनाने कापूस खरेदी केला काय ? आज अशी स्थिती आहे की, या राज्यामध्ये कापूस खरेदी केंद्रच सुरू करण्यात आलेली नाहीत. शासनाने कापसासाठी रुपये 1700 भाव जाहीर केला. परंतु, कुठेही केंद्र सरू झाल्याचे डोळ्याने दिसत नाही. कापूस खरेदी केंद्र सुरू न केल्याने त्याचा विपरित परिणाम शेतकऱ्यांवर झाला. शेतकऱ्याला 1300 ते 1400 रुपयाने आपला कापसू विकाला लागला आणि आज देखील विकत आहेत. आज कापूस खरेदी केंद्र बंद आहेत. त्यामुळेच व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांची लूट चालविली आहे. आज शासनाने कापूस उत्पादक शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून दिले आहे. "राज्यातील शेतकऱ्यांना कृषि उत्पादनाचा किफायतशीर मोबदला मिळण्याकरिता महाराष्ट्र कृषि उत्पन्न (विनियमन) अधिनियम, 1963 मध्ये सुधारण करण्यात आलेली असून, राज्यातील केळी व संत्रा या फळांच्या निर्यातीस प्रोत्साहन देण्यासाठी कृषि निर्यात क्षेत्राच्या उभारणीकरिता माझ्या शासनाने केंद्रीय प्राधिकरणाशी सामंजस्य करार केला आहे" असे नमूद करण्यात आले आहे. फार मोठी गोष्ट अभिभाषणातून शासनाने सांगितलेली आहे. या राज्यात कापूस जास्त पिकतो. धान जास्त पिकतो. तेल बियांचे उत्पादन होते. याच्या निर्यातीची शासनाला नाही, तर आयातीची चिंता आहे. कापसाचे भाव का पडले आहेत ? कापासाचे आयात शुल्क शासनाने कमी केले. एवढेच नव्हे तर पाकिस्तानमधील कापूस महाराष्ट्रामध्ये आला. त्यामुळे कापासाचे भाव डाऊन झालेत.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

एक काळ असा होता की, तेल बियांवरील आणि कापसांवरील आयात शुल्क वाढल्यामुळे कापूस तीन हजार रुपये क्विंटलप्रमाणे विकला गेला होता. तसेच सोयाबीन 1800 रुपये क्विंटलप्रमाणे विकल्या गेले होते. परंतु आज आयात शुल्क कमी झाल्यामुळे परदेशातील कापूस आणि तेलबिया राज्यामध्ये येत आहेत, परिणामी राज्यातील शेतकऱ्यांच्या पिकांना भाव मिळत नाही. आज 900 रुपये क्विंटलप्रमाणे सोयाबीन विकले जात आहे. कमी भाव मिळत असल्यामुळेच शेतकरी आत्महत्या करीत आहेत.

महोदय, राज्यातील विजेची परिस्थिती सर्वांनाच माहीत आहे. परंतु याच विजेच्या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामधून मृगजळ उभा केला गेला आहे. हजारो कोटी रुपयांचे प्रकल्प उभारण्यासंदर्भात माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातून सांगण्यात आले. वीजनिर्मिती कंपनीने पुढील पाच वर्षांमध्ये सुमारे 29 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करुन, 7500 मेगावॅट इतक्या क्षमतेची, जादा वीजनिर्मिती करण्याची योजना तयार केल्याचे अभिभाषणातून सांगितले गेले. तसेच पुढे असाही उल्लेख आहे की, राज्यात, खाजगी क्षेत्रांनी 12,500 मेगावॅट विद्युतनिर्मितीची क्षमता असलेले वीज प्रकल्प प्रस्तावित केले आहेत. सभापती महोदय, प्रकल्प प्रस्तावित केले आहेत, प्रकल्प पूर्ण होणार आहेत, योजना तयार केलेल्या आहेत एवढेच गेल्या दोन वर्षांपासून आम्ही ऐकत आहोत. परंतु साधी एक मेगावॅट वीज सुध्दा राज्यामध्ये निर्माण झालेली नाही. नागपूरच्या अधिवेशनापूर्वी राज्यात विजेचे भारनियमन 8 तासांचे होते. सन्माननीय श्री.कवाडेसाहेब नागपूर अधिवेशनामध्येच मी सांगितले होते की, आज जे 8 तासांचे भारनियमन राज्यात होत आहे ते भारनियमन अधिवेशन संपल्यानंतर 12 तासांचे होईल. आज राज्यामध्ये 12 तासांचे अधिकृत भारनियमन होत आहे. ग्रामीण भागामध्ये तर 14-15-16 तास भारनियमन होत आहे. काही गावांमध्ये तर 20-20 तास भारनियमन होत आहे. ही आपल्या राज्याची स्थिती आहे. या परिस्थितीमुळे राज्यातील जनजीवनावर परिणाम होत आहे. भारनियमनामुळे विजेवर चालणाऱ्या गिरण्या बंद पडलेल्या आहेत. परिणामी, इंजिनचा वापर करुन, राज्यात गिरण्या सुरु आहेत. ज्वारीचा दर प्रति किलो 5 रुपये असताना, इंजिनवर चालणाऱ्या गिरण्यांमध्ये दळणाचा दर 6 रुपये आकारला जात आहे. राज्यात ही अवस्था अपुऱ्या विजेमुळे निर्माण झालेली आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, पारस वीजनिर्मिती प्रकल्पाबाबत वारंवार या ठिकाणी सांगितले जाते. खरे म्हणजे मी खासदार असताना माझ्या मतदारसंघामध्ये हा प्रकल्प येत होता. पारस वीजनिर्मिती केंद्राचे काम सुरु झाले आहे, त्यातून 250 मेगावॅट वीज निर्माण होणार आहे हे केवळ सांगितले जाते. मागच्या वेळी तीन महिन्यामध्ये हा प्रकल्प पूर्ण होईल असे सांगितले होते. तसेच परळी येथील प्रकल्प सुध्दा तीन महिन्यात पूर्ण होईल असे सांगितले होते. परंतु माझ्या माहितीनुसार पारस येथील वीजनिर्मिती प्रकल्प किमान वर्षभरात तरी पूर्ण होईल की नाही हे सांगता येत नाही. हे सर्व आपल्याला माहीत असताना सुध्दा आपण माननीय राज्यपाल महोदयांच्या तोंडी खोटी वाक्ये टाकत आहात.

महोदय, या ठिकाणी राज्याचे गृहमंत्री श्री.आर.आर.पाटीलसाहेब उपस्थित नाहीत. त्यांनी घोषणा केली होती की, खाजगी सावकारांना कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढू. ते जर या ठिकाणी उपस्थित असते तर त्यांच्याकडे नावासह केसेस दिल्या असत्या आणि त्यांना विचारले असते. सावकारांच्या संदर्भात आम्ही पुरावे देण्यास तयार आहोत. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, या शासनामध्ये बसलेली माणसे गोरगरीबांचे रक्त शोषण करीत आहेत. सत्ताधारी पक्षातीलच माणसे रक्त शोषून, गोरगरीबांचे जीवन उध्वस्त करीत आहेत. त्यांना आत्महत्या करण्यास भाग पाडत आहेत. मग या मंडळींना तुम्ही कोपरापासून ढोपरापर्यंत सोलणार आहात काय ? आज एखादा गरीब माणूस या सावकारांविरुध्द तक्रार करावयास गेला तर पोलीस स्टेशनमध्ये त्याची तक्रार नोंदवून घेतली जात नाही.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाही नाही

उलट तक्रार करु नये म्हणून त्यालाच धमकी देण्यात येते. आपण कोणाला सोलणार ? श्री. आर.आर.पाटील यांच्यासारखे कर्तव्यदक्ष गृहमंत्री झालेच नाहीत, असे आपण या ठिकाणी सांगत आहेत. सभापती महोदय, मी आपल्याला यासंबंधी कोकणातील एक उदाहरण देणार आहे. अत्यंत गरीब परिस्थितीत असलेल्या एका महिलेचे हे उदाहरण आहे. जयश्री पांडुरंग पुडेकर, मु.पो. मधली तोंडवली, ता. मालवण येथे या महिलेच्या मालकीची तोंडवली 60/3, 61/6, 28/8 अशी मिळकत आहे. सभापती महोदय, ही मिळकत सामाईक होती. त्यामध्ये तिचा हिस्सा होता. परंतु तिला त्यातून काढण्यात आले. त्याविरुध्द ती महिला कोर्टात गेली. कोर्टामध्ये त्या महिलेच्या बाजूने निकाल लागला. त्यानंतर तो निकाल घेऊन ती महिला पोलीस स्टेशनमध्ये गेली. परंतु तिच्या नावावर जमिनीचा ताबा असल्याबाबतची तिची तक्रार पोलीस स्टेशनमध्ये घेण्यात आली नाही. डी.वाय.एस.पी. यांच्या कार्यालयात देखील तिची तक्रार घेण्यात आली नाही. पोलीस अधिक्षकांकडे देखील तिची तक्रार घेण्यात आली नाही. श्री. आर.आर.पाटील यांच्यासारख्या कर्तव्यदक्ष, कर्तबगार उपमुख्यमंत्र्यांच्या कारकिर्दीत जर न्याय मिळाला नाही तर हा कलंक ठरणार आहे, असे वाक्य तिने पोलीस अधिक्षकांना पाठविलेल्या पत्रात लिहिले. आर.आर.पाटील साहेब त्या महिलेला आता का न्याय मिळाला नाही ? या ठिकाणी एका साध्या महिलेला न्याय मिळू शकत नाही आणि पोलीस स्टेशन फार ॲक्टिव्ह झालेले आहे अशा आपण घोषणा करत असता. याबाबत काही सांगावयाचे आहे का ? महिलांवरील बलात्काराची प्रकरणे वाढत आहेत, अत्याचार वाढत आहेत. मी मोरे बलात्कार केसबद्दल बोलून या गोष्टीची पुनरावृत्ती करुन सभागृहाचा वेळ घेणार नाही. मरिन ड्राईव्हच्या पोलीस चौकीपासून महिलांवर पोलिसांकरवी होणाऱ्या अत्याचारास सुरुवात झाली. कर्तव्यदक्ष गृहमंत्र्यांच्या राज्यामध्ये पोलीस महिलांवर बलात्कार करायला लागले. रक्षकच भक्षक झाल्यावर न्याय कोणाकडे मागायचा ? कुंपणच शेत खायला लागले तर न्यायाची अपेक्षा कोणाकडून करायची ? सभापती महोदय, दरोडेखोरांची संख्या वाढत आहे. मी या ठिकाणी राज्यामध्ये झालेल्या दरोड्यांची संख्या दिली असती. श्री. आर.आर.पाटील गृहमंत्री इ ाल्यापासून दिवसा दरोडे पडत आहेत. बँका लुटायला लागले आहे. घरफोड्या होत आहेत. लोकांच्या घरी चोऱ्या होत नाहीत तर पोलिसांच्या घरी देखील चोऱ्या व्हायला लागल्या आहेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

कोणा पोलिसाचा शर्ट चोरीला गेला तर कोणा पोलिसाचा पट्टा चोरीला गेला अशाप्रकारच्या बातम्या वर्तमानपत्रात येत असतात. पोलीस खाते कलंक असल्यासारखे वाटायला लागले आहे. मुंबई पोलिसांची देशातच नव्हेतर जगात देखील ख्याती होती. परंतु आज पोलीस खात्याचे धिंडवडे निघत आहेत. कायदा व सुव्यवस्था ढासळतच आहे. वीज निर्मितीची, शेतकऱ्यांच्या पॅकेजची दुर्दशा झालेली आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात जुलै महिन्यातील अतिवृष्टीचा उल्लेख केला आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण 13 तारखेला झाले. परंतु अतिवृष्टीनंतर राज्यावर अनेक संकटे आली. मग ते जुलैतील अतिवृष्टीचे संकट असेल, बर्ड फ्लूचे संकट असेल, महाराष्ट्रातील विदर्भात, मराठवाड्यात गारपीटीचे संकट असेल. विदर्भात मोठ्या प्रमाणात गारपीट झाली. देशात शेतकऱ्यांचे जवळजवळ 300 कोटी रुपयांचे नुकसान झाले. परंतु त्यांची हाक, बोंब ऐकायला माननीय मुख्यमंत्र्यांना वेळ मिळाला नाही. या संदर्भात पूरग्रस्तांचेच निकष लावून त्यांना मदत करु असे त्यांनी सांगितले. आता ते काय करतात ते पाहू ?

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

गारपीटीचे संकट, बर्ड फ्लू चे संकट, पावसाचे संकट, अशी अनेक संकटे मागील काळामध्ये आलेली आहेत. आता या मुंबईमध्ये पुन्हा कालपासून एका विचित्र तापाची साथ सुरु झालेली आहे. या साथीने मालेगांव शहरामध्ये अडीच हजार माणसे तापाने आजारी पडलेली आहे. ही शासनाची जबाबदारी आहे, मी असे म्हणेल की या शासनाचा पायगुण चांगला नसून तो वाईट आहे. माननीय श्री. विलासराव देशमुख यांचे सरकार राज्यावर आले तेव्हा पहिल्या वर्षी 14 जिल्हयात दुष्काळ पडला, दुसऱ्या वर्षी 13 जिल्हयात दुष्काळ पडला, तिस-या वर्षी 16 जिल्हयात दुष्काळ पडला. तेव्हा असे वाटले की, मुख्यमंत्री महोदयांचा पायगुण चांगला नाही म्हणून मुख्यमंत्री बदलले गेले, 1 ते दीड वर्ष माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे हे मुख्यमंत्री झाले. एक दोन वर्ष होत नाहीत तर परत माननीय श्री. विलासराव देशमुख मुख्यमंत्री झाले. त्यानंतर लगेल मुंबईमध्ये मोठया प्रमाणात महापूर आला. गेल्या 50 वर्षात एवढा पूर आलेला नाही एवढा मोठा महापूर मुंबईमध्ये आला. पायगुण चांगला नाही त्याचे हे लक्षण आहे. ही जी युती झालेली आहे ती युती मुहुर्त पाहून झालेली नाही. कारण एका बाजूला दुष्काळ पडतो तर दुसऱ्या बाजूला महापूर येतो. महाराष्ट्रामध्ये अभद्र अशी युती झालेली आहे. महाराष्ट्रामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस व भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस हे जे दोन ग्रह आहेत यांना शनी लागलेला आहे. शनीची साडेसाती या दोन ग्रहांना लागलेली आहे. म्हणून महाराष्ट्रावर अनेक संकटे येत आहेत. यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठया प्रमाणात होत आहेत, त्या थांबणार नाहीत ? महाराष्ट्रातील विजेचे संकट दूर होणार नाही ? महाराष्ट्रामध्ये कायदा, सुव्यवस्था व शांतता राखली जाणार नाही ? उद्योगांची प्रगती होऊ शकणार नाही ? थातूर मातूर भाषण करुन या महाराष्ट्राला दिलासा मिळू शकणार नाही, म्हणून मी माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करुन माझे दोन शब्द संपवितो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. अरविंद सावंत )** : माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, अभिभाषणावरील चर्चा आपणाला 6.15 वाजता थांबवावयाची आहे. त्यासाठी सर्वांनी दिलेल्या वेळात आपले म्हणणे मांडावे.

कर्नल सुधीर सावंत (नामनियुक्त) : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर विचार व्यक्त करण्यासाठी व भाषणाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये बरेच मुद्दे आलेले आहेत, महाराष्ट्राच्या भवितव्याच्या दृष्टीने ते अत्यंत महत्वाचे आहेत. राज्यपाल महोदयांचे अभिभाषण हे सरकारचे धोरण निश्चित करणारे असते, हे राज्य चालविण्यासाठी सरकारने काय काय उपाययोजना केलेल्या आहेत त्याबद्दल या अभिभाषणात माहिती दिलेली असते. काही मुद्दे राहून गेलेले आहेत त्याचा प्रामुख्याने मी उल्लेख करणार आहे. अंतर्गत सुरक्षेचा विषय आजच्या चर्चेमध्ये राहिलेला आहे. दहशतवादाचे सावट संपूर्ण देशावर पसरलेले आहे. आताच काही दिवसांपूर्वी वाराणशी येथे बॉम्बस्फोट झाला व भायखळा येथे बॉम्बसदृश्य वस्तू मिळाल्या आहेत.

यानंतर श्री. सांगळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत ....

यामुळे आज संपूर्ण देशामध्ये अतिशय भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. दहशतवादी टोळयांकडून हिंदू-मुस्लिमांमध्ये जाणीवपूर्वक तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. ही बाब लपलेली नाही. दुसरीकडे महाराष्ट्रामध्ये पोलीस दलाची अशी परिस्थिती आहे की, ....

श्री.दिवाकर रावते : या ठिकाणी सन्माननीय सदस्य जाणूनबुजून जाती विषयक उल्लेख करीत आहेत.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना नेहमी दुसरे सदस्य बोलत असताना मध्येच त्यांना अडविण्याची सवय आहे. सन्माननीय सदस्यांना सभागृहामध्ये कसे वागावे हे इतकी वर्षे या सभागृहाचे सदस्य म्हणून राहूनही समजत नाही. आपण मला संरक्षण द्यावे व त्यांना मध्ये न बोलण्याविषयी ताकीद द्यावी.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना विचारु इच्छितो की, आपल्याला काही हरकत मांडावयाची आहे काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी या ठिकाणी आपल्या समवेत बोलत असताना सन्माननीय सदस्य मेजर सुधीर सावंत मला गुंडासारखी दमबाजी करीत आहेत. ही बाब बरोबर नाही. आपण या विषयी सन्माननीय सदस्यांना ताकीद द्यावी व मला संरक्षण द्यावे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य मेजर सुधीर सावंत यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, मी अतिशय महत्वाच्या विषयावर बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते मध्येच व्यत्यय आणीत आहे. त्यांना या विषयाचे गांभीर्य कळलेले नाही असे मला वाटते. आज दहशतवाद्यांकडून जाणीवपूर्वक दंगलीची परिस्थिती निर्माण केली जात आहे. संपूर्ण जगामध्ये मुंबई पोलिसांचे नाव असताना सुध्दा आज मुंबई शहरातील निम्मे पोलीस जेलमध्ये आहेत. ते दहशतवाद्यांविरुध्द आणि संघटीत गुन्हेगारांविरुध्द लढत होते. ते कोणत्या कारणासाठी जेलमध्ये आहेत हे मला माहित नाही. सन 1999 मध्ये याबाबत युती शासनाच्या काळामध्ये मोका कायदा बनविण्यात आला. In the Statement of Object and Reasons of the Maharashtra Control of Organised Crime Act, 1999, it has been stated that: " Organized Crime has, for quite some years, now come up as a very serious threat to our society. It knows no boundaries and is fuelled by illegal wealth generated by contract killings,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ KGS/ MAP/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे .... 17:30

कर्नल सुधीर सावंत ....

extortion, smuggling in contrabands, illegal trade in narcotics, kidnapping for ransom, collection of protection money and money laundering, etc." या कायद्यामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, "It is seen that the organised criminal syndicates make a common cause with terrorist gangs and foster narco terrorism which extend beyond the national boundaries." हा अतिशय चांगला कायदा आहे. असे असताना सुध्दा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये याबाबत एक आढावा घेण्याची आवश्यकता होती असे मला वाटते. तसेच गेल्या पाच वर्षांच्या कारकिर्दीमध्ये दहशतवादी आणि संघटीत गुन्हेगारांशी मुकाबला करण्याचे शासनाचे असलेले धोरण चर्चेत येणे आवश्यक आहे. याबाबत सरकारी पातळीवर चर्चा होत नसल्यामुळे विधीमंडळात चर्चा होण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

( यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सावंत ....

कारण आपण एका टाईम बॉम्बवर बसलो आहोत. त्याचा स्फोट केव्हाहोईल हे सांगता येत नाही. न्यूयॉर्क ही अमेरिकेची आर्थिक राजधानी आहे तशीच मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी आहे. त्यामुळे सर्वात मोठा धोका या मुंबई शहराला आहे. त्यामुळे येथे कोणती अतिरेकी कारवाई केव्हा होईल हे सांगता येऊ शकत नाही. परंतु त्याचा मुकाबला करण्यास आपण कमी पडतो आहोत किंवा काय असे वाटते. दुसरे म्हणजे सध्या मुंबईच्या पोलीस दलाचे मानसिक खच्चीकरण करण्याचे उद्योग सुरू झालेले आहेत. पोलीस दलातील कर्मचारी-अधिकाऱ्यांचे मनोबल खच्ची करण्याचे काम केले जात आहे. जो पोलीस असतो त्यालाच चोर बनवायचे, जो चांगले काम करतो, जो संघटित गुन्हेगारीविरूद्ध लढतो त्याचे मानसिक खच्चीकरण करण्याच्या दृष्टीने त्याच्यावर आरोप करावयाचे, त्याला न्यायालयीन प्रक्रियेमध्ये गुरफटून टाकावयाचे असे प्रकार मुंबईच्या, महाराष्ट्राच्या पोलीस दलाबद्दल केले जात आहेत. त्यामुळे आज मुंबईतील पोलीस दलातील अधिकारी सांगतात की, if youj can not fight them, join them. म्हणजे तुम्ही जर या संघटित गुन्हेगारांबरोबर लढू शकत नसाल तर त्यांच्यात सामील व्हा. नाही तरी आम्ही त्यांचे एन्काऊंटर करावयाचे, त्यांच्या संघटित गुन्हेगारीविरूद्ध लढायचे आणि त्याच कारणास्तव तुरूंगात देखील जायचे अशी भीती सामान्य पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये आज निर्माण झालेली आहे. त्यामुळे यापुढे महाराष्ट्राचे भवितव्य काय आहे याचा आढावा आपल्या गृहखात्याने घेतला पाहिजे आणि त्याबाबत आपण देखील येथे चर्चा केली पाहिजे असे मला आवर्जून सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, त्यानंतर दुसरा विषय मला असा मांडावयाचा आहे की, आपल्या तटवर्ती प्रांताबद्दल आपले काही निश्चित असे धोरण आहे का ? या विषयावर या अभिभाषणामध्ये फार कमी चर्चा झालेली आहे. असे अनेक प्रश्न आहेत. आपण पर्यटन, पर्यटन म्हणतो. पण सीआरझेड मध्ये एकही हॉटेल आलेले नाही. मुंबई, गोवा हा प्रांत जो आहे तेथील समुद्र किनारे महत्त्वाचे आहेत. भारतातील सर्वात विकसित असा हा एरिया आहे. हा खास इकॉनॉमी झोन वा रिजन आपल्याला करता येईल. परंतु त्याबद्दल कोठेही काहीही चर्चा नाही. तो एरिया नॉन पोल्यूटिंग इंडस्ट्रिअल एरिया आहे, औष्णिक, न्यूक्लिअर प्रकल्प तेथे येत आहेत. त्याबद्दल देखील यामध्ये कोठेही चर्चा नाही. बंदरांच्या विकासाबद्दल देखील यामध्ये काहीही चर्चा नाही., खार भूमीबद्दलही चर्चा नाही. समुद्राच्या पाण्यामुळे आपली जमीन मोठ्या प्रमाणात वाया जात आहे पण त्याबद्दल देखील कोठेही

.... व्हीव्ही 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चर्चा होत नाही. मच्छिमारांबद्दलचे, डिझेलबद्दलचे प्रश्न आहेत त्याबद्दल देखील यामध्ये कोठेही चर्चा करण्यात आलेली नाही. म्हणूनच या संपूर्ण अभिभाषणामध्ये तटवर्ती प्रांताला बाजूला ठेवले गेले आहे असे मला वाटते म्हणूनच त्याबद्दलचे निश्चित असे धोरण बनविण्याचे गरज आहे. जेणे करून या किनारपट्टीचा विकास पुढील काळामध्ये एकसूत्रीपणे आपणास करता येऊ शकेल.

त्यानंतर तिसरा मुद्दा डिजास्टर मॅनेजमेंटसंबंधात मला मांडावयाचा आहे. आता या ठिकाणी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी पायगुणाचा उल्लेख केला. परंतु अशा प्रकारे पायगुण वगैरे मानणे म्हणजे एक प्रकारे अंधश्रद्धाच आहे असे मी मानतो. आता हे एक सत्य आहे की, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी असे प्रकल्प आलेले आहेत आणि येत आहेत परंतु त्यावर काय उपाय योजना आपण केलेली आहे हे पाहणे देखील तितकेच आवश्यक आहे. आज आपण एक डिजास्टर मॅनेजमेंट निर्माण केलेली आहे. त्या ठिकाणी त्यादृष्टीने जे प्रशिक्षित आहेत त्यांना विश्वासात घेतले जात नाही. उदाहरण म्हणून मी सांगेन की, सैन्यातील प्रत्येक सैनिकाला कोणत्याही आपत्तीविरूद्ध लढण्याचे प्रशिक्षण दिलेले असते, त्याची त्या दृष्टीने मानसिकता तयार झालेली असते. पण आपल्या डिजास्टर मॅनेजमेंटमध्ये या माजी सैनिकाला कोठेही स्थान दिलेले नाही, त्यामध्ये विश्वासात घेतलेले नाही. म्हणून माझी या निमित्ताने सूचना आहे की, माजी सैनिक महामंडळ आहे त्यांना यामध्ये एक नोडल एजन्सी म्हणून आपण समाविष्ट करून घ्यावे. तसेच डिझास्टर मॅनेजमेंट म्हणजे नेमके आपण काय करणार आहात याबद्दल देखील आम्हाला काहीही कळलेले नाही म्हणून ते देखील यामध्ये येणे आवश्यक आहे असे मला वाटते.

त्यानंतर चौथा विषय हा शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसंबंधीचा आहे. हा विषय कोठल्याही सरकारला शोभनीय नाही, भूषणावह नाही. ...

( यानंतर श्री. सरफरे .... डब्ल्यूडब्ल्यू 1 ...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

कर्नल सुधीर सावंत...

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी गेल्या पाच वर्षामध्ये आत्महत्या केल्या आहेत. त्या करण्यामागील त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर कायमचा तोडगा काढण्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. सर्वात महत्वाचा विषय म्हणजे आजच्या वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशनच्या युगामध्ये कापूस, सोयाबीनच्या निर्यातीवरील शुल्क माफ करीत असतांना आपल्या शेतकऱ्यांना किती फायदा व तोटा होत आहे हे आपण बघितले पाहिजे. वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशनच्या झालेल्या बैठकीमध्ये कृषी उत्पादनावर बरीच मोठी चर्चा झाली. अजून त्यासंबंधी निर्णय झालेला नाही. आज परदेशामध्ये 300 ते 500 टक्के सबसिडी तेथील शेतकऱ्यांना दिली जाते. या देशातील शेतकऱ्यांना आपण किती सबसिडी देतो याच्याशी आपण तुलना केली पाहिजे. या राज्य सरकार व केंद्र सरकारने आपल्या शेतकऱ्यांना आर्थिकदृष्टया मजबूत करण्यासाठी काही तरी धोरण आखणे आवश्यक आहे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे शेतकऱ्याचे एकरी उत्पन्न किती असू शकेल याबाबत कुठे तरी चर्चा झाली पाहिजे. परंतु ती होतांना दिसत नाही. उदा. अनेक वर्षाच्या प्रयत्नानंतर जपान व अमेरिकेने कोकणातील आंबा निर्यातीवरील बंदी उठविली आहे. परंतु राज्याच्या पणन महामंडळाने कोकणातील आंबा निर्यातीबाबत कधीच धोरण आखलेले नाही.आज जपानमध्ये कोकणातील आंब्याचे स्वागत केले जात आहे. परंतु आज या फळाची निर्यात करण्यासंबंधी शासनाकडून कोणतेही प्रयत्न केले जात नाहीत. त्याचबरोबर परदेशामध्ये फळे निर्यात करण्यासाठी त्या देशांशी लिंकेज करण्याची आवश्यकता आहे. परदेशातील निर्यातीच्या बाबतीत टक्केवारी सांगावयाची झाली तर आज परदेशामध्ये राज्यातून 31 टक्के कृषी उत्पादनाची निर्यात होते. माननीय राज्यपालांनी आपल्या भाषणामध्ये तसे म्हटले आहे. परंतु त्याचबरोबर आंबा, फळे व भाजीपाला निर्यात करण्यासंबंधी शासनाने धोरण जाहीर करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, विजेच्या बाबतीत एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे की, आपण वीज उत्पादन किती वाढविणार आहोत? त्यामध्ये आपण प्रचंड गुंतवणूक केली तरी त्याची सुध्दा एक कालमर्यादा निश्चित केलेली आहे. आपल्याकडे असलेला विजेचा वापर आणि विजेची होत असलेली गळती थांबविणे आवश्यक आहे. ती थांबविणारी यंत्रणा राज्य शासनाकडे आहे असे मला वाटत नाही. ही विजेची गळती थांबविण्यासाठी वीज पोलीस नियुक्त करण्याची कल्पना समोर आली आहे. हे काम माजी सैनिक महामंडळ हाती घ्यायला तयार आहे. अशा संघटनेकडे आपण हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत...

काम सुपूर्द करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. त्याचप्रमाणे वीज वाचविण्यासाठी वातानुकूलित यंत्रांवर निर्बंध आणणे आवश्यक आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये अनेक क्रांतिकारी योजनांचा उल्लेख करण्यात आला आहे. परंतु काही गोष्टी त्यामध्ये राहून गेल्या आहेत त्यांचा समावेश होण्याची आवश्यकता आहे म्हणून मी त्या मुद्दयांचा परामर्श माझ्या भाषणामध्ये घेतला आहे. त्याकडे सरकारने लक्ष द्यावे व त्यासंबंधीचे धोरण जाहीर करावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

धन्यवाद.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी त्यांचे अभिभाषण दोन्ही सभागृहातील माननीय सदस्यांसमोर केले व त्यांच्या आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव या सदनाच्या माननीय सदस्या सौ. सुधाताई जोशी यांनी मांडला, व त्याला अनुमोदन देण्याचे काम माननीय सदस्य ॲडव्होकेट श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी केले आहे. त्याचबरोबर माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी देखील भाषण केले. या सर्वांची भाषणे मी काळजीपूर्वक ऐकली आहेत. अर्थात, ज्यांचा उल्लेख मी याठिकाणी केला ते भाषण करणारे कुणीही माननीय सदस्य आता सदनामध्ये उपस्थित नाहीत. त्या संदर्भात कशा पध्दतीने या ठिकाणी विषय मांडावयाचा यासंबंधी मी विचार करीत आहे. याठिकाणी आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडण्यात आला. काहींनी त्याला आभार प्रदर्शन म्हटले तर काहींनी त्याला अभिनंदन म्हटले. माझ्या मनामध्ये असा विचार आला आहे की, सर्वच बाबतीत माननीय राज्यपाल महोदयांचे अभिनंदन करावे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु...

इतके उत्कृष्ट भाषण कधी झालेच नाही, म्हणून त्यांचे अभिनंदन करतो. मी माझ्या भाषणाची सुरुवात अशी करणार आहे की, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये त्यांनी जे मुद्दे मांडलेले आहेत, त्यामध्ये नाविन्य असे काही नाही, म्हणून त्यांचे अभिनंदन करतो. गेल्या चार वर्षापासून माननीय राज्यपालांची भाषणे मी ऐकलेली आहेत. तसेच यापूर्वीही मी विधानसभेमध्ये सदस्य असताना देखील राज्यपाल महोदयांची भाषणे ऐकलेली आहेत. दरवर्षी त्याच त्या भाषणाची एक डुप्लीकेट कॉपी घेऊन भाषण सादर केले जाते. यामध्ये आमदारांचे मनोरंजन होत असते. अभिभाषणामध्ये राज्य कोणत्या मार्गाने जाणार आहे, राज्यात काय घडले, हे सांगायचे असते. सन्माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कोणते मुद्दे यावेत, याबाबतीमध्ये काही संकेत आहे, ते संकेत देखील बदलले जात नाहीत, म्हणून राज्यपालांचे अभिनंदन. त्यांनी जे काही विषय मांडलेले आहेत त्यामध्ये दिनांक 26 आणि 27 जुलैला संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मोठ्याप्रमाणात पाऊस झाला त्याचा उल्लेख आहे. त्यावेळेस अक्षरश: आकाश फाटून धरणीवर पाणी कोसळले आणि ते सगळीकडे जमा झाले आणि महापूर आला. महापुरामुळे अनेक कुटुंबे देशोधडीला लागली, किती माणसांचा मृत्यू झाला, त्याबाबतची आकडेवारी येथे दिलेली आहे. त्यावेळेस शासन दोन दिवस इ ोपलेलेच होते. सगळी यंत्रणा ठप्प होती,पोलीस यंत्रणा कोठे दिसत नव्हती. मुख्य सचिवांशी संपर्क होत नव्हता. महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी शासकीय कर्मचाऱ्यांना सुट्टी जाहीर करुन टाकली. लोकांनी घराच्या बाहेर पडू नये,असे सांगितले. जनता पाण्यामध्ये अक्षरश: डुबत होती. काही लोकांचा जीव गेला,अनेकांचे संसार उध्वस्त झाले,अशाप्रकारची परिस्थिती निर्माण झालेली होती. या परिस्थितीचा माननीय राज्यपालांनी आढावा घेताना असे म्हटलेले आहे की, शासनाने आपदग्रस्तांना मदत केली. कोणाला केरोसीनचे, धान्याचे वाटप केले. कोणाला पैशाच्या रुपाने मदत केली, कोणाला घरासाठी, दुकानांसाठी पैसे दिले. या मदतीचे वाटप कोणाला केले हा प्रश्नच आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांना मी लिहून कळविलेले होते की, हे धान्य, केरोसिनचे वाटप हे रेशनिंगच्या दुकानातून करावे. रेशन दुकानदारांना घरामध्ये किती माणसे आहेत, त्यांना किती धान्य मिळते, याची कल्पना असते. परंतु मुख्यमंत्र्यांनी ही जबाबदारी त्यांच्या पक्षातील आमदार, पक्षाचे कार्यकर्ते यांना दिल्यामुळे यामध्ये प्रचंड काळाबाजार झाला. "मेलेल्या माणसाच्या टाळूवरील लोणी खाण्या"सारखा हा प्रकार त्यावेळेस झाला. आजही शासनाने, जिल्हाधिकाऱ्यांनी सांगावे की ही मदत किती उध्वस्त कुटुंबांना दिली ? जी काही मदत दिली, ती पहिल्या मजल्यावरील,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु...

तिसऱ्या मजल्यावरील लोकांना दिलेली आहे. तळमजल्यावर उध्वस्त झालेल्या कुटुंबांना मदत मिळालेली नाही. याबाबतची माहिती राज्यपाल महोदयांना नाही, कारण ते राजभवनामध्ये रहातात. तिकडे महापूर गेलेला नव्हता, म्हणून त्यांना त्याची कल्पना नाही. राज्यपालांच्या अभिभाषणातील चौथ्या परिच्छेदामध्ये म्हटलेले आहे की,"या आपत्तीमध्ये 1200 पेक्षा जास्त व्यक्ती व 27 हजार पेक्षा जास्त जनावरे मृत्युमुखी पडली", याचे कारण काय आहे ? मी मुंबई एमएमआरडीएचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.रमेश जोशी यांना 15 ते 20 जूनच्या दरम्यान पत्र लिहून कळविले होते की, मिठी नदी आणि हायवेवरील झालेले गटारचे काम आपण पत्यक्ष पहावे. पाऊस जास्तीचा झाला तर पाणी जाण्यासाठी त्या ठिकाणी काहीच मार्ग नाही त्यामुळे महापूर येण्याची शक्यता आहे.

यानंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

असे पत्र 20 जूनच्या सुमारास दिले होते. त्या पत्राची प्रत आजही माझ्याकडे उपलब्ध आहे. परंतु एमएमआरडीएने त्याची काहीही दखल घेतली नाही. गटारे आजही तशीच पडलेली आहेत. मिठी नदीवर जे काही चालले आहे ते भयानक आहे. संपूर्ण मिठी नदी अनधिकृत बांधकामांनी व्यापून गेलेली आहे. त्या नदीला एखाद्या छोट्या नाल्याचे स्वरुप आलेले आहे. मिठी नदीने उग्र रुप धारण केल्यामुळे सगळे वाहून गेले. केवळ अनधिकृत बांधकामांमुळे हे झाले. त्यामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली. ज्या अनधिकृत बांधकामांना शासनाचा वरदहस्त आहे अशा अनधिकृत बांधकामांमुळे सगळे उद्ध्वस्त झाले. या सदनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, आम्ही अनधिकृत बांधकामे काढली. त्याची प्रत्यक्षात यादी मागितली होती ती यादी आजपर्यंत सन्माननीय सदस्य श्री. अनिल परब यांना मिळालेली नाही. या सदनामध्ये आपण अभिवचन दिले होते. अशा प्रकारे या शासनाचा जो कारभार चाललेला आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावयास पाहिजे. असे जर काही काम केले असेल तर त्याबद्दल अभिनंदन केले पाहिजे. चांगले काम किंवा वाईट काम यातील वाईट कामे करण्याचा सपाटा या शासनाने चालविला आहे. एका पेक्षा एक सरस, हम भी कुछ कम नही, असे दाखविण्याची जी प्रवृत्ती आहे त्याचे हे फळ आहे. त्यानंतर मिठी नदी प्राधिकरण निर्माण झाले. हे प्राधिकरण निर्माण झाल्यानंतर त्यांच्याकडे सगळे अधिकार दिले. या प्राधिकरणाने संपूर्ण मिठी नदीतील अधिक्रमणे काढावयाची, गाळ काढावयाचा, नदीची खोली आणि रुंदी वाढवावयाची अशा तरतुदी त्या विधेयकामध्ये केलेल्या आहेत. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभारप्रदर्शनाचा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्रीमती सुधाताई जोशी यांनी मांडला आणि त्यांनी खूप अभिनंदन केले, खूप कौतूक केले. प्रत्येक बाबतीत शासनाचे अभिनंदन केले. मीही अभिनंदन करतो. त्यामुळे प्रश्नच मिटला. जाणूनबुजून काम करणाऱ्या लोकांच्या कामामध्ये विघ्न आणतो असे व्हावयास नको म्हणून मी हे बोललो.

सभापती महोदय, मिठी नदीच्या कामाच्या बाबतीत प्राधिकरणाव्दारे हल्ली मोठा समारंभ करुन सुरुवात करण्यात आली.. कामाची सुरुवात झाली पण परत ते काम थांबले. मिठाची गुळणी घेऊन हे प्राधिकरण मिठी नदीला मिठी मारुन बसलेले आहे. आजही काम चालू नाही. आम्ही त्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

परिसरात राहतो. काम कसे चालले आहे ते आम्ही पाहतो. त्याची आम्हाला पूर्ण कल्पना आहे. काय भोगावयाचे आहे ते आम्ही सगळ्यांनी भोगले, जे माननीय मुख्यमंत्र्यांना तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांना भोगावे लागले नाही. त्यावेळी भीषण परिस्थिती निर्माण झाली होती. त्याचा आपण उल्लेख केला नाही. जुहूमध्ये कदाचित पाणी आले असेल. मी नाही म्हणत नाही. सभापती महोदय, प्लास्टीक पिशव्यांच्या बाबतीत मी शासनाचे अभिनंदन करतो. उशिरा का होईना पण शहाणपण सुचले. गटारे, नाले जे काही जॅम झाले होते ते प्लास्टीकच्या पिशव्यांमुळे जॅम झाले असा जावईशोध लावण्यात आला. हे केवळ प्लास्टीकच्या पिशव्यांमुळे झालेले नाही. महापालिकेचे धोरण तसेच नाल्यांची जी सफाई व्हावयास पाहिजे होती ती होत नाही म्हणून ही चोंदाचोंदी झाली. त्यातून पाण्याचा निचरा होण्यासाठी जागा राहिली नाही. त्यामुळे ते सगळे भरले असे याबाबतीतील स्पष्टीकरण आहे. याबाबतीत शासनाकडे पत्रव्यवहारही केलेला आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना कर्ज देण्याची घोषणा नागपूरच्या अधिवेशनामध्ये करण्यात आली. 1075 कोटी रुपयांचे पॅकेज देतो असे सांगण्यात आले. आता आपल्याला काही तरी मिळेल म्हणून सगळे लोक सुखावले. माझ्या माहितीप्रमाणे जे पॅकेज जाहीर केले त्याच्या अंतर्गत आजपर्यंत एकाही शेतकऱ्याला कोणतीही मदत मिळालेली नाही. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर यांनी त्यांच्या भाषणात या गोष्टीवर जोर दिला होता. बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात असे या शासनाचे काम आहे. सांगावयाचे एक परंतु ते करावयाचे नाही, वेळ मारुन न्यावयाची अशी परिस्थिती आहे. याचे कारण असे की, श्री. विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री आहेत. कोणत्याही प्रश्नाला ते हसतहसत उत्तर देतात आणि हसतहसत मार्ग काढतात. त्यांच्या बाजूला बसलेले जे माननीय उपमुख्यमंत्री आहेत त्यांची तोंडपाटीलकी जास्त आहे आणि कृती कमी आहे. मी हे जातीवाचक बोलत नाही.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...

त्यांची तोंडपाटीलकी जास्त असल्यामुळे ते जास्त संकटात येतात. याबाबतीत तेच उत्तर देतील. शेतक-यांना कर्ज उपलब्ध करुन देताना डोळयास पाणी लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. या राज्यामध्ये ज्यावेळी हजारापेक्षा जास्त शेतक-यांनी आत्महत्या केल्या त्यावेळी केन्द्र शासनाने या राज्यामध्ये सत्यशोधन समिती पाठवली. या सत्यशोधन समितीने, ह्या ज्या शेतक-यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत त्या प्रामुख्याने कापसाच्या प्रश्नामुळे झालेल्या आहेत, असा अहवाल दिलेला आहे. केन्द्रातील कॉग्रेस आणि राष्ट्रवादी यांच्या आघाडी सरकारने महाराष्ट्र राज्यामध्ये होणा-या शेतक-यांच्या आत्महत्यांची दखल घेतली आणि केन्द्राने राज्य सरकाराच्या डोळ्यात अंजन घालण्याचे काम केले. सोनाराने कान टोचले की, ते दुखत नाहीत, त्याप्रमाणे केन्द्रानेच कान टोचल्यामुळे राज्यातील माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री आणि सर्व मंत्रिपरिषद गप्प आहे. कापसामुळे या राज्यातील कर्जबाजारी झालेला शेतकरी आत्महत्या करीत आहे, कापसा शिवाय दुसरे कोणतेही कारण या आत्महत्यांच्या पाठिमागे नाही हे सत्यशोधन समितीने शोधले. कापूस एकाधिकार योजनेअंतर्गत 750 कोटी रु. भांडवल निधी 12 टक्के व्याजासह 35 लाख शेतक-यांना परत करण्यात येईल असे अभिभाषणामध्ये सांगितलेले आहे. जेव्हा 1972 पासून ही कापूस एकाधिकार योजना सुरु झाली तेव्हा पासून शेतक-यांकडून कापसाचे जे 3 टक्के पैसे घेतलेले आहेत ती रक्कम 750 कोटी रु. इतकी आहे. ही रक्कम शेतक-यांना परत करतो असे शासनाने वारंवार सांगितले. परंतु अद्याप एकाही शेतक-याला एक पैसाही दिलेला नाही. बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात. माननीय सदस्यांनी या अभिभाषणाचे कौतुक केले म्हणून मलाही ते करायला पाहिजे यासाठी मी देखील या अभिभाषणाबद्दल माननीय राज्यपालांचे अभिनंदन करतो. जे काही देतो म्हणून सांगितले ते देखील दिले नाही.

प्रा.वैद्यनाथन समितीच्या अहवालाची अंमलबजावणी करण्याचा उल्लेख अभिभाषणामध्ये केलेला आहे. माझी शासनाला अशी विनंती आहे की, शासनाने या राज्यातील शेतक-यांना एकच सांगावे की, तुम्ही प्रतिक्षा करा, तुमच्यासाठी योजना येत आहेत. या शासनाने माननीय राज्यपालांच्या मुखातून योजना वदवून घेतल्या. माननीय राज्यपाल घटनात्मक प्रथेप्रमाणे बोलले. त्यांच्यावर विश्वास ठेवला पाहिजे म्हणून त्यांचे अभिनंदन. केळी व संत्री निर्यात करणा-या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार....)

कायद्यामध्ये सुधारणा करण्याचे आश्वासन या अभिभाषणामध्ये दिलेले आहे. ज्या अडचणीच्या बाबी आहेत त्या सगळ्या माननीय राज्यपालांच्या नावावर खपवून टाकलेल्या आहेत. याचे कारण असे की, ज्या गोष्टी माननीय राज्यपालांनी सांगितलेल्या आहेत त्याबाबतीत कोण काही बोलणार नाही. लोक फार तर असे म्हणतील की, माननीय राज्यपाल बोलले खरे, पण यातील काहीच मिळाले नाही. यातून माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव सुटले, माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील सुटले आणि सर्व मंत्रिपरिषद सुटली. अशा पध्दतीने या लोकांनी काम केलेले आहे.

सभापती महोदय, मी मुंबई शहराकडे येतो. मुंबई शहर ही देशाची आर्थिक राजधानी. ही आर्थिक राजधानी कशासाठी आहे ? रक्त शोषून घेण्यासाठी ? या मुंबई शहरातून हजारो कोटींचा रेव्हेन्यू केन्द्र सरकारला मिळतो आणि केन्द्र सरकार या मुंबई शहराला काय देते ? मुंबई शहरासाठी मेट्रो रेल्वे, टयूब रेल्वेच्या नुसत्या घोषणा केल्या जातात. त्यासाठी केन्द्राकडून एकही पैसा मिळालेला नाही. हजार कोटी रुपयातील 500 कोटी रुपये लोकांना अतिवृष्टीच्या वेळी वाटले गेले. आजही अनेक वस्त्यांतून शासनाला लोक शिव्या देत आहेत की, शासनाने पैसे देतो म्हणून सांगितलेले असताना अजूनही ते दिलेले नाहीत. याबाबतीत जिल्हाधिका-यांकडे तक्रारी केल्यानंतर जिल्हाधिकारी सांगतात की शासनाकडे पैसा नाही, मग आम्ही कोठून देणार ? या सरकारने घोषणा मात्र जोरदार केलेल्या आहेत. या मुंबई शहराबद्दल शासनाला ना घेणे, ना देणे अशी परिस्थिती आहे. या मुंबई शहराला देणे आहे ते बांगलादेशवासीयांचे, परप्रातांतून येणा-या लोंढ्यांचे आहे. या मुंबई शहरामध्ये रोज परप्रांतील लोकांचे लोंढेच्या लोंढे येऊन आदळत आहेत. हे लोक मुंबईत कोठेही राहातात. मिठी नदीच्या पात्रात राहातात, खाडीत राहातात, रस्त्यावर झोपड्या बांधून राहातात. सगळीकडे झोपड्या उभ्या राहिलेल्या आहेत. काँग्रेसने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यामध्ये 2000 सालापर्यन्तच्या झोपड्या अधिकृत करण्याचे वचन दिलेले आहे. झोपड्या अधिकृत करणे हा आता धंदा झालेला आहे. आज 2000 सालापर्यन्तच्या झोपड्या अधिकृत करण्याचे वचन या शासनाने दिलेले आहे, उद्या 2005 सालापर्यन्तच्या झोपड्या अधिकृत करण्याचे वचन हे शासन देईल. या झोपडयांमुळे मुंबई शहराला बकालपणाचे स्वरुप प्राप्त झालेले आहे.

...नंतर श्री. कानडे..

अशोधित मत / प्रसिद्धीपूर्वी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

मुंबईमध्ये स्वच्छता नाही. रोगराई आहे. महापुराच्यावेळी अनेक लोकांना लेप्टोस्पायरोसिस् या रोगाची बाधा झाली. या रोगाची लागण झालेली आहे किंवा नाही हे बघण्यासाठी रुग्णांच्या रक्ताचे नमुने पंजाब आणि हैद्राबादला पाठवावे लागतात. त्यांनी सांगितले की, या रोगाची लागण झालेली आहे की राज्य शासनाने ते मान्य करावयाचे. त्याचप्रमाणे बर्डफ्लूच्या बाबतीत असेच घडते आहे. या रोगाची लागण झाली आहे किंवा नाही याचा शोध घेण्यासाठी रक्ताचे नमुने भोपाळला पाठवावे लागत आहेत. त्यानंतर शासनाची यंत्रणा काम करते. महाराष्ट्र राज्याची निर्मिती होऊन आज जवळजवळ 45-46 वर्षे झालेली आहेत. तरीसुध्दा लोकांच्या जीवनाच्या दृष्टीने किंवा जीवनाशी अतिशय निगडीत अशा प्रश्नांवर सुध्दा आपण उपाययोजना करु शकलो नाही. यासाठी निधीची तरतूद करु शकलो नाही. केवळ महाराष्ट्र राज्य हे प्रगत राज्य आहे असा आपण सातत्याने जप करीत आहोत. त्याबद्दल शासनाचे अभिनंदन." नांव सोनूबाई आणि हाती कथलाचा वाळा" अशी आमची परिस्थिती आहे. मुंबई शहराच्या विकासासाठी एक हजार कोटी रु. देतो असे केंद्र शासनाने सांगितले पण एकही पैसा मिळाला नाही. तरी सुध्दा शासन म्हणते की, "उनकी तरफ से पैसा नहीं मिलेगा तो भी हम हमारी जितनी ताकत है उस के बल पर सभी योजनाएं आगे बढाएंगे". याचा अर्थ असा की प्रत्यक्ष पैसा येईल त्यावेळी मुंबई शहरामध्ये सुधारणा होतील असा होतो. सुधारणा होईल यावर मुंबईकरांनी विश्वास ठेवायचा. गोड गोड बोलायचे आणि वेळ मारुन न्यायची असे शासनाचे धोरण आहे. आज कामगार उध्वस्त झाला आहे,शेतकरी उध्वस्त झाला आहे,उध्वस्त करणे हे काम शासनाकडून सातत्याने होत आहे म्हणून शासनाचे आणि त्यांच्या पाठिराख्यांचे अभिनंदन. उद्योगधंद्याचा विचार केला तर फिक्की या दिल्लीच्या संस्थेने पाहणी केली त्यामध्ये असे आढळून आले आहे की उद्योगधंद्याच्या बाबतीत महाराष्ट्राचा नंबर देशामध्ये अकरावा लागतो. आपण मात्र म्हणतो की उद्योगधंद्याच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य देशामध्ये एक नंबरवर आहे. राज्य शासनाने हे खोटे चित्र रंगविले आहे त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करतो. 22 लाख तरुणांना रोजगार उपलब्ध करुन दिला जाईल असे राज्यपालांनी आश्वासन दिले आहे. राज्याचा विचार केला तर संपूर्ण राज्यामध्ये 40-42 लाख तरुण बेकार आहेत. 22 लाख बेकार तरुणांची व्यवस्था केली जाईल असे आश्वासन दिलेले आहे. राज्यपालांचे अभिभाषण पाहिल्यावर नुसती आश्वासने दिलेली आहेत. केवळ शाब्दिक बुडबुडे उभे केलेले आहेत दुसरे काहीही मिळणार नाही.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ KGS/ MAP/ SBT/ पूर्वी श्री. शिगम 18:00

श्री. मधुकर सरपोतदार ....

बेकार युवक रोजगार मिळत नाही म्हणून निराश झालेले आहेत. आत्महत्या करीत आहेत. अनेक बेकार युवक मुंबई सोडून चालले आहेत. राज्यातील बहुतांशी माणसे नोकरीसाठी बाहेर जात आहेत. मराठी माणसांची संख्या तर 22/23 टक्क्यांवर आली आहे. गिरण्या बंद झाल्या आहेत. कारखाने बंद पडले आहेत. ठाण्यामध्ये किती कारखाने सुरु आहेत ? संपूर्ण कामगार वर्ग उध्वस्त झाला आहे. नवीन धोरण नाही,नवीन विचार नाही,नवीन योजना नाही. स्थानिक लोकांना नोकऱ्या नाहीत. परराज्यातील माणसे याठिकाणी येतात. 10-12 तास काम करतात. एक हजार रु. पगार दिला तरी काम करतात आणि कायम होण्याची वाट पाहतात. कायम झाले की उद्योगांच्या उरावर बसतात असे अनोखे चित्र आज राज्यामध्ये उभे राहिले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे आमचे स्थानिक तरुण बेकार आहेत. त्यांना जगण्याचे साधन राहिले नाही. सामान्य माणसे आत्महत्या करीत आहेत,शेतकरी आत्महत्या करीत आहेत. कापूस उत्पादक शेतकरी,ऊस उत्पादक शेतकरी आत्महत्या करीत आहेत.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

कोणता शेतकरी आणखी कुठल्या क्षेत्रात काम करीत असेल त्यांना जगणे अशक्य झालेले आहे. त्यातल्या त्यात आता विजेच्या लोड शेडींगचा प्रश्न मोठया प्रमाणात उभा राहिलेला आहे. मी माननीय उर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांना काही पत्रे पाठविलेली आहेत. या राज्यामध्ये एक माननीय मुख्यमंत्री आणि शिक्षण मंत्री सोडले तर आमदारांच्या पत्रांना उत्तरे देण्याचा त्रास कोणीही घेत नाही, त्याबद्दल सर्व मंत्र्यांना मी धन्यवाद देतो. आमदारांच्या पत्रांना उत्तरे न देणे हेच त्यांचे वैशिष्टय आहे. आता दाभोळ प्रकल्प 1 मे पासून कार्यान्वित होणार असल्याचे सांगितले. आपले मुख्यमंत्री म्हणजे "हसोबा प्रसन्न" असे म्हटले तरी चालेल. पूर्वी हसोबा प्रसन्न नांवाचे एक कारटून असायचे. सरकार सत्तेवर येण्यापूर्वी निवडणुकीच्या अगोदर आपले माजी मुख्यमंत्री तिकडे गेले, त्यांनी काय घोषणा केल्या तर शेतकऱ्यांचे कर्ज माफ करतो, सर्व शेतकऱ्यांना मोफत वीज देण्यात येईल म्हणून आश्वासने देत बसले आणि शेवटी सर्वांना लुबाडले व आज हे दोघेही अहिरावण-महिरावणासारखे राज्य करीत आहेत. त्यापूर्वी तर दोघेही एकमेकांच्या विरोधात जाहीर भाषणांमधून बोलायचे पण खुर्ची मिळते म्हटल्यानंतर गळयात गळे घालून मिठी मारुन "हम और आप भाई भाई है. साथ साथ काम करेंगे, साथ जियेंगे, साथ मरेंगे" अशा प्रकारे मंत्रिमंडळ स्थापन झाले. त्यात काहींना अद्यापही स्थान नाही तर ज्यांना स्थान आहे त्यांना काम करु देत नाही, अशी परिस्थिती आहे. माननीय मंत्री महोदय श्री. दयानंद मस्के एक प्रामाणिक मंत्री म्हणून आहेत परंतु त्यांना काम करु देत नाहीत. आमचे उपनगराचे पालकमंत्री माननीय श्री. चंद्रकांत हंडोरे, यांना मी सांगितले होते की, बोलता एक आणि करता दुसरे त्यामुळे लोकांचा तर विश्वास बसणारच नाही परंतु अधिकाऱ्यांवर देखील त्याचा परिणाम होणार नाही. आपण जसे बोलतात तसे वागले पाहिजे तरच लोकांचा आपल्यावर विश्वास बसेल. अन्यथा You are unfit to be a Minister. अशा प्रकारचा शिक्का आपल्यावर बसेल आणि मंत्रिमंडळातून बाहेर व्हाल. ज्या मंत्रिमंडळामध्ये स्व. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुण्याईमुळे आपला समावेश होऊ शकला, नाही तर आपल्याला उभे देखील केले नसते, कारण ही कोणाची तरी मिरासदारी झालेली आहे अशा प्रकारचे चित्र उभे् राहिले आहे. ते भयावह आहे एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. कोणीही मंत्री असो, त्याला सहकार्य करण्याचे काम सर्वांचेच असते. चांगले काम

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

करणाऱ्याच्या पाठिशी जनता असतेच. त्यांनी देखील आमचे प्रश्न मार्गी लावावेत अशी अपेक्षा असते. माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे साहेबांना मी सांगू इच्छितो की, सोलापूर जिल्हयामध्ये काल एका दलित महिलेला नग्न करुन तिची तीन तास मिरवणूक काढली. त्याबद्दल कोणी आवाज देखील उठविला नाही. नेहमीच प्रत्येक गोष्टीत आवर्जुन आवाज उठविणाऱ्यांचा आता आवाज का बंद झाला, हा काय प्रकार आहे ? हेच मला समजत नाही. नवी मुंबईमध्ये आज जे घडले ते निश्चितच वाईट आहे. कुठच्याही गोष्टीच्या बाबतीत अशा घटना घडाव्यात असे आमचे मत नाही, सर्व समाज एकत्र राहिला पाहिजे, त्याने एकत्रित काम केले पाहिजे. गेल्या 2 तारखेला टाईम्स ऑफ इंडियामध्ये महंमद पैगंबराचे एक कार्टून काढले होते त्याच वेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश दिल्लीत आले होते त्यावेळी जवळपास अडीच ते तीन लाख मुस्लीम बांधवांनी एकत्र येऊन आपली ताकद दाखवून दिली होती.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

त्यालाही माझा विरोध नाही. यासंबंधी कुठेही जाहिरात करण्यात आली नव्हती, बोर्ड लावण्यात आले नव्हते किंवा माध्यमांना देखील काहीही सांगण्यात आले नव्हते. मात्र, अंतर्गत संदेश पाठवून केवळ काही तासांच्या अवधीत 3 लाख मुसलमान बांधव उच्च न्यायालयाचा हुकूम मोडून सीमे रेषेच्या बाहेर गेले व त्यांनी टाईम्स ऑफ इंडियाच्या इमारतीवर हल्ला केला. इतकेच नव्हे तर वाहनांवरसुध्दा दगडफेक केली. रण माजविले. पण एकाही व्यक्तीविरुध्द साधा अदखलपात्र गुन्हा देखील पोलिसांनी नोंदविला नाही. मुंबई शहामध्ये सर्वधर्मीय राहतात. असे असतानासुध्दा मुसलमान लोकांनी लादेन झिंदाबाद, पाकिस्तान झिंदाबादच्या घोषणा दिल्या. त्याची दखल गृह विभागाने घेतली नाही. साडे तीन लाख लोकांसमोर आपले पोलीस दल अपुरे पडले म्हणून ते काहीही करू शकले नाहीत. उलट, पोलिसांवर हल्ला केला असता तर चटणी वाटतात त्याप्रमाणे पोलिसांना वाटले असते. पण शासन याची काहीही दखल घेत नाही. चारगड धरणाचे पाणी शेतीला मिळावे म्हणून लोकांनी आंदोलन केले आणि धरणातील पाणी सोडले. परंतु, श्री.कौशिक नावाचा एस.पी.सिव्हील ड्रेसवर येतो आणि लोकांवर गोळीबार करण्याचे आदेश देतो. तो स्वत: लोकांवर रिव्हॉल्हवर मधून गोळीबार करतो. त्याची गोळी श्री.राऊत या तरूणाला छातीवर लागते व त्याचा मृत्यु होतो. गरज नसताना या लोकांवर शासनाने गोळीबार केला. परंतु, देशद्रोही घोषणा देणाऱ्याविरूध्द शासन एन.सी.सुध्दा दाखल करून घेत नाही. हा काय प्रकार आहे ? अशाने राज्य कसे चालेल. शासन कुठच्या मार्गाने प्रवास करीत आहे. राज्यकर्ते म्हणून आपली जबाबदारी आहे, ती कशी पार पाडणार आहात हे मला समजत नाही.

आता दाभोळ वीज प्रकल्प 1 मे पासून सुरू होत आहे. त्या दिवसाची मी वाट पहात आहे. सन्माननीय केंद्रीय ऊर्जा मंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी घोषणा केली की, 200 मे.वॅ.वीज महाराष्ट्रासाठी उपलब्ध करून देण्यात येईल. तरी देखील मुंबईला भार नियमन लागू होईल हे आम्ही समजून आहोत. टॅक्स जनतेला लावावयाचा आणि राज्यकर्त्याने ऐषआरामात राहणे हे चित्र निराशाजनक आहे. राज्यात वीज निर्मिती करण्यासाठी 19 हजार रुपये खर्च येणार आहे. त्यातून 500 मे.वॅ.वीज निर्मिती होणार आहे. गेल्या सहा वर्षामध्ये शासनाने काय केले ? वीज मंडळाने एक युनिट वीज वाढविण्याचा प्रयत्न केला आहे काय ? शासनाकडे वीज निर्मितीसाठी पैसे नव्हते काय ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

आज राज्यातील ट्रान्सफॉर्मर बंद पडले आहेत. बाहेरच्या व्यक्तींना ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे कंत्राट शासन देत आहे. माझ्या सारखा लोकप्रतिनिधी ट्रान्सफॉर्मर बदलण्याची मागणी करतो तेव्हा त्यासंबंधीचे उत्तर सन्माननीय मंत्रिमहोदयांकडून येत नाही, अशी परिस्थिती आहे. या सगळ्या परिस्थितीबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

शासनाने नक्षलवाद्यांसाठी 'आत्मसमर्पण योजना' आखली आहे. नक्षलवादी शरण येण्यासाठी ही योजना आहे. आज जे देशविघातक कृत्य करीत आहेत, त्या नक्षलवाद्यांसाठी शासनाने ही योजना आखली आहे. असे असली तरी आज नक्षलवाद्यांचा जोर राज्यात वाढत चालला आहे. दोन दिवसांपूर्वीच बॉम्बस्फोट झाला. त्यात अनेक लोक जखमी झालेत, पोलीस मृत्युमुखी पडलेत. नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात पोलिसांचे वाहन उडाले. आज गडचिरोली येथे कोणीही पोलीस अधिकारी जाण्यास तयार नसतो. तेथे जाणे म्हणजे फाशीची सजा अशी पोलिसांची भावना झालेली आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

परंतु यावर कठोर कारवाई करुन हा प्रश्न मिटविण्याची बुध्दी शासनाला येणार नाही असे मला वाटते. या शासनाला केवळ आपले दिवस भरावयाचे आहेत आणि मिळेल तेवढे घ्यावयाचे आहे. त्यामुळे नक्षलवाद्यांचा पुरेपूर बंदोबस्त या शासनाकडून होईल यावर माझा विश्वास नाही. यामध्ये पोलीस मरण पावून, सर्वसामान्य माणूस उध्वस्त होणार आहे.

**तालिका सभापती** : सभागृहाच्या कामकाजाची वेळ संपत आहे. आज अजून 13 सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत. त्यामुळे आपण सर्वांनीच जर वेळेचे बंधन पाळले तर बरे होईल असे मला वाटते. तसेच सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, त्यांच्याकडून मुद्यांची पुनरावृत्ती झाली नाही तर आजचे कामकाज वेळेत आटोपणे शक्य होईल.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, आजचे कामकाज थांबवून, उद्या सकाळी 11.00 वाजता सभागृहाची बैठक घेण्यात यावी असे मला वाटते.

**तालिका सभापती** : मला वाटते आज रात्री 8.00 वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज घेऊ. त्यानंतर उर्वरित कामकाजाबाबत ठरवू.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, अपुऱ्या वेळेमुळे सर्वच मुद्यांचा परामर्श मी घेत नाही. इतरही सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत याची मला जाणीव आहे. परवा चारगडला पाण्याच्या हक्कासाठी लढा देत असताना, त्या शेतकऱ्यांना आपला हक्क न देता, उलट एका शेतकऱ्याच्या मुलाला गोळी घालून मारल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. सोलापूर जिल्हयामध्ये एका महिलेची विवस्त्र अवस्थेत धींड काढण्यात आली. परंतु संबंधितांवर तातडीने कसल्याही प्रकारची कारवाई झाली नाही. परंतु आमच्या पक्षाच्या सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी या घटनेची माहिती घेतली. मला वाटते कोणत्याही महिलेवर अत्याचार होत असेल तर दोन्ही बाजूंकडून कारवाई करण्याची मागणी झाली पाहिजे. परंतु खेदाने सांगावेसे वाटते की, या ठिकाणी पक्ष आड येतो आहे. आज सामाजिक संस्था अन्यायाविरुध्द पेटून उठतात व अशा प्रकारांना विरोध करतात. परंतु सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांना सांगू इच्छितो की, जरी अशा प्रकारचे कृत्य आपल्या पक्षाचे सरकार असताना झाले असले तरी महिला सदस्य या नात्याने आपण येथे या घटनेविरुध्द बोलले पाहिजे होते. इतर संघटनांनी जरी विरोध केला असला तरी आपणही विरोध केला पाहिजे एवढेच या निमित्ताने सांगतो. माझ्याकडून जे मुद्दे

...2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

राहिले असतील त्या मुद्यांबाबत इतर सन्माननीय सदस्य आपल्या भाषणात ऊहापोह करतील एवढे सांगून आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण पूर्ण करतो.

नंतर श्री.कांबळे....

---

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती कांता नलावडे )**

श्री. जी.एल. अैनापूरे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. या अभिभाषणामध्ये अनेक मुद्यांचा उल्लेख केला आहे. माझे विचार मांडण्यासाठी मी यातून 16-17 मुद्दे काढले होते. परंतु वेळ कमी असल्यामुळे मी माझे म्हणणे शिक्षण या मुद्यासंदर्भातच मर्यादित ठेवतो आणि मी तेवढ्यावरच माझे विचार व्यक्त करतो.

सभापती महोदय, या अभिभाषणामध्ये सामुहिक विवाह योजना, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवरील तीव्र चिंता, मुंबईच्या विकासावरील चर्चा, वीज निर्मितीवरील चर्चा या संदर्भात अनेक चांगल्या गोष्टी मांडलेल्या आहेत. आता महिती व तंत्रज्ञान आले आहे. परंतु माझ्या दृष्टीने सगळ्यात दु:खाची गोष्ट म्हणजे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये शिक्षण क्षेत्राविषयी आजिबात आशावादी चित्र उभे झालेले नाही. शिक्षणाबद्दल या शासनाची एवढी उदासिनता असावी याबद्दल मी खरोखर चिंता आणि दु:ख व्यक्त करीत आहे. पूरग्रस्तांना मदत केल्याबद्दल या ठिकाणी सांगण्यात आले आहे. सभापती महोदय, सोलापूर जिल्ह्यातील जवळजवळ 168 शिक्षकांकडून फॉर्म भरुन घेतले. परंतु त्या पूरग्रस्तांना फायदे मिळाले नाहीत. आता योजना सुरु होतील, मदत सुरु होईल, पैसे देण्यात येतील एवढेच फक्त सांगण्यात आले. भिमा नदीकाठच्या शिक्षकांची घरे वाहून गेली आहेत. सांगलीतील मथुभाई गरवारे ग्रंथालय संपूर्ण पाण्यात बुडाले. अनेक लोकांनी त्या ग्रंथालयाला भेट दिली, अनेक लोक टी.व्ही. वर आले, घोषणा दिल्या. परंतु दुर्दैवाने आजपर्यंत त्यांना कोणत्याही प्रकारची मदत पोहोचलेली नाही. गावांतील, शहरातील तरुणांनी सर्व ग्रंथालयातील पुस्तके काढून सुकवली. शासनाने त्या संदर्भात योजना करतो असे देखील सांगितले. सभापती महोदय, आमदार फंडातून मी एक लाख रुपये ग्रंथालयाला देऊ केले. परंतु नियमात बसत नाही म्हणून तुमचे पैसे आम्ही नाकारीत आहोत असे सांगण्यात आले. आज ते ग्रंथालय ग्रेड "ए" चे असून पूर्णपणे उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. त्यासाठी शासन काहीही करत नाही, ही दु:खाची बाब आहे. राज्यावरील कर्जे वाढत आहेत, यासंबंधीची नापसंती, नाराजी या अभिभाषणात माननीय राज्यपालांनी व्यक्त केलेली नाही. वीज वितरणाचा मोठा फटका ग्रामीण भागाला बसला आहे. मी ग्रामीण भागातच राहतो. माझ्या गावापासून पाचशे फूटावर शहर आहे. तेथे लोडशेडींग दोन

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जी.एल. अैनापूरे ....

तास आहे. परंतु मी वड्यापलीकडे जेथे राहतो तेथे 18 तासांचे लोडशेडींग आहे. मला कुठलाही फॅक्स किंवा इतर कागदपत्रे मिळत नाहीत. यासंबंधी देखील शासन लक्ष देत नाही. या गोष्टींकडे अनेक वेळा लक्ष वेधूनसुध्दा शासनाने याची दखल घेतलेली नाही. ग्रामीण भागातील लोकांना रॉकेलच्या टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. रात्रीच्या वेळी वीज जाण्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यास करता आलेला नाही. या वर्षी या सर्व धोरणांचा परिणाम विद्यार्थ्यांच्या टक्केवारी कमी पडण्यामध्ये होणार आहे. कित्येक विद्यार्थ्यांना काहीही अभ्यास करता आलेला नाही. दिवसा अभ्यासाचे वातावरण नसते, गोंधळ असतो, गडबड असते, त्यामुळे हुशार विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले आहे. यासंबंधीचा देखील या अभिभाषणामध्ये कसलाही उल्लेख करण्यात आलेला नाही. या अभिभाषणामध्ये माहिती व तंत्रज्ञानाचा उल्लेख आहे. परंतु त्याबाबतचा शास्त्रशुध्द अभ्यास अजुनही महाराष्ट्रात झालेला नाही. त्यासंबंधीचा अभ्यासक्रम तयार झालेला नाही. ज्या अभ्यासक्रमातून माहिती व तंत्रज्ञानाचे खरोखर मुलभूत ज्ञान मिळेल असा कोणताही अभ्यासक्रम तयार झालेला नाही. ज्या ठिकाणी अभ्यासक्रम तयार झालेला आहे, त्या ठिकाणची फी, इंफ्रास्ट्रक्चर लक्षात घेतले तर त्या विद्यार्थ्यांना संधी मिळणे अशक्य आहे. याबाबत मार्ग काढण्याचे शासनाचे काम आहे. पुण्याच्या शेजारच्या माहोळ भागामध्ये एक लाख तीस हजार लोकांना लगेच नोकऱ्या उपलब्ध आहेत असे शासन म्हणत आहे.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नोंदी

श्री. जी.एल. अैनापुरे ....

तसे बऱ्याचवेळा पेपरमध्ये भरपूर वाचलेले आहे की, एक लाख लोकांना नोकऱ्या मिळवून देऊ, तरी सुध्दा बऱ्याच लोकांना नोकरीची संधी मिळत नाही. याबाबत शासनाने काहीतरी नियोजन करावयास पाहिजे, परंतु असे काहीही केलेले नाही. वास्तविक पाहता ज्या भागातील लोकांच्या जमिनी जाऊन ते विस्थपित झालेले आहेत त्या लोकांच्या मुलांना तेथेच नोकऱ्या दिल्या पाहिजेत. त्यांच्यासाठी छोटे-मोठे व्यवसाय तेथे सुरु करावयास पाहिजेत. त्या लोकांनी तेथेच नोकरी करुन त्यांना पैसा मिळावयास पाहिजे या दृष्टीने प्रयत्न व्हावयास पाहिजेत. शिक्षण खात्यामध्ये मोठया प्रमाणात उदासिनता आहे. माहिती तंत्रज्ञान सगळीकडे उपलब्ध झालेले नाही. संपूर्ण राज्यामध्ये बालवाडी ते सहावी पर्यंतच्या शिक्षणासाठी फी आकारण्यात येते. काही ठिकाणी बालवाडीमध्ये प्रवेश घेण्यासाठी 5-5 हजार रुपये, 10-10 हजार रुपये डोनेशन घेण्यात येते. आमच्या कोल्हापूर जिल्हयामध्ये एक शाळा आहे, सदर शाळा ही चांगली आहे तेथे बालवाडीमध्ये प्रवेश घेण्यासाठी 20 हजार रुपये डोनेशन घेण्यात येते. तसेच दरमहा 1500 रुपये फी आकारण्यात येते. अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. शासनाने 7 वी पासून 12 वी पर्यंत मोफत शिक्षण देण्याची घोषणा केलेली आहे. परंतु सगळया महाराष्ट्रामध्ये शासनाने बालवाडी पासून 12 वी पर्यंत संपूर्ण शिक्षण सक्तीचे करुन ते मोफत द्यावयास पाहिजे. कायम अनुदान, विना अनुदान हे सर्व बंद व्हावयास पाहिजे, या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये कोठेही उल्लेख दिसत नाही. मुंबई सारख्या इतर शहरांमध्ये सुध्दा इंग्रजी माध्यमाच्या शाळांची मागणी वाढत आहे. मराठी भाषिक शाळांमध्ये शिक्षकांसाठी किंवा मुलांसाठी कोणत्याही सोई केल्या जात नाहीत. ज्युनिअर कॉलेज 11 वी 12 वीं यासाठी तुकडया वाढवून दिल्या जात नाहीत. याचाच परिणाम म्हणून मराठी माध्यमाची मुले कमी होत चालली आहेत. इंग्रजी माध्यमाच्या विना अनुदानित शाळांची संख्या वाढत चालली आहे. शासन इंग्रजी माध्यमांच्या शाळांना परवानगी देते, परंतु मराठी माध्यमाच्या शाळांना तुकडयां वाढविण्याची परवानगी देत नाही. कारण मराठी माध्यमांच्या शाळांना अनुदान द्यावे लागते. म्हणून मराठी माध्यमांच्या शाळांना अनुदान देऊन त्या कायम अनुदानित करावयास पाहिजे याकडे शासनाने विशेष लक्ष द्यावयास पाहिजे. मराठी माध्यमांच्या शाळा ज्या संस्था काढतील त्यांना प्रोत्साहन द्यावयास पाहिजे.

.....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जी.एल. अैनापुरे ....

हळूहळू मराठी माध्यमाची ज्युनिअर कॉलेजेस बंद पडत चालली आहेत. याबाबत चिंता करण्याची वेळ आलेली आहे. शिक्षकांची नोकर भरती बंद केलेली आहे. तसेच शिक्षकेत्तर नोकरांची भरती आता पूर्ण बंद केलेली आहे. चिपळूणकर समितीच्या अहवालानुसार प्राध्यापकांची भरती शासनाने करावयास पाहिजे. राज्यातील 6 ते 7 हजार प्राध्यापक एम.ए. डिस्टींक्शन मध्ये उत्तीर्ण आहेत परंतु सेट-नेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यामुळे सन 1991-92 पासून म्हणजेच सरासरी गेल्या 12 ते 14 वर्षापासून हे प्राध्यापक सी.एच.वर काम करीत आहेत. महाराष्ट्र शासन विद्यापीठ अनुदान आयोगाचे नांव घेऊन याबाबत कोणतीही कार्यवाही न करता गप्प बसत आहे. सेट-नेट परीक्षेमध्ये पारदर्शकता राहिलेली नाही. आज या प्राधापकांची अशी परिस्थिती झालेली आहे की, त्यांना नोकरीही सोडता येत नाही त्यांना एका तासाला 80 रुपये देण्यात येतात. या पेक्षा जास्त मजूरी शेतमजूर कमवितात अशा प्रकारची स्थिती या प्राध्यापकांची झालेली आहे. सेट-नेट परीक्षा ही विकृत आहे, विकृत माणसांची ती कामे आहेत. या परीक्षेमध्ये पारदर्शकता राहिलेली नाही. विक्षिप्त लोकांचे ते काम झालेले आहे.

यानंतर श्री. सांगळे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जी.एल.अैनापुरे ...

युजीसीसीच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाला विचारणा केल्यास त्यांच्याकडून हे सर्व दिल्लीतील राजकारण असल्याचे सांगण्यात येते. उच्च शिक्षणाच्या संदर्भात ज्यावेळी मुलाखत घेतली जाते त्यावेळी मिश्रा, शर्मा तसेच वर्मा नावाची बिहारमधील माणसे येतात, महाराष्ट्रातील कोणीही माणसे नसतात. अशी महाराष्ट्रामध्ये उच्च शिक्षणाची परिस्थिती आहे. युजीसीसीकडून महाराष्ट्रामध्ये सेट परीक्षा ठरविण्यात येते. या परीक्षेमध्ये पारदर्शकता असली पाहिजे. या परीक्षेमध्ये मुले नापास का होतात हे त्यांना कळले पाहिजे. नेट-सेट परीक्षा भारताशिवाय दुसरीकडे कोठेही घेतली जात नाही. ही परीक्षा ताबडतोब थांबविणे आवश्यक आहे. यासाठी शासनाने नक्की भूमिका स्वीकारुन युजीसीसी समवेत संघर्ष केला पाहिजे. सन 1991 पर्यंत जे लोक शिक्षक म्हणून नोकरीवर लागले त्यांची सेट परीक्षा झालेली नसताना देखील त्यांना प्राध्यापक म्हणून मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर सन 1991 ते 2006 च्या कालावधीत सिलेक्शन कमिटी मार्फत ज्या लोकांची निवड झाली असेल त्यांना नोकरी मिळणे आवश्यक आहे. तसेच माध्यमिक शाळांना नियमित अनुदान मिळत नाही. 50-60 वर्षांपूर्वी काही संस्थांनी शाळा काढलेल्या आहेत. त्या शाळांच्या इमारती मोडकळीस आल्या आहेत. परंतु या शाळांच्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी अनुदान मिळत नसल्यामुळे तेथील विद्यार्थ्यांच्या जिवीतास धोका निर्माण होऊन प्राणहानी होण्याची शक्यता आहे. तसेच काही शाळांच्या इमारतींमध्ये अतिक्रमण होऊन त्या शाळांचा कोंडवाडा झालेला आहे. यासाठी शासनाने नवीन योजना काढण्याची आवश्यकता होती. अशा योजनेमुळे जुन्या शाळांच्या इमारतींची पुनर्बांधणी करण्यासाठी शासनाने बँकामार्फत अर्थसहाय्य दिल्यास त्या शाळांच्या जुन्या इमारती होऊ शकतील. आज शहरातील शाळांची अतिशय वाईट परिस्थिती आहे. आज मोठया प्रमाणात व्यापारी संकुले उभी करुन त्यामध्ये शाळा काढल्या जात आहेत. त्यामुळे शाळा आणि दुकाने यामध्ये काहीही फरक दिसत नाही. आज शाळातील ग्रंथालयाची अवस्था " ना घर का, ना घाट का " अशी झाली आहे. म्हणून शाळेतील ग्रंथालयासाठी शासनाकडून विशेष सहाय्य देण्याची आवश्यकता आहे. यासाठी शासनाने एखादी योजना हाती घ्यावी अशी मी सूचना करु इच्छितो. तसेच महाराष्ट्रातून विनाअनुदान तत्व हद्दपार केले पाहिजे व पूर्ण अनुदान तत्वावर शाळांना परवानगी देणे आवश्यक आहे. एस.एस.सी. बोर्डाची संपूर्ण चौकशी होणे गरजेचे आहे. एस.एस.सी. बोर्ड पूर्णपणे बिघडलेले आहे. त्यांच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप, सुपरव्हिजन देण्याची पध्दत हे सर्व तपासून पाहण्याची वेळ आली आहे. आज शिक्षण क्षेत्रामध्ये गुन्हेगारीकरण वाढलेले आहे. गुन्हेगारी स्वरुपाच्या धनाढ्य



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जी.एल.अैनापुरे ...

लोकांकडून अनेक नवीन शाळा काढल्या जातात याची शासनाकडून दखल घेतली जात नाही. तसेच स्वयं अर्थ सहाय्यित विद्यापीठ सुरु केले जाणार आहे. यामुळे मुलांचे नुकसान करण्याचे क्षेत्र निर्माण केल्यासारखे होईल असे मला वाटते. त्यामुळे हे धोरण शासनाने अंमलात आणू नये असे मला वाटते. आज 19000 लोक दरमहा 3000/- एवढया पगारावर शिक्षणसेवक पदावर कार्यरत आहेत. एकाच स्टाफरुममध्ये 3000 रुपये घेणारे शिक्षणसेवक बसलेले असतात व त्यांच्या दुस-या बाजूला 9000 रुपये घेणारे शिक्षक बसलेले असतात. ही विसंगती मोठया प्रमाणात दिसून येते. म्हणून शिक्षणसेवक योजना बंद करावी अशी माझी या निमित्ताने शासनाला सूचना करु इच्छितो. ही योजना महाराष्ट्र शासनाला शोभा देणारी नाही.

( भाषण संपविण्याची बेल वाजविण्यात येते.)

सभापती महोदया, या ठिकाणी आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो व वेळेअभावी मी माझे भाषण संपवतो.

---

( यानंतर श्री.सुंबरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदया, माननीय राज्यपाल महोदयांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे. 2005 साली राज्यामध्ये अतिवृष्टी झाली आणि सर्वत्र आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली होती. तरीही शासनाने त्याला अतिशय चांगल्या प्रकारे तोंड दिलेले आहे त्याबद्दल शासनाचे मी या निमित्ताने अभिनंदन करतो. मुंबई शहरातील मिठी नदीमुळे आणि त्या नदीच्या पात्रात आणि बाजूला झालेल्या अतिक्रमणामुळे मुंबईत पूर परिस्थिती निर्माण झाली होती. अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये, आलीच तर त्या आपत्तीला चांगल्या प्रकारे तोंड देता यावे यासाठी मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची तसेच महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना केली आहे त्याचे मी स्वागत करतो. या निमित्ताने मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाला माझी अशी सूचना राहील की, या नदीचे विकास काम हे येत्या पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात यावे. जेणे करून पावसाळ्यात मागील वर्षी सारखी आपत्कालीन परिस्थिती निर्माण होऊ नये. सभापती महोदया, राज्यात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यासाठी सरकारने राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना केली आहे त्याचेही मी स्वागत करतो. मुंबई आणि ठाणे जिल्ह्यामध्ये झपाट्याने वाढ होत आहे. त्याचबरोबर मुंबई आणि मुंबईच्या उपनगरांमध्ये फार मोठ्या प्रमाणात विकास कामे होत आहेत. शहराचा विकास होत आहे त्याचे मी स्वागतच करतो. त्या माध्यमातून शहरामध्ये जी आर्थिक उलाढाल होत आहे तिचेही मी स्वागत करतो. पण त्याचबरोबर एका विशेष बाबीकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. मुंबईमध्ये विशेषत: दादर, परेल या भागामध्ये ज्या कापड गिरण्या आहेत त्यांच्या जमिनींच्या बाबतीत शासनाने जी भूमिका घेतलेली आहे तिचे मी स्वागत करतो पण हा निर्णय घेताना असे वाटते की, शासनाचे कोठे तरी दुर्लक्ष झालेले आहे. या गिरण्यांच्या जागांवर मोठ्या प्रमाणात विकास कामे होत आहेत. त्यामुळे आज परिस्थिती अशी आहे की, तेथील सिवरेज, ड्रेनेज सिस्टीम ही इनसफिशिअंट आहे. आज दरवर्षी मुंबई शहरामध्ये लाखोंच्या संख्येने नवीन वाहने येत आहेत, रस्त्यांवरून लोकांना चालण्यास देखील जागा राहिलेली नाही, वाहनांना पार्कींग करण्यासाठी देखील जागा नाही. त्यातच विजेची समस्या आहेच. आज मुंबईतील कापड गिरण्यांच्या जागांवर गगनचुंबी इमारती उभ्या रहात आहेत, त्यातून मोठे मोठे फ्लॅटस् होणार आहेत, या विकासाचे स्वागतच आहे. पण त्याचबरोबर शासनाने ही जी विकास कामे होत आहेत त्यावर लक्ष केंद्रित करून त्यांच्यामुळे मुंबईच्या इन्फ्रास्ट्रक्चर ताण येणार आहे हे लक्षात घेऊन त्यासाठी आधीच

..... 3एच 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन .....

योजना करून मगच या विकास कामांसाठी परवानगी द्यायला पाहिजे होती. आज मुंबईसाठी 11 हजार कोटीची योजना तयार करण्यात आली आहे. त्यातील हजार कोटी रूपये आतापर्यंत शासनाला पाप्त झाले आहेत. हे करीत असताना मुंबईसाठी आणि विशेषत: मुंबईच्या उपनगरांमध्ये जी विकास कामे चालू आहेत वा झाली आहेत त्यामुळे शहरातील मुलभूत सोयी-सुविधांवर जो ताण पडणार आहे तो लक्षात घेता एक विशेष पॅकेज करण्यात यावे आणि त्यासाठी अर्थसंकल्पामध्येच तरतूद करावी. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... 3आय 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुजफ्फर हुसेन...

जेणेकरुन हे राज्य सरकार स्वत:च्या क्षमतेवर, ताकदीवर केंद्र सरकारकडून अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी संपूर्ण योजना सादर करणार आहे. परंतु त्याचबरोबर राज्य सरकारने एक विशेष योजना तयार करुन त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली पाहिजे.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये मेट्रो रेल्वेसंदर्भात उल्लेख करण्यात आला आहे. ही रेल्वे अंधेरी, घाटकोपर व वाकोल्यापर्यंत मर्यादीत स्वरुपामध्ये करण्यात येणार आहे. सभापती महोदय, आपण मुंबई शहराची व्याप्ती पाहिली तर अंधेरी पासून दहिसर, विरारपर्यंत रेल्वे प्रवाशांची संख्या 60 लाखावर पोहोचली आहे. असे असतांना आपण फक्त अंधेरी व घाटकोपरचा विचार करीत आहात. माझी आपल्याला विनंती आहे की, मेट्रो रेल्वेच्या योजनेमध्ये बोरीवली, दहिसर, मीरा-भाईंदर व विरारपर्यंत सर्व स्थानकांचा समावेश करुन पूर्व उपनगरामध्ये ठाणे, भिवंडी, अंबरनाथ व बदलापूर ही स्थानके देखील त्या रेल्वेने जोडली गेली पाहिजेत. जेणेकरुन त्या विभागातील प्रवाशांचे प्रश्न सुटतील. मुंबईला लागून असलेल्या ठाणे जिल्हयाची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन त्याठिकाणी निर्माण झालेल्या असंख्य प्रश्नांकडे मी सभागृहाचे लक्ष वेधतो. ठाणे जिल्हयामध्ये पिण्याचे पाणी, रेल्वे, बस वहातूक, गटारे, सांडपाणी, घनकचरा, शासकीय जमिनीवरील अनधिकृत झोपडपट्टया, अतिक्रमणे अशाप्रकारचे असंख्य प्रश्न निर्माण झाले आहेत. मुंबईतील वाढती लोकसंख्या व गर्दी कमी करण्यासाठी नव्या मुंबईची संकल्पना अस्तित्वात आली. परंतु केवळ वाशी व भोवतालच्या परिसराचा विकास करुन आपण तिला नवी मुंबईचे नाव दिले. आज मुंबईप्रमाणेच ठाणे जिल्हयामध्ये वाढत जाणारी लोकसंख्या विचारात घेऊन केवळ वाशी व भोवतालचा परिसर म्हणून नवीन मुंबई हे नवीन शहर निर्माण न करता संपूर्ण ठाणे जिल्हा हा दुसरी मुंबई म्हणून नवीन शहर उभे केले पाहिजे. आज ठाणे जिल्हयाची लोकसंख्या 1 कोटीच्या घरात पोहोचली आहे. म्हणून माझी विनंती राहील की, ज्याप्रमाणे आपण मुंबईसाठी योजना केली त्याप्रमाणे ठाणे जिल्हयातील प्रश्न सोडविण्यासाठी ठाणे जिल्हयासाठी योजना तयार करावी. आणि त्यादृष्टीने अर्थसंकल्पामध्ये मुंबई व ठाणे जिल्हयासाठी विशेष पॅकेजची तरतूद करावी अशी सूचना करतो.

त्याचप्रमाणे माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये शेतकरी, महिला व मागासवर्गीयांच्या संदर्भात धोरण जाहीर केले, औद्योगिक धोरण जाहीर केले, पोलीस दलाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुजफ्फर हुसेन...

आधुनिकीकरणाची योजना जाहीर केली आहे तिचे मी स्वागत करतो. आपल्या राज्यामध्ये मौलाना आझाद अल्पसंख्यांक महामंडळ स्थापना करण्यात आले. या महामंडळाला नॅशनल मायनॉरिटीडेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशनकडून दरवर्षी 50 कोटी रुपये प्राप्त करुन घेण्याबाबत लोकांकडून मागणी करण्यात आली आहे. त्यादृष्टीने राज्य सरकारने पावले उचलली पाहिजेत. जेणेकरुन केंद्रीय अल्पसंख्यांक आयोगाकडून या महामंडळाला पैसे मिळतील. आणि महामंडळाच्या माध्यमातून राज्यातील अल्पसंख्यांकांना आर्थिक मदत करता येऊ शकेल. त्यादृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

धन्यवाद.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदया, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील दुसरा परिच्छेद मी माझ्या भाषणासाठी निवडला आहे. मला 100 टक्के खात्री आहे की, या संदर्भातील मी जी भूमिका मांडणार आहे तिच्याशी या सदनातील सर्व माननीय सदस्य सहमत होतील. परिच्छेद क्रमांक 10 मध्ये माननीय राज्यपालांनी जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रीन्युअल मिशनचा उल्लेख केला आहे. आणि केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये त्याकरीता तरतूद केली असल्याचा दाखला देण्यात आला आहे. मी माननीय राज्यपालांचे भाषण काळजीपूर्वक वाचले. तसेच, गेल्या वर्षीचे केंद्र सरकारने सादर केलेले अर्थसंकल्पाचे भाषण वाचल्यानंतर मला सांगायला दु:ख वाटते की,

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक (पुढे सुरु...

ट्रेझरी बेंचच्या लोकांनी राज्यपालांची दिशाभूल तर केलेली नाही ना ? राज्यपाल महोदय असे म्हणतात की "Mumbai is the financial capital of India and my government is committed to transforming Mumbai into a world class city." त्यानंतर केंद्र सरकारच्या अर्थ मंत्र्यांनी सादर केलेल्या बजेटचा उल्लेख करुन राज्यपाल महोदय असे म्हणतात की, The Jawaharlal Nehru National Urban Renewal Mission was announced as a result of this effort." सभापती महोदया, मला सागण्यास दु:ख होते. मी फार जबाबदारीने विधान करतो. माझ्यासमोर सन 2005-2006 च्या केंद्रीय अंदाजपत्रकाची प्रत आहे. त्यामध्ये या संदर्भातील उल्लेख हा थोडा वेगळा आहे. हे कृपाकरुन लक्षात घ्या. मा. राज्यपाल साहेब म्हणतात की, मुंबईच्या काळजीपोटी केवळ मुंबईमध्ये धनवर्षाव करण्याचे हे अभियान आहे. राष्ट्रीय नागरी नवीकरण अभियान यांसाठी सुरु करण्यात आलेले आहे, असा त्यांचा दावा आहे. या संदर्भात विचार करण्याची गरज आहे. या संदर्भातील कागदपत्रे वाचल्यानंतर असे निदर्शनास येते की, राष्ट्रीय नागरी नवीकरण अभियान अर्थमंत्र्यांनी गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात जाहीर केले. त्याचा सरळसरळ हेतू हा की, भारताची लोकसंख्या फार मोठयाप्रमाणावर वाढलेली आहे, शहरांमध्ये वाढ झालेली आहे. या शहरामध्ये समाधानकारक नागरी सोयी, सुविधा उपलब्ध नाहीत या दृष्टीने नगरांमध्ये या सुविधांमध्ये वाढ करण्याची गरज आहे, अन्यथा ही शहरे शेवटचा श्वास घेतील. हे त्यांचे म्हणणे मुंबई पुरते आहे असे नाही. अर्थसंकल्पाच्या भाषणमध्ये केंद्रीय मंत्री श्री.चिदंबरम् यांनी म्हटलेले आहे की, "10 लाख लोकसंख्या असलेली जी शहरे आहेत, त्यांना मेगासिटी असे म्हटले जाते. त्यांचे नवीकरणासाठी हे अभियान आहे." गेल्यावर्षीच्या अर्थसंकल्पात ते म्हणतात की, "India needs urban facilities of satisfactory standards to cope with the challenges. If our cities are not renewed, they will die. The National Urban Renewal Mission is designed to meet this challenge." पण हे अर्धसत्य आहे. अर्थमंत्री श्री.चिदंबरम् यांनी बंगलोर मेट्रो रेल प्रकल्पाचा उल्लेख केला. त्यांच्याकडून माहिती घेतली पाहिजे की, मुंबईसाठी किती रक्कम मिळणार आहे ? त्यांनी ते कळविण्याची आवश्यकता आहे. कारण त्यांनी तसा दावा केलेला आहे. गेल्यावर्षीचे बजेट माझ्यासमोर आहे. गेल्या वर्षी 5500 कोटी रुपयापैकी 1650 कोटी रुपये अनुदान रुपाने मिळतील,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असे अर्थमंत्र्यांनी सांगितलेले आहे. याचा अर्थ 3850 कोटी रुपये कर्जरुपाने तुम्हाला मिळणार आहेत. कर्जफेड करायला महाराष्ट्र सरकारची तिजोरी भरभक्कम आहे काय ? असा प्रश्न पडतो. या वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात या मिशनसाठी 6,250 कोटी रुपयापैकी 4,595 रुपये अनुदान रुपाने मिळणार आहेत. याचा अर्थ 1,655 कोटी रुपये कर्जाद्वारे मिळणार आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये केंद्रीय अर्थमंत्र्यांनी अनुदानाचा अंश वाढविलेला आहे. यामुळे कोणीही शहाणा माणूस त्यांचे अभिनंदन करेल. पण शांतपणाने परिच्छेद वाचला तर लक्षात येते की, चार प्रकल्पांच्या संदर्भात अर्थसंकल्पात उल्लेख केलेला आहे. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजरात या राज्यामधील आणखी काही प्रकल्पावर ही नवीन रक्कम खर्ची पडणार आहे, असे चिदंबरम साहेब सांगतात. पुन्हा प्रश्न निर्माण होतो की, मुंबईच्या वाटयाला किती रक्कम येणार आहे ? हे समजून घेण्याची इच्छा आहे, मंत्री महोदयांनी त्यांच्या भाषणामध्ये याबाबतचा खुलासा करावा.

यानंतर श्री.बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक ...

सभापती महोदया, मुळात तज्ञ जाणकारांनी त्याचा जो अभ्यास केला त्याप्रमाणे या महामुंबईच्या विकासासाठी 10 हजार कोटी रुपये आवश्यक आहेत. प्रत्यक्षात पहिली बाब अशी की, मघाशी मी जो 5500 कोटी रुपयांचा उल्लेख केला ते सगळे पैसे मुंबईला मिळणार नाहीत. आपण हे 10 हजार कोटी रुपये बाजूला ठेवा. आपण 5 हजार कोटी रुपये बाजूला ठेवा. प्रत्यक्षात किती रुपये मिळणार आहेत आणि त्यातील कर्जरुपाने किती मिळणार आणि अनुदानाव्दारे किती मिळणार याचा खुलासा आम्ही मागतो. त्याचे उत्तर शासनाने द्यावे. दुसरी बाब अशी की, प्रत्यक्षात कर्जाचा बोजा शासनाच्या शिरावर आहेच आणि हे आणखी कर्ज तुम्ही कसे फेडणार ? तिसरी बाब म्हणजे केंद्र सरकारकडून मिळणारे जे अर्थसहाय्य आहे त्यासाठी मॅचिंग अमाऊंट द्यावी लागते, अनुरुप अनुदान द्यावे लागते. ही अनुरुप अनुदानाची रक्कम न दिल्यामुळे अनेक योजना माघारी परत पाठवाव्या लागल्या. हा तिढा तुम्ही कसा सोडविणार आहात ? खरी ग्यानबाची मेख पुढे आहे. त्याबाबत मी माननीय अर्थमंत्र्यांची साक्ष काढणार आहे. केंद्र सरकारने गेल्या वर्षी आणि या वर्षी मुंबईच्या विकासासाठी केवळ कमी रक्कम दिली एवढेच माझे दु:ख नाही. जी रक्कम दिलेली आहे ती सशर्त दिलेली आहे. त्याचा उल्लेख श्री. जयंत पाटील यांच्या मुलाखतीमध्ये आपल्याला वाचावयास मिळतो. तो उल्लेख करण्यापूर्वी या ठिकाणी आणखी एक मुद्दा सांगण्याची गरज आहे. मुळात असे घडले की, जेव्हा योजना आयोगामार्फत महाराष्ट्र सरकारची या वर्षीची योजना मांडण्यात आली त्यावेळी श्री. बी.एन.युगंधर नावाचे प्लॅनिंग कमिशनचे सदस्य होते, त्यांनी 8 फेब्रुवारी, 2006 ला महाराष्ट्र सरकारची सालटी काढलेली आहे. त्यांच्या कॉमेन्ट्रीचे शीर्षक "Maharashtra is a failed State" असे आहे. श्री. युगंधर साहेबांनी प्रश्न विचारला आणि स्वाभाविकपणे महाराष्ट्र टाईम्सच्या वार्ताहराला असे वाटले की, त्याचा दाखला घेऊन श्री. जयंत पाटील यांची मुलाखत घ्यावी. माननीय अर्थमंत्र्यांची जी मुलाखत आहे ती आपण वाचावी तसेच माननीय राज्यपालांचे भाषण वाचून तुलना करावी. Please compare and contrast. श्री. जयंत पाटील हे कळवळून प्रश्न विचारतात की, अन्य राज्यांपेक्षा प्रगत असणे हा महाराष्ट्राचा गुन्हा आहे काय ? मुंबईच्या प्राथमिक समस्या आणि विकासासाठी पैसे मागितले आणि जवाहरलाल नेहरु

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक .....

अर्बन रिन्युअल मिशनमध्ये त्याचा समावेश केला, ज्याचा उल्लेख माननीय राज्यपालांनी केलेला आहे त्याबद्दल माननीय अर्थमंत्री कपाळ बडवून सांगतात की, आम्ही मागतो काय आणि तुम्ही देता काय ? विशेष अनुदान मागितले की, कर्ज उचलण्याचा सल्ला दिला जातो. मला वाचताना असे वाटले की माननीय अर्थमंत्री हे वेगळ्या पक्षाचे आहे की काय ? टीका करणे सोपे असते. ही तफावत कशी दूर होईल याबाबतीत आयोगाचा एकही सदस्य बोलत नाही. मी श्री. युगंधर साहेबांची मुलाखत आपल्यासमोर मांडली. आता श्री. जयंत पाटील यांची मुलाखत आपल्यासमोर मांडतो. मघाशी मी असा उल्लेख केला की, केंद्र सरकार जे धनसहाय्य महाराष्ट्राला देणार आहे त्यामध्ये चार शर्ती आहेत. त्यातील सर्वात महत्वाची शर्त अशी आहे की, अर्बन लँड सिलिंग ॲक्ट रद्द करा. महाराष्ट्राचे माननीय अर्थमंत्री म्हणतात की, आयोगाच्या सूचनेनुसार तातडीने हा कायदा रद्द केला तर बिल्डर लॉबीचा फायदा करण्यासाठी हे पाऊल सरकारने उचलले असा आरोप होईल. आज गिरणगावातील कामगारांना देशोधडीला लावले, बिल्डर लॉबीच्या संगनमताने सप्ततारांकित महाल उभे करण्याच्या नावाखाली स्वाभाविकपणे आज ना उद्या हा कायदा रद्द करावा लागेल. यासाठी पाच वर्षाची मुदत मागितलेली आहे. मला स्वाभाविक चिंता व्यक्त करावयाची आहे की, मुंबईला उपलब्ध होणारे पैसे तुम्ही कसे वापरणार ? मुळात पैसे किती मिळणार ? त्याच्या मोबदल्यात कोणकोणत्या शर्ती डोक्यावर घेणार ? याचा खुलासा जोपर्यंत तुम्ही करणार नाही तोपर्यंत या सदनाचे समाधान होणार नाही.

सभापती महोदया, शेवटचा आणि अत्यंत महत्वाचा मुद्दा मला मांडावयाचा आहे. 13 मार्चला या विधिमंडळात सन्माननीय राज्यपालांचे अभिभाषण ऐकले आणि 13 मार्चच्या हिंदू दैनिकाने राज्यपालांच्या भाषणाविषयी शंका व्यक्त केली. माझ्याकडे दोन्ही कटिंग्ज उपलब्ध आहेत. कृपया आपण माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचा परिच्छेद क्रमांक 11 बघावा.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. अशोक मोडक पुढे सुरु...)

परिच्छेद क्रमांक 11 पाहिल्यानंतर आपल्या असे ध्यानात येते की, माननीय राज्यपाल महोदय दावा करीत आहेत, तो कृपा करुन आपण ऐका. मुंबईला एक जागतिक दर्जाचे शहर बनविण्याकरिता मुंबईच्या विकास प्रकल्पांसाठी जागतिक बँकेने आणि जपान सरकारने आर्थिक सहाय्य देण्याची तयारी दर्शविली व भारत सरकारने मुंबईला आतर्राष्ट्रीय आर्थिक केन्द्र बनविण्यासाठी एक तज्ज्ञ समिती स्थापन केली आहे. आपण दिनांक 13 मार्च रोजीचे दै. हिन्दू वाचावे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "The World Bank's recent decision to temporarily dispense with financial support to one component of MUTP raises host of issues with urban planners and policy makers in Mumbai and other metros, must be addressed. There was no advance planning. हा संपूर्ण लेख सगळयांनी वाचण्याची गरज आहे. त्यामध्ये लेखकाने 3 आरोप केलेले आहेत. ते तीन आरोप मी आपल्या समोर मांडणार आहे. आरोप क्रमांक 1 असा आहे की, महाराष्ट्र सरकार जेव्हा जागतिक बँककडे गेले त्यावेळी जागतिक बँकेला असे कबूल केले की, ज्यावेळी एमएमआरडीए आणि एमयूटीपी अंतर्गत जोगेश्वरी ते विक्रोळी आणि अंधेरी ते चेंबूर लिंक रोड करीत असताना जे प्रकल्पबाधित नागरिक असतील त्यांचे rehabilitation करु. परंतु आता या सरकारची या लोकांचे rehabilitation करण्याची तयारी नाही. World Bank is insisting on rehabilitation of project affected people. The Govt. of Maharashtra is now asking to be satisfied with resettlement. Now there is a difference between rehabilitation and resettlement. रिहॅबिलिटेशनचा अर्थ असा आहे की, तेथून रेल्वे ट्रॅक जाणार असल्यामुळे तेथील नागरिकांना तेथून हटविताना केवळ त्यांचे पुनर्वसन करु नका तर त्यांना नुकसान भरपाई देखील द्या. मी हा परिच्छेद आपणास वाचून दाखवितो.... माननीय तालिका सभापती महोदया, हा विषय फार गंभीर आहे. या प्रश्नाची माननीय राज्यपालांना दखल घ्यावी असे वाटले नाही. ट्रेझरी बेंचचे लोक काय करीत आहेत ? केवळ पुनर्वसनाचा विचार केला तर प्रकल्पबाधित कुटुंबाना 225 चौ.फुटाचा निवारा विनामूल्य उपलब्ध करुन दिला जाईल. त्याठिकाणी केवळ झोपड्याच नाहीत तर दुकाने सुध्दा आहेत. रिहॅबिलिटेशनसाठी मला एक मराठी शब्द सुचवावासा वाटतो. "नव्या सुस्थिरीकरणासाठी" या दुकानांना आपले मायबाप सरकार नियमाप्रमाणे 975 चौ.फूट क्षेत्रफळाची





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. अशोक मोडक पुढे सुरु...)

जागा द्यायला बांधील आहे. परंतु हे सरकार 225 चौ.फुटावर समाधान माना असे सांगते. बाकीचे 750 चौ.फूट विकत घ्या. आता ती माणसे कोर्टात गेलेली आहेत. The Matter is pending there. हे बेकायदेशीर भोगवटादार आता नुकसान भरपाई मागत आहेत. तेव्हा माझा तिसरा आरोप असा आहे की, या माणसांना तुम्ही घरे आणि दुकाने का थाटू दिलीत ? शासन झोपले होते काय ? आता ते लोक म्हणतात की, आमचा क्लेम पूर्ण केल्या शिवाय आम्ही जागा सोडणार नाही. प्रश्न असा आहे की, मुंबई शहाराच्या विकासासाठी आम्ही खूप काही करु चाहतो असा दावा या सरकारने करु नये. या सरकारने मुंबईचे वाटोळे करुन ठेवलेले आहे असा

माझा आरोप आहे. मिठी नदीचे काय केले ? एक तर ती नदी बुजवून टाकली. कुर्ला आणि बान्द्रा खाडी बुजवून जलप्रवाह संपवून टाकले. 25 जुलैला, घरातील आऊटलेट इनलेट बनल्याचे अनुभवाला आले. घराघरात सांडपाणी आले. ज्यांना अजून नुकसान भरपाई मिळालेली नाही अशा हजारो लोकांची यादी माझ्याकडे आहे.

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.शिगम 19:00

डॉ. अशोक मोडक ....

आता जिल्हाधिकारी आणि मामलेदार नक्राश्रू ढाळत आहेत. आपण मदत देऊ शकला नाही त्याबद्दल दिलगीरी तरी व्यक्त करावयाला पाहिजे होती. परंतु खोटया वल्गना करु नका. मुंबईच्या बाबतीत विजेचा प्रश्न उपस्थित केला आहे. आम्ही जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्याची उत्तरे आम्ही लेजिटिमेटली अपेक्षित करीत आहोत. प्रश्नांची उत्तरे मिळाली तर अभिनंदन करु अन्यथा मला अभिनंदन करण्याची हिंमत होत नाही. धन्यवाद.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. श्री. विलास अवचट (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. "नेमेचि येतो मग पावसाळा" या उक्तीप्रमाणे माननीय राज्यपालांनी याठिकाणी 60 मुद्यांमध्ये परामर्ष घेतलेला आहे. माझ्याकडे माननीय राज्यपालांची गेल्या तीन वर्षातील अभिभाषणे आहेत. या अभिभाषणामध्ये मुद्दा क्र. 59 जो महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि जिव्हाळयाचा प्रश्न आहे त्याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. माननीय राज्यपालांनी अभिभाषणामध्ये या मुद्याचा उल्लेख करताना असे म्हटले आहे की, दीर्घकाळ प्रलंबित असलेला महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्यासाठी माझ्या शासनाने सर्वोच्च न्यायालयात एक विशेष दिवाणी दावा दाखल केला असून हा प्रश्न सोडविण्यासाठी माझे शासन कटिबध्द आहे. गेल्या तीन वर्षाचे अभिभाषण पाहिले तर एकही शब्द इकडचा तिकडे न करता राज्यपालांनी या प्रश्नाबाबत मत व्यक्त केले आहे. सीमा प्रश्न हा महाराष्ट्राची अस्मिता आहे आणि भावनिक प्रश्न निर्माण झाला आहे. 20 लाख मराठी बांधव या सीमा भागामध्ये वास्तव्य करीत आहेत. एका अपेक्षेने ते याठिकाणी रहात आहेत. त्यांना वाटत आहे की आज ना उद्या संयुक्त महाराष्ट्रामध्ये आम्ही येऊ. गेल्या 40-45 वर्षामध्ये कर्नाटक शासनाने मराठी बांधवांवर कितीतरी अत्याचार केले आहेत. कानडीची सक्ती केली आहे. बेळगांव महानगरपालिका बरखास्त केली आणि त्या शहराचे प्रथम नागरीक म्हणून असलेल्या महापौरांना काळे फासले. हा सीमा प्रश्न आजपर्यंत राज्य शासन सोडवू शकले नाही याची मला खंत वाटते. सभापती महोदया, माननीय राज्यपालांनी ज्यावेळी या राज्याचा पदभार हाती घेतला त्यावेळी त्यांनी सपत्नीक हुतात्मा चौकात भेट दिली होती आणि 105 हुतात्म्यांना सॅल्युट करताना असे म्हटले होते की, महाराष्ट्राच्या थोर परंपरेला सॅल्युट करण्यासाठी आणि वैभव देण्यासाठी मी प्रयत्न करीन आणि खास करुन देशी व विदेशी गुंतवणूक कशी वाढेल हे पाहीन. त्यांनी 105 हुतात्म्यांना अभिवादन केले होते. राज्यपालांनी अभिवादन करुन एक वर्ष झाले आहे. परंतु अजूनही सीमा भागातील बांधवांना न्याय मिळू शकला नाही ही खेदाची गोष्ट आहे. या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी त्रिसदस्यीय उच्चाधिकार समिती नियुक्त केली. श्री. व्ही.टी.वालावलकर,श्री.राम आपटे आणि श्री. ओवालीकर अशी तिघांची समिती होती. श्री. वालावलकर यांच्या जागी श्री. अकोलकर कधी आले हा संशोधनाचा विषय आहे. या समितीने गेल्या तीन वर्षाच्या कारकिर्दीत काय केले ? महाराष्ट्राची बाजू केंद्रासमोर मांडत असताना त्याठिकाणी जे तज्ञ आहेत त्यांना कोणत्या प्रकारचे

....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट ...

मार्गदर्शन केले ? गेल्या तीन वर्षामध्ये आणि खास करुन गेल्या वर्षभरामध्ये न्यायालयात हे प्रकरण प्रलंबित असताना शासनाने कोणती भूमिका घेतली हे सांगणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट .....

मला शासनाला विनंती करावयाची आहे की, आतापर्यंत सीमा प्रश्न हा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील शेवटचा मुद्दा असतो. म्हणजेच शेवटी जाता जाता त्याचा परामर्ष माननीय राज्यपालांनी घेतलेला आहे. जाता जाता कृतकृत्य करुन आंघोळ करुन मोकळे झालो असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही असे मला वाटते.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्र. 57 मध्ये असे म्हटले आहे की, "माझ्या शासनाने मराठी नाटयसृष्टी तसेच मराठी नाटय संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी अनुदान देण्याचे जाहीर केले आहे" मराठी रंगभूमी, मराठी चित्रपटभूमी हे महाराष्ट्राचे वैभव व परंपरा आहे आणि ही सांस्कृतिक परंपरा चालविण्यासाठी शासनाने गेल्या दोन तीन वर्षांमध्ये चित्रपट तसेच नाटयसृष्टीसाठी अनुदान देण्यात येईल म्हणून सांगितले परंतु अद्यापही त्या संस्थांना अनुदान मिळाले नाही. त्यामुळे 34 चित्रपट निर्मात्यांवर जप्तीची वेळ आली आहे. ज्याप्रमाणे शेतकऱ्यावर जप्तीची वेळ येते, कामगारावर जप्तीची वेळ येते त्याप्रमाणे मराठी संस्कृतीची परंपरा जपणाऱ्या मराठी चित्रपटसृष्टीवर, चित्रपट निर्मात्यांवर जप्तीची वेळ सुध्दा या शासनाने आणलेली आहे. सध्याचे केंद्रीय उर्जा मंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी 11 ऑक्टोबर, 2004 रोजी एक अध्यादेश काढून मराठी चित्रपटांना अनुदान देण्याची घोषणा केली होती. या योजनेचे मराठी चित्रपट व्यावसायिकांनी स्वागत केले होते. परंतु असा अध्यादेश निघून दीड वर्ष होऊन गेले तरी देखील या निर्मात्यांच्या हातात अनुदानाचा एक रुपयाही पडला नाही. उलट त्यांनी कर्ज काढून जे चित्रपट तयार केले होते त्याचे व्याज भरता भरता त्यांना जप्तीला सामोरे जावे लागले. ही या राज्याची संस्कृती आहे काय ? हाच राज्यातील सांस्कृतिक कार्य विभागाचा कारभार आहे काय ? या निर्मात्यांना अनुदानाची रक्कम हाती पडण्यासाठी इतका विलंब लागत असल्यामुळे काही निर्मात्यांनी पुतपेढया तसेच खाजगी सावकारांकडून कर्ज उचलले आणि त्यांचे चक्रवाढ व्याज फेडता फेडता त्यांचीच चूल बंद होण्याची वेळ आली आहे. अशा प्रकारे जर सांस्कृतिक कार्य विभागाचा कारभार असेल तर मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करीन की, गेल्या दोन तीन वर्षांमध्ये मराठी नाटयसृष्टी, चित्रपटसृष्टीसाठी जे अनुदान जाहीर केले आहे ते निदान सन 2006-07 मध्ये तरी द्यावे तरच खऱ्या अर्थाने सांस्कृतिक परंपरा वाढीस लागेल.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट .....

महोदय, माननीय राज्यपालांनी अनेक मुद्दयांचा परामर्ष आपल्या भाषणातून घेत असतांना मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या इमारतींचाही प्रश्न मोठया प्रमाणात निर्माण होऊ पाहत आहे. गिरणी कामगारांचा प्रश्न आणि त्याचबरोबर जुलै 2005 मध्ये ओढवलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे भविष्यात मुंबईचे नुकसान होऊ नये म्हणून मुंबईचे जतन करण्यासाठी 11000 कोटीची मागणी केंद्रशासनाकडे आपण केली होती. मी हिवाळी अधिवेशनामध्ये याबाबतचा प्रश्न विचारला होता की, या 11000 कोटी रुपयापैकी केंद्रशासनाकडून आपल्याला प्रत्यक्षात किती रक्कम मिळाली ? त्याला माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले नाही. मुंबईतून जाणाऱ्या महसुलाचा जास्तीत जास्त वाटा केंद्रशासनाकडे जातो आणि त्या बदल्यात अशा प्रकारे मुंबईच्या व राज्याच्या तोंडाला पाने पुसली जाणार असतील तर ते योग्य नाही. याचा साधा उल्लेखही अभिभाषणामध्ये न करुन माननीय राज्यपाल देखील राज्यातील जनतेला एक प्रकारे फसवित आहेत असे म्हटले तरी ते अतिशयोक्तीचे होणार नाही. गिरणी कामगारांच्या श्रमातून, त्यांच्या घामातून ही मुंबई उभी राहिली आहे. गेल्या 30-35 वर्षांमध्ये मुंबई ही एक सोन्याचे अंडे देणारी कोंबडी बनली आहे व त्यात कामगारांचाच जास्त वाटा आहे. आजही आपण कामगार विभागातून फेरफटका मारला तर गिरणी कामगार उध्वस्त झाल्याचे दिसून येईल, त्यांची घरे उध्वस्त झाली असल्याचे दिसून येईल आणि त्यांच्या छाताडावर बसून, त्यांची जुनी चाळ संस्कृती जाऊन त्या ठिकाणी जंगी टॉवर संस्कृती येत आहे. त्याकडे बघत असतांना गिरणी कामगार मात्र रस्त्यावर येत आहे याचा विचार शासन करणार की नाही ?

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदया, ऑक्टोबर 2005 मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने मुंबई गिरणी कामगारांच्या बाजूने ऐतिहासिक निर्णय दिला. या निर्णयामुळे गिरणी कामगारांना खऱ्या अर्थाने न्याय मिळाला. परंतु या निर्णयाच्या विरोधात गिरणी मालक सर्वोच्च न्यायालयात गेले. त्याचा परिणाम असा झाला की, मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविला. त्यामुळे मुंबईत राहणाऱ्या गरीब कामगारांना शासन पुन्हा जगण्याचा हक्क प्राप्त करून देणार आहे काय ? असा माझा या निमित्ताने सवाल आहे.

माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेत अनेक मुद्यांचा परामर्श घेण्यात आला आहे. अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 11 वर आताच सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. आज मुंबई शहराला एक जागतिक दर्जाचे शहर बनविण्याकरिता प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी जागतिक बँकेबरोबर MUTP अंतर्गत करार देखील करण्यात आले. या करारात जागतिक बँकेने काही अटी टाकलेल्या आहेत. त्यात असे नमूद करण्यात आले आहे की, MUTP अंतर्गत पुनर्वसन करताना अस्तित्त्वात असलेल्या झोपडपट्टीवासियांना कायम स्वरूपी जागा द्यावी लागेल. त्यावेळी महाराष्ट्र शासनाने सन 1995 पर्यंतच्या झोपडीधारकाला जागा देण्याचा निर्णय घेतला होता. म्हणून हा प्रश्न त्यावेळी मी सभागृहात उपस्थित केला होता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, त्या अटी मान्य केल्या असल्या तरी शासन जनतेचे पुनर्वसन करणार आहे. शासनाने मुंबईतील प्रकल्पबाधीत जनतेचे पुनवर्सन योग्य प्रकारे न केल्यामुळे आज जागतिक बँकने सांगितले आहे की, बाप दाखव नाही तर श्राध्द कर. आज शासन जागतिक बँकेच्या अटी व शर्ती पूर्ण करीत नाही, तो पर्यंत प्रकल्प पुढे जाणार नाही ही काळया दगडयावरची रेष आहे.

मुंबईचे शांघाय करण्यासाठी उपाययोजना करण्याचे देखील सुचविण्यात आले आहे. त्यासंबंधी मी असे सांगू इच्छितो की, मुंबईला एक वेगळी संस्कृती आहे. आज गिरगाव, दादर, विलेपार्ले सारख्या ठिकाणी मुंबईतील संस्कृती पहावयास मिळते. मुंबईचे शांघाय नाही केले तरी चालेल, पण मुंबईची संस्कृती टिकवून ठेवली पाहिजे. मी येथे 2-3 मुद्दे उपस्थित केले आहेत, त्याचा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख नसल्यामुळे मी खेद व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

.... ..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी माननीय राज्यापालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडला आहे. त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

मी राज्यपाल महोदयाच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 7 कडे आपले लक्ष वेघू इच्छितो. कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी शासनाने पॅकेज दिले आहे. खरे म्हणजे शासनाची ही अत्यल्प मदत आहे. हेक्टरी एक हजार रुपये मदत शासनाने जाहीर केली आहे. फवारणीच्या मजुरीचा खर्च हा एक हजार रुपयांपेक्षा जास्त येऊ शकतो हे शासनाने लक्षात घ्यायला हवे होते. शेतकऱ्यांना 2 हेक्टरपर्यंत प्रति हेक्टर 1000/- रुपये मदत देऊन थट्टा करण्याचा प्रयत्न शासनाने केला आहे. शासनाने विदर्भातील 6 जिल्हयांना विशेष पॅकेज दिले आहे. या सहा जिल्हयातील शेतकऱ्यांच्या 25 हजार रुपयापर्यंतच्या थकित अल्पमुदती कर्जाच्या परतफेडीसाठी कालावधी नव्याने ठरवून देण्यात येणार आहे. हा कालावधी अल्पकालीन न राहता दीर्घकालीन असला पाहिजे. भांडे बाहेर पडण्यापुरता ही सवलत न राहता ती दीर्घकालीन असली पाहिजे, असे मला वाटते.

दुसरा एक चांगला मुद्दा राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये आला आहे. सवलतीच्या दराने 25 हजार रुपयांपर्यंतचे कर्ज, तारण न घेता देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. पण त्याचा व्याज दर किती असेल हे निश्चित करण्यात आलेले नाही. वर्तमानपत्रातून वेगवेगळे व्याज दर आले आहेत. 6 टक्क्यापेक्षा व्याज दर जास्त असता कामा नये. किंबहुना 6 टक्के व्याज दर देखील जास्त होतो. तो अतिशय कमी असला पाहिजे. नगण्य असला पाहिजे. रुपये 25000/- चे कर्ज विदर्भातील 6 जिल्हयातील शेतकऱ्यांना दिले पाहिजे. त्याची सुरूवात या हंगामापासून व्हावयास पाहिजे. शासनाने दिनांक 27 फेब्रुवारी 2006 रोजी जी.आर काढला आहे. हंगाम सुरू झाल्यानंतर ही योजना सुरू केली तर ते योग्य होणार नाही. येत्या हंगामापासून रुपये 25000/- चे कर्ज अत्यल्प व्याज दराने शासनाने दिले पाहिजे.

यानंतर श्री.बोर्डे....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे....

दुसरा महत्वाचा उल्लेख असा आहे की, कापूस एकाधिकार योजनेंतर्गत असलेला 750 कोटी रुपये भांडवल निधी 12 टक्के व्याजासह 35 लाख शेतकऱ्यांना परत करण्यात येणार आहे. वास्तविक पाहता ते पैसे शेतकऱ्यांचेच आहेत. परंतु या निमित्ताने का होईना ते त्यांना दिले जात आहेत हे विशेष. विदर्भातील सहा जिल्हयांतील शेतकऱ्यांना 25 हजार रुपयांपर्यंत टप्प्याटप्प्याने अनुदान दिले जाणार आहे. परंतु हे अनुदान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. अधिकारी वर्तमानपत्रातून काही तरी बातम्या प्रकाशित करतात. परंतु प्रत्यक्षात मात्र ग्रामीण भागातील शेतकऱ्यांपर्यंत या योजना पोहोचत नाही. शेतकऱ्यांना या योजना कोणासाठी लागू आहेत याचीच माहिती आणि मार्गदर्शन मिळत नाही. शेतकऱ्यांना जे अनुदान दिले जाणार आहे ते किती टप्प्यात दिले जाणार आहे याचा मात्र अभिभाषणामध्ये उल्लेख नाही. माझ्या मते हे अनुदान जास्तीत जास्त दोन टप्प्यामध्ये दिले पाहिजे. परंतु जर हे अनुदान 10 टप्प्यांमध्ये दिले जाणार असेल तर त्याला महत्व राहणार नाही.

महोदय, सेंद्रीय शेतीच्या संदर्भात ॲग्रीकल्चर ऑफिसर वर्तमानपत्रांतून बातम्या देतात. प्रत्यक्षात सेंद्रीय शेती म्हणजे काय ? हे सांगण्यासाठी मी शासनाला विनंती करु इच्छितो की, ॲग्रीकल्चर ऑफिसरला प्रथम चार भिंतीच्या बाहेर काढा. चार भिंतीत आणि ए.सी.मध्ये बसून शेती करता येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती करण्याचे मार्गदर्शन करण्यासाठी प्रथम या अधिकाऱ्यांना बाहेर काढणे आवश्यक आहे. या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतीमध्ये जाऊन शेतकऱ्यांना मागदर्शन करावयास हवे. वर्तमानपत्रामध्ये इतर तज्ज्ञ मंडळीचे मार्गदर्शन छापून येते, परंतु या अधिकाऱ्यांचे कसल्याही प्रकारचे मागदर्शन येत नाही. त्यामुळे या अधिकाऱ्यांनी तालुका स्तरावर कॅम्प आयोजित करुन, शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये मोठया प्रमाणावर विजेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. प्रत्येक ठिकाणी निरनिराळया तासांचे भारनियमन केले जात आहे. मुंबईला भारनियमन कमी, नागपूरला त्यापेक्षा जास्त, अमरावतीला त्यापेक्षा जास्त आणि ग्रामीण भागात तर विचारताच सोय नाही. वास्तविक पाहता, फेब्रुवारी, मार्च आणि एप्रिल महिन्यामध्ये विद्यार्थ्यांच्या परीक्षा असतात. त्यामुळे हे तीन महिने भारनियमन मुक्त करण्यात यावेत अशा प्रकारची मी मागणी करीत आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे....

इयत्ता 10 वी आणि 12 वी ची प्रश्नपत्रिका मुंबईतील विद्यार्थ्यांसाठी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एकच असते. परीक्षा पध्दती, पेपर तपासण्याची पध्दती ही सुध्दा सारखीच असते. परंतु भारनियमन शहरी भागामध्ये कमी तर ग्रामीण भागामध्ये मोठया प्रमाणावर केले जाते. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर अन्याय होतो. शहरापेक्षा ग्रामीण भागामध्ये मोठया प्रमाणावर भारनियमन केल्यामुळे आपण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना बोनस मार्कस् देणार आहात काय ? त्यामुळे यावर चिंतन होणे आवश्यक आहे. माझी तर अशी मागणी आहे की, परीक्षेच्या कालावधीत राज्यामध्ये भारनियमन एकतर समान करा किंवा पूर्णत: रद्द तरी करा. मी तर या मताचा आहे की, परीक्षेच्या कालावधीत भारनियमन पूर्णत: रद्दच केले पाहिजे.

महोदय, नक्षलवाद्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाने "आत्मसमर्पण योजना" सुरु केल्याचा अभिभाषणात उल्लेख आहे. माझ्या मतदारसंघात नक्षलाईज म्हणून घोषित झालेले तीन जिल्हे येतात. परंतु एकाही ठिकाणी नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केल्याचे दिसत नाही. मग आत्मसमर्पण ही योजना कशासाठी आणि कोणासाठी आहे ? माझ्या मते केवळ कागदावरच ही योजना अस्तित्वात आहे.

महोदय, जिल्हा परिषद व नगर परिषदांतील शाळांमध्ये ज्या योजना लागू केल्या आहेत त्या योजना मात्र विदर्भातील सहा जिल्हयातील ज्या खाजगी शाळा आहेत त्या शाळांतील शिक्षकांसाठी आणि कर्मचाऱ्यांसाठी लागू नाहीत. परंतु जी.आर.मात्र सर्वांना सारखाच आहे. ऑगस्ट-2004 च्या जी.आर नुसार एकस्तर पदोन्नती आणि अतिरिक्त घरभाडे योजना सर्व कर्मचाऱ्यांसाठी सारखी आहे. परंतु गडचिरोली, गोंदिया, यवतमाळ आणि अमरावती जिल्हयातील काही भागातील खाजगी संस्थांच्या शिक्षक आणि कर्मचाऱ्यांसाठी मात्र ही योजना लागू नाही. त्यामुळे ऑगस्ट-2004 च्या जी.आर.चा या जिल्हयांतील खाजगी संस्थांतील शिक्षक-कर्मचाऱ्यांना काहीएक फायदा होत नाही. त्यामुळे यामध्ये जी डिस्पॅरिटी आहे त्यामध्ये समानता आणणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री.अैनापुरे यांनी उल्लेख केला की, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये शिक्षण हा विषय सोडून देण्यात आला आहे. मला वाटते माननीय राज्यपालांना मराठी भाषेची माहिती नसल्यामुळेच हा विषय राहून गेला असावा.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे....

संत तुकाराम महाराजांच्या संदर्भात जो अवमानकारक उतारा प्रश्नपत्रिकेमध्ये छापून आलेला होता त्यासंदर्भात उद्या चर्चा होणार आहे. सध्या पेपर फुटणे हे नित्याचेच झालेले आहे. परंतु माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये यासंदर्भात कसलाही उल्लेख नाही.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही.यू. डायगव्हाणे ....

सभापती महोदय, या ठिकाणी केंद्र शासनाचा निधी येतो. या निधीचा खरोखर विनियोग होतो की नाही याचीही तपासणी करणे अतिशय आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन म्हणते की, निधी तिकडून येतो, तो निधी आल्यानंतर आम्ही इकडे पाठवितो. हा सर्व भ्रष्टाचार सर्वशिक्षा अभियानांतर्गत होत आहे. केंद्र शासनाचा निधी चांगल्या कामांसाठी येत असतो, तो चांगल्या कामांसाठीच वापरला गेला पाहिजे. सर्वशिक्षा अभियानांतर्गत केंद्र शासनाकडून येणाऱ्या निधीचा अपव्यय झालेला आहे व होत आहे. तरी, या गोष्टींना आळा घालणे गरजेचे आहे. मी मुद्दाम या गोष्टी आपल्यासमोर ठेवल्या आहेत, तरी आपण या बाबींवर प्रकाश टाकावा एवढी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, आपल्या सभागृहाचे ज्येष्ठ नेते सन्माननीय सदस्य श्री. मधुकरराव सरपोतदार यांनी अभिनंदनाचे प्रदीर्घ भाषण केले. माननीय राज्यपालांच्या गुणांची तसेच अवगुणांचे देखील त्यांनी अभिनंदन केले. मला त्यांना एवढेच सांगावयाचे आहे की, "मूकं करोति वाचाळम्, पंगुं लंध्यते गिरिम् ". भरारी घेण्याची जिद्द, आकांक्षाची झेप आम्हाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच घेता आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुण्यप्रतापाने दलित, आदिवासी, उपेक्षित, ओ.बी.सी., अल्पसंख्यांक यांना आधार मिळाला. त्यांच्याच पुण्यप्रतापाने दलितांमधील काही जण मंत्री, आमदार, खासदार झाले. मग ते म्हस्के असोत, हंडोरे असोत किंवा मी असो. आपण याबाबत आम्हाला आठवण करुन देण्याची गरज नाही. आम्ही शतकानुशतके जन्म घेऊन देखील त्यांच्या या उपकारांची परतफेड करु शकणार नाही. त्यांनी आमच्यावर अनंत उपकार केलेले आहेत. परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुण्यप्रतापाने आम्ही आमदार, खासदार झालो. या देशामध्ये अधिकार हिरावलेल्या उपेक्षित माणसांना माणूस बनविण्याचा चमत्कार परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केला. यासंबंधीची आठवण सन्माननीय सदस्य श्री. मधुकरराव सरपोतदार यांनी करुन द्यायची गरज नव्हती. जे डॉक्टर झाले, वकील झाले, आमदार झाले, खासदार झाले, बॅरिस्टर झाले ते कोणाच्या पुण्यप्रतापाने झाले आहेत ते काही आम्हाला कळत नाही असे नाही. माननीय राज्यपाल एक गोष्ट सांगतात की, जेव्हा आपल्या राज्यामध्ये केंद्र सरकारने त्यांची राज्यपालपदी नियुक्ती केली, तेव्हा त्याबद्दल काहूर माजविण्यात आले. अनेक प्रकारच्या शंका उपस्थित करण्यात आल्या. पण या अभिभाषणामध्ये त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, संविधानाच्या 131(ख) अन्वये महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादामध्ये महाराष्ट्राला न्याय मिळावा. बेळगाव, निपाणी, कारवारसहित संपूर्ण मराठी प्रदेश महाराष्ट्रात यावा आणि संयुक्त महाराष्ट्राची खऱ्या अर्थाने निर्मिती व्हावी. यासंबंधी सर्वोच्च न्यायालयामध्ये दिवाणी दावा देखील दाखल केलेला आहे. त्याबद्दल माननीय राज्यपालांचे अभिनंदन केल्याशिवाय राहवत नाही. आमच्या महाराष्ट्राचे सुप्रसिध्द लोककवी श्री. वामनदादा करडक असे म्हणतात की, "उन, पाऊस, वादळवारा मुळी आम्हा न शिवे, तुफानातील दिवे आम्ही, तुफानातील दिवे." महाराष्ट्रामध्ये अतिवृष्टी झाली, महापूर आला, जिवितहानी झाली, प्राणहानी झाली. 1200 लोक मृत्यूमुखी पडले. 27 हजार जनावरे मृत्यूमुखी पडली. शेतीचे नुकसान झाले. रस्ते वाहून गेले. 6 लाख घरांची

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पडझड झाली. त्यांना मानसिक, आर्थिक आधार देण्याचे काम या राज्याने केले. यांना मदत करण्याची ग्वाही माननीय राज्यपालांनी दिली आहे, हे विसरुन चालणार नाही. ही दुर्दैम्य इच्छाशक्ती आहे. विकासाच्या दिशेने गतिमान पावले टाकण्याचे सरकारचे धोरण माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये व्यक्त केले आहे. त्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे निश्चितपणे अभिनंदन करतो.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे....

शेतकऱ्यांचे प्रश्न आहेत, मुंबईला जागतिक शहर बनवावयाचे आहे, मेट्रो प्रकल्प पूर्ण करावयाचा आहे, राज्याचा आर्थिक विकास करावयाचा आहे. विजेचा प्रश्न आहे, या सर्व प्रश्नांचा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये आहे परंतु आमच्या देशामध्ये शिक्षणाची गरज आहे काय ? या संदर्भात संपूर्ण अभिभाषणामध्ये कोठेही उल्लेख दिसत नाही हा उल्लेख अनावधानाने राहून गेलेला आहे काय ? ज्या शिक्षणापासून माणूस घडतो, राज्याला दिशा मिळते अशा शिक्षणासंबंधी कोणताही उल्लेख नसावा ही मोठी खेदाची बाब आहे, याची दखल शासनाने घेतली पाहिजे. माननीय राज्यपाल महोदयांच्या संपूर्ण भाषणामध्ये आर्थिक विकास, रस्त्यांचा विकास, विजेची निर्मिती, अनेक प्रकारचे प्रकल्प, पुनर्वसनासंबंधीची माहिती, महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण या सर्व गोष्टी नमूद केलेल्या आहेत त्याबाबत मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु संपूर्ण भाषणामध्ये सामाजिक सेवेचा अभाव दिसत आहे. सामाजिक सुविधा नसलेले अभिभाषण आहे असे मला वाटते. विदर्भ, मराठवाडा, कोकण, खानदेश इतर संपूर्ण महाराष्ट्रातील भागात शेतकऱ्यांच्या मोठया प्रमाणात आत्महत्या होत आहेत याबाबत सरकारने अशी घोषणा केली होती की, या घटनेस सावकार जबाबदर असून अशा सावकारांना कोपरापासून ढोपरापर्यंत सोलण्यात येईल. परंतु आज राज्यामध्ये दलित, ओबीसी, आदिवासी, अल्पसंख्याक, समाजावर मोठया प्रमाणात अन्याय, अत्त्याचार होत आहेत त्यासंदर्भातील कोठेही उल्लेख या अभिभाषणामध्ये दिसून येत नाही. विविध विभागात सरकारी खात्यांमध्ये काम करणारे प्रशासकीय अधिकारी असोत, कर्मचारी असोत, समाजात राहणारे, गोरगरिब आदिवासी, दलित, ओबीसी समाजातील माणसे असतील त्यांच्या सुरक्षिततेबाबत कोणत्याही प्रकारचा उल्लेख यामध्ये असल्याचे दिसत नाही. किंवा याबाबत आपण काय उपाययोजना करणार आहात याचा कोठेही उल्लेख नाही. येथेच सामाजिक जाणीवेची उणीव दिसून येत आहे. यामुळेच अनेक प्रश्न निर्माण होतात व समाजामध्ये जाती-जातीमध्ये, शेतकऱ्यांमध्ये आत्महत्या करण्याची प्रवृत्ती बळावत आहे. शासनाचे कोणत्या प्रकारे अभिनंदन करावे हेच मला कळत नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण कमी होईल असे गृहित धरुन 1075 कोटी रुपयांचे पॅकेज दिले. तरी सुध्दा शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबलेल्या नाहीत. सावकारांना वेचून ठेचून काढण्याची भाषा केली गेली. परंतु या संदर्भात कोणतीही कार्यवाही ..

.....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे....

झालेली नाही. तसेच यामुळे या प्रवृत्तीमध्ये वाढ होत आहे याचा विचार करण्याची गरज आज निर्माण झालेली आहे. नागपूर जिल्हयातील कळमेश्वर तालुक्यामधील लोणारे गावातील 17 वर्षाची कांचन मिश्रा या दलित मुलीवर सायंकाळी 7.00 वाजता अत्त्याचार होत असतांना तिने वाचवा वाचवा अशी ओरड केली तरी तेथील गावांतील लोकांना नुसते पाहण्याशिवाय काहीही केलेले नाही, त्या मुलीला शेजारच्या शेतावर नेऊन तिच्यावर अत्त्याचार करण्यात आला व तिचा मुडदा पाडण्यात आलेला आहे. ही घटना 18 डिसेंबर, 2005 ची असून याबाबत अजून कोणतीही कारवाई शासनाकडून झालेली नाही. सरकारमधील कार्यक्षम गृहमंत्र्याचे अभिनंदन करावे की काय करावे याबाबत मला काहीही समजत नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सोलापूर जिल्हयातील एका गावातील एक घटना सांगितली ही घटना मला माहिती नव्हती, येथे मला त्या घटनेची माहिती मिळाली. एका मातंग समाजाच्या मुलीला नग्न करुन तिची दिवसा धिंड काढण्यात आली, तेव्हा हे महाराष्ट्राचे गृह खाते व त्यांचे पोलीस अधिकारी काय करीत होते ? या राज्यामध्ये मराठवाडा, विदर्भ, कोकण, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र या विभागातील प्रत्येक जिल्हयामध्ये मातंग, दलित समाजावर अत्त्याचार होत आहेत. प्रत्येक जिल्हयामध्ये दलितांवर होणारे अन्याय व अत्त्याचार मोठया प्रमाणावर वाढत चालले आहेत.

यानंतर श्री. सांगळे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठ नाही

MJS/ MAP/ KGS/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे .... 19:30

प्रा.जोगेंद्र कवाडे ....

आज पुतना मावशीचे प्रेम ओतू चालले आहे. परंतु दलितांवर झालेल्या अन्याय व अत्याचाराबाबत फक्त कवाडेंनीच बोलले पाहिजे व आपण हातामध्ये बांगडया घालून बसावे हे आता चालणार नाही. आपल्याकडे माणुसकी असेल, समतेची भावना असेल, कोणत्याही जातीच्या धर्मावर झालेला अन्याय, अत्याचाराबाबत चीड असेल तर आपण पेटून उठले पाहिजे व तशाप्रकारची आपण माणुसकी दाखवली पाहिजे. या मुंबई शहरामध्ये एका विशिष्ठ समुदायाबद्दल मी जेव्हा जेव्हा वक्तत्य ऐकतो त्यावेळी अल्पसंख्याक मुस्लीम समुदायावर राष्ट्रद्रोहाचा शिक्का मारण्याचा प्रयत्न केला जातो. ही बाब योग्य नाही. या देशाच्या भूमीतून जन्मलेला प्रत्येक नागरीक हा भारतीय आहे. राष्ट्रप्रेमाचा ठेका कोणी एकाने घेतलेला नाही. एम.एफ. हुसैन यांनी देवी-देवतांचे विटंबना करणारे चित्र काढले होते त्यावेळी देशात फार मोठे काहूर माजले होते. हिंदूच्या भावना जर कोणी दुखावल्या तर आपण त्याचा निषेध करतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकराबाबत अपशब्द काढल्यास आपण त्याचा निषेध करतो. हिंदू देवतांच्या कोणी भावना दुखावल्यास त्याचा आपण निषेध करतो. परंतु ज्यावेळी पैगंबराचे व्यंगचित्र काढले त्यावेळी त्याचा निषेध करण्यासाठी देशातील मुस्लीम समुदाय जेव्हा रस्त्यावर येतो त्यावेळी त्यांच्या विरुध्द विषवमन करण्याचे काम या ठिकाणी केले जाते. अशाप्रकारे त्यांच्या जखमेवर फुंकर घालण्याऐवजी मीठ चोळण्याचे काम केले जात आहे. संपूर्ण राज्यातील जनतेमध्ये अल्पसंख्याक समुदायाविरुध्द विषाची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो ही बाब लोकशाहीच्या तत्वात न बसणारी आहे. आज मुंबई नगरीमधील शेकडो एकर गिरणीच्या जागेवर मोठमोठया बिल्डरांद्वारे गगनचुंबी इमारती उभ्या करण्याचा षड:यंत्र रचले जात असल्यामुळे हजारो गिरणी कामगार देशोधडीला लागले आहेत. याबाबतची दखल माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये घेण्यात आली नाही. मुंबई गिरण्या बंद झाल्यामुळे त्या ठिकाणी काम करणा-या शेकडो कामगारांच्या घरातील विझलेल्या चूली पेटविण्याचे काम शासन करणार आहे की नाही. यासाठी गिरणी कामगारांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता आहे. हे पुनर्वसन शासन करणार आहे की नाही. आज राज्यामध्ये संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता मोहिम राबवली जात आहे. यामुळे गावांतील लोक हातामध्ये झाडू घेऊन गाव स्वच्छ करु लागल्यामुळे गावातील रोगरोई दूर होऊन गावे स्वच्छ होऊ लागली आहेत. अशा स्वच्छ व सुंदर गांवाना शासनातर्फे निमूर्लन गाव पुरस्कार देण्यात येणार आहे. परंतु गावांमध्ये रस्ते स्वच्छ झाले, कचरा साफ झाला परंतु त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ MAP/ KGS/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे .... 19:30

प्रा.जोगेंद्र कवाडे ....

गावांमध्ये हजारो वर्षांपूर्वीची जातीय मानसिकता असेल तर फक्त गाव स्वच्छ होऊन काही उपयोग होणार नाही. ही जातीय मानसिकता स्वच्छ करण्याचे काम कोण करणार ? हा महत्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे अशा प्रकारचा पुरस्कार देत असताना सदर गाव जाती विरहित गाव असेल तरच त्याच गावांना निर्मल गाव पुरस्कार देण्याचा शासनाने प्रयत्न केला पाहिजे. अन्यथा आज महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेण्याचा अधिकार आम्ही गमवून बसू असे मला या ठिकाणी सांगावेसे वाटते. आज धनाढय लोकांच्या शिक्षणाच्या सोयीसाठी स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठ असे मोठे गोंडस नाव देण्यात आले. मग त्यांच्याकडे मेरिट असो किंवा नसो. परंतु धनाढय लोक पैशाच्या बळावर मोठमोठया विद्यापीठांमध्ये जाऊन शिक्षण घेतील. याउलट दलित, आदिवासी, ओबीसी समाजाचा विद्यार्थी हुशार असेल, मेरिटचा असेल परंतु पैशाच्या अभावी एम.बी.ए., आय.आय.टी. किंवा इंजिनिअरिंग या सारखे उच्च शिक्षण घेऊ शकत नाही. यासाठी पैसा कोठून आणणार आहात याबाबतचा विचार माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये करण्यात आलेला नाही. स्वयं: अर्थ सहाय्यित विद्यापीठाचे ढोंग देशामध्ये यशस्वी झालेले नाही. त्यामुळे ते महाराष्ट्राच्या डोक्यावर टाकण्याचा प्रयत्न कृपा करुन टाळावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

**<u>सभापतीस्थानी : माननीय उपसभापती</u>**

यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे ....

तेव्हा या संदभात आमचे विरोधी पक्षनेते सन्माननीय श्री. फुंडकर यांनी सांगितले की, या सरकारचा पायगुण, मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांचा पायगुण चांगला नसल्यामुळे महाराष्ट्रावर या आपत्ती आल्या. सभापती महोदय, मला या ठिकाणी सांगावेसे वाटते की, या राज्यात जेव्हा शिवसेना-भाजप युतीचे सरकार होते त्यावेळी राज्यात दलितांवर होणारे अत्याचार, मुंबईतील रमाबाई आंबेडकर नगरामध्ये दिवसा ढवळ्या निरपराध दलितांना, 14 लोकांना गोळ्या घालून मारण्यात आले त्यावेळी आपणाकडून एकही शब्द आला नाही. तेव्हा आपला तो बाळ्या आणि दुसऱ्याचे ते कार्टे ही जी आपली भूमिका आहे ती बदलली पाहिजे. आता पायगुणाचेच म्हणत असाल तर या देशातील एकूणच व्यवस्थेचा अवगुण इतका मोठा आहे, देशाची व्यवस्थाच अभद्र आणि नालायक आहे की, त्यामुळे या देशाचे वाटोळे तुम्ही करून टाकले आहे. तेव्हा या देशातील अशा व्यवस्थेचा उल्लेख करून माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये केला असता तर आम्हाला निश्चित बरे वाटले असते. सभापती महोदय, या राज्यातील निराधार, दलित, शोषित समाजासाठी केवळ एकच तरतूद यामध्ये दाखविली आहे आणि ती म्हणजे अनुसूचित जातीच्या युवकांचे पोलीस दल आणि सैन्य दलातील भरतीचे प्रमाण वाढविण्यासाठी त्यांना विशेष पूर्व प्रशिक्षण देण्यात येणार आहे आणि त्यासाठी तीन महिन्यांच्या निवासी प्रशिक्षणाकरिता प्रति शिक्षणार्थी 8500 रूपये खर्च करण्यात येणार आहे. तसेच आदिवासी मुलांना समर्थ बनविण्यासाठी आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, ठाणे, नासिक, नंदूरबार, अमरावती व गडचिरोली या प्रामुख्याने आदिवासींचे वास्तव्य असणाऱ्या जिल्ह्यांच्या मुख्य ठिकाणी, इंग्रजी माध्यमाच्या पाच निवासी शाळा स्थापन करण्याचे शासनाने ठरविले आहे. आता याच काळात आपण सेल्फ फायनान्सिंग विद्यापीठे निर्माण करणार आहोत. आता या शाळांतील तयार होऊन निघालेल्या दलित, आदिवासी विद्यार्थी काही लक्षावधी रूपये डोनेशन देऊ शकत नाही, शकणार नाही. मग तुम्ही ही विद्यापीठे कोणासाठी आणणार आहात ? म्हणजे एक प्रकारे ताटामध्ये तर द्यायचे पण त्याला ते खाऊ द्यायचे नाही ही जी प्रवृत्ती आहे ती आमच्या राज्य सरकारने थांबविली पाहिजे. सभापती महोदय, या ठिकाणी एक महत्त्वाची गोष्ट अशी की, दारिद्र्य रेषेखालील जनता या राज्यामध्ये फार मोठ्या संख्येने राहात आहे. त्यांचा देखील या अभिभाषणामध्ये कोठे उल्लेख नाही. आता आपण स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे आणणार आहात. अर्थातच ही श्रीमंतांसाठीची तरतूद

..... 3टी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे .....

आहे. पण गरीबांसाठी मात्र कोणत्याही प्रकारचा उल्लेख यामध्ये नाही. फुले, शाहू, आंबेडकरांचा वारसा सांगणाऱ्या सरकारच्या ध्येय्यधोरणामध्ये म्हणजे माननीय राज्यपालांच्या या अभिभाषणामध्ये त्याचे चित्र दिसत नाही ही आमच्या दृष्टीने खेदाची गोष्ट आहे. आम्ही ज्याला मानवी चेहरा म्हणतो तो यामध्ये आम्हाला कोठेच दिसत नाही. तेव्हा माझी एवढीच विनंती आहे की, सरकारने या बाबीचा गांभीर्याने विचार करावा आणि या व्यतिरिक्त देखील ज्या काही उणीवा आहेत त्या लक्षात घेऊन आमच्या राज्याला प्रगतीच्या दिशेने आणण्याची अशा दाखविली. दीपक दाखविला. हे जे तुफानातील दिवे आहेत त्यांचा उजेड आमच्या दलित, आदिवासींच्या वस्त्या, वाड्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम सरकारने करावे अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

( यानंतर श्री. सरफरे ..... 3यू 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधु चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी असून मुंबइला जागतिक दर्जाचे शहर बनविण्याच्या प्रयत्नातून जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी क्षेत्र नवीकरण अभियान सुरु करण्यात आले आहे. त्यामध्ये मुंबई शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा कुठेही विचार केलेला नाही. ही योजना आणण्यापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात पहिली बैठक घेतली. त्यामध्ये केंद्र सरकारने काही निकष लावले आहेत त्यापैकी मुंबईमध्ये एफ.एस.आय. किती वाढविणार यावर विचार करण्यात आला. आपल्याला पुढील 25 वर्षाचा इतिहास डोळयासमोर ठेवून या शहराची रचना करावयाची आहे. आज या मुंबई शहराची लोकसंख्या 1 कोटी 25 लाख इतकी झाली आहे. आणखी 25 वर्षांनी मुंबई शहराची वाढलेली लोकसंख्या गृहीत धरुन आपण जर योजना राबविली नाही तर मुंबई शहरामध्ये हाहाकार माजल्याशिवाय रहाणार नाही. त्या संदर्भामध्ये मी या ठिकाणी दोन-तीन मुद्दयांना स्पर्श करुन माझे भाषण संपविणार आहे. मुंबई हे जागतिक दर्जाचे शहर बनविण्यासाठी, मुंबईमध्ये अनेक विकास प्रकल्प राबविण्यासाठी जागतिक बँक व जपान सरकारने आर्थिक सहाय्य देण्याची तयारी दर्शविली आहे याचा शासनाने विचार केला आहे कां? त्याबाबत जागतिक बँकेने अशी अट घातली आहे की, मुंबईमध्ये कमीत कमी 6 ते 7 इतका एफ.एस.आय.ठेवण्यात यावा. या मुंबई शहराचे इन्फ्रास्ट्रक्चर वाढलेले आहे. मुंबई ही एका बेटावर वसलेली आहे. त्यामुळे एक इंच सुध्दा जमीन मुंबई शहरामध्ये वाढविता येऊ शकत नाही अशी परिस्थिती आहे. आणि म्हणून जागतिक बँक आपल्याला जे कर्ज देणार आहे, ते कर्ज देतांना त्यांनी घातलेल्या अटींमुळे सर्वसामान्य मध्यमवर्गीय माणूस उध्वस्त होणार आहे याची शासनाने कधीही काळजी केलेली नाही. मुंबईमध्ये जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी क्षेत्र नवीकरण अभियान ही योजना राबविण्याकरीता केंद्र सरकार 50 टक्के अनुदान देणार आहे, 35 टक्के रक्कम अंतर्गत कर्ज रोखे उभे करुन व 15 टक्के रक्कम शासन देणार आहे. शासन ही आर्थिक मदत अनुदानाच्या स्वरुपामध्ये करणार आहे काय यासंबंधी अभिभाषणामध्ये उल्लेख करण्यात आलेला नाही. ही बाब स्पष्ट न झाल्यामुळे केवळ मदतीचे गाजर दाखविण्यात अर्थ नाही. माझी अशी मागणी आहे की, मुंबई शहराचा एफ.एस.आय. 1.33 आहे तो 1 वर आणला पाहिजे. असे म्हणतात की, मुंबईचा एफ.एस.आय. वाढविल्यामुळे या मुंबई शहरामधील पाणी पुरवठयाच्या योजना, सांडपाण्याच्या योजना, पावसाळी पाणी वाहून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधु चव्हाण...

जाण्याच्या योजनांचे बारा वाजले आहेत. या भाषणात प्रत्येक ठिकाणी म्हटले आहे की, माझे शासन जागतिक बँकेकडे कर्ज मागणार आहे. माझे शासन आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे कर्ज मागणार आहे. म्हणजे भिकेची करवंटी घेऊन "दे दान सुटे गिरान" अशाप्रकारे भिकाऱ्याच्या अवस्थेमध्ये भीक मागून या शहराचा विकास करण्याची आपली प्रवृत्ती आहे काय? या प्रवृत्तीमधून आपण काय साधणार आहात? म्हणून मला असे वाटते की, पहिल्यांदा आपण मुंबई शहरामध्ये परराज्यातून येणारे लोंढे थांबविले पाहिजेत. मुंबई शहराचे वाटोळे करण्याचे पाप तुमचे आहे. श्रीमती इंदिरा गांधी यांनी 1971 मध्ये गरीबी हटावचा नारा दिल्यानंतर 1972 मध्ये विधानसभेची निवडणूक झाली. व त्यानंतरच्या प्रत्येक पाच वर्षांनी होणाऱ्या निवडणुकीच्या वेळी बॅ.रजनी पटेल, मुरली देवरापर्यंत मुंबई कॉग्रेसच्या सर्व अध्यक्षांनी मतांचा जोगवा मागण्यासाठी आम्ही झोपडपटटयांना मान्यता देवू असे सांगून या मुंबईचे वाटोळे करण्याचे पाप केले आहे. राज्यकर्त्यांनी शहराचे नियोजन करतांना पुढील 25 वर्षाचा विचार करावयाचा असतो. जनता तुमच्या हाती सत्ता देईल नाही तर देणार नाही. परंतु जेव्हा जनता तुम्हाला राज्य करण्यासाठी तुमच्या हातामध्ये सत्ता देते त्यावेळी त्या सत्तेचा दूरदृष्टीने उपयोग केला नाही तर आज मुंबई शहराची जी अतिशय भयानक स्थिती झालेली आहे, त्यापेक्षा अधिक भयानक झाल्याशिवाय राहणार नाही. मिठी नदीच्या विषयावर अर्ध्या तासाच्या चर्चेच्यावेळी मी बोलेन. मिठी नदीबाबत अभ्यास करण्यासाठी नेमण्यात आलेल्या चितळे समितीच्या अहवालातील शिफारशींचा विचार या अभिभाषणामध्ये करण्यात आलेला नाही. मिठी नदीच्या विकासाच्या योजनेचे उद्घाटन करण्याकरीता 15 दिवसापूर्वी मुंबईमध्ये कार्यक्रम करण्यात आला त्यामध्ये मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांची खूप स्तुती करण्यात आली. या अधिकाऱ्यांच्या रुपाने कुणी तरी अल्लाह, फरीश्ते आले असून तेच या मुंबई शहराचा विकास करणार आहेत अशाप्रकारचे वातावरण निर्माण करण्यात आले. आता पर्यंत या मिठी नदीमधून महानगरपालिकेकडून एक किलो सुध्दा गाळ बाजूला काढला गेलेला नाही. या मिठी नदीच्या काठावर असलेल्या अनधिकृत बांधकामांपैकी एक सुध्दा बांधकाम तोडले गेलेले नाही. नदीच्या काठावर असलेले उद्योग थांबविण्यात आले. परंतु नदीचे पात्र माहीम कॉजवेच्या ठिकाणी रुंद व खोल करण्यासाठी तेथील अनधिकृत असलेली बांधकामे तोडण्याकरीता एकही योजना तयार केलेली नाही. शासनाच्या या केवळ जनतेची दिशाभूल करणाऱ्या योजना आहेत. याठिकाणी माननीय सदस्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे ही मुंबई श्रमिकांची आहे, मुंबई ही मध्यमवर्गीयाची आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधु चव्हाण...

मुंबई ही बस ड्रायव्हर, बस कंडक्टर, पोस्टमन, पोलीस, कारकून, शिपाई, शाळा मास्तर, प्रोफेसरची आहे, सर्वसामान्य माणसाची आहे. जो घाम गाळून व प्रामाणिकपणे जीवन जगून आपला इन्कम टॅक्स व इतर सर्व टॅक्स आपल्या पगारामधून देतो. जो बस स्टॉपवरील रांगेत उभा रहातो, आणि बस आल्यानंतर घुसाघुशी न करता शिस्तीत बसमध्ये चढतो, जो मुंबईच्या उपनगरी ट्रेनमधून श्वास कोंडलेल्या अवस्थेत प्रवास करीत असतो अशा माणसाची ही मुंबई आहे. अशा या मुंबईतील सर्वसामान्य माणसाचे जीवन उध्वस्त करणारा सुप्रिम कोर्टाचा निर्णय जरी झालेला असला तरी त्या विरुध्द दाद मागण्याकरीता आम्ही फुल बेंचपर्यंत, घटनात्मक बेंचपर्यंत जावू असे माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये म्हटले असते तर अधिक बरे वाटले असते. या मधून तुम्ही मुंबईला काय देणार आहात? मोटेल्स, मॉल्स मोठ-मोठे रेस्टॉरंट, डान्स बार, नग्नतेचे प्रदर्शन करणारी मोठ-मोठी हॉटेल्स ही नवीन संस्कृती निर्माण करुन मूळ मुंबईकर मध्यमवर्गीयांची असलेली संस्कृती तुम्ही रसातळाला मिळविणार आहात काय? आपण या मुंबई शहराची नव्याने उभारणी करतांना एक तृतियांश जमिनींवर आम्ही मोकळी मैदाने ठेवू असे याठिकाणी म्हणावयास हवे होते. आज वाढलेल्या प्रचंड वस्तीमुळे मुंबई शहरामध्ये मोकळा श्वास घ्यायला जागा शिल्लक नाही. मुंबई शहरामध्ये लोकांना चालण्याकरीता फूटपाथ शिल्लक नाही. मुंबई शहरामध्ये फूटपाथवरील झोपडपट्टयांमुळे तुम्ही रस्ते रुंद करु शकत नाही. मुंबई शहरातील फूटपाथ ही एक फॅशन स्ट्रीट झाली आहे. त्या फूटपाथवर पूर्वी दहा-वीस कपडयांची दुकाने होती. त्या दुकानांची संख्या वाढत जावून आता ती पारशी विहिरीपर्यंत आली आहेत. या पापामध्ये पोलीस, महानगरपालिकेचे अधिकारी व लोकप्रतिनिधी हे सर्व सहभागी असल्यामुळे मुंबई शहरामध्ये सर्वसामान्यांना जगणे कठीण झाले आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. यासाठी तुम्ही कोणती योजना आणणार आहात ? 20-20, 25-25 मजल्याच्या इमारती तुम्ही बांधत आहात. मुंबईमध्ये 3.5 रिस्टर स्केलचा भूकंप झाला तर मुडदे उचलण्यासाठी माणसे रहाणार नाहीत. या संदर्भाने काहीच उल्लेख केलेला नाही. तुम्ही असे सांगणार आहात काय की, आम्ही एक तृतियांश जमिनीवर मध्यमवर्गीयांसाठी धरे बांधणार आहोत, तसे कम्पल्सरी करु. तसा अभिभाषणामध्ये एका शब्दानेही उल्लेख केलेला नाही. सभापती महोदय, शेवटी मी माझे दोन मुद्दे मांडून बोलणे संपविणार आहे.

आबांच्या पोलीस खात्यामध्ये जणु काही रामराज्य चाललेले आहे, असे भासविले जाते. शनि-शिंगणापूर येथील लोक आपल्या घराचा दरवाजा बंद करत नाहीत, दरवाजाला कुलुप लावत नाहीत. त्या ठिकाणी कोणी चोरी करण्यास प्रवृत्तही होत नाही. मी एक साधे उदाहरण देतो. आबु सालेम यांनी कबुली जबाबामध्ये सांगितले की "होय, मी संजय दत्तला रायफल दिली." या संदर्भाने माझी अशी मागणी आहे की, श्री.संजय दत्तचा जामीन रद्द करुन त्याला त्वरित अटक करावी. कोणी गुंड श्री. डी.के.राव सांगतो की, अर्थसत्य सांगितले गेलेले आहे. श्री.डी.के.राव आणि राजन यांचे बोलणे चाललेले आहे हे सिध्द करण्यासाठी पोलिसांनी कोर्टाला टेप सादर केली. त्या संदर्भातील 72 पानांचा मजकूर आहे, असे असतांना चारच पानाचा मजकूर कोर्टाला का सादर करण्यात आला ? दुसरी गोष्ट अशी की, श्री.संजय दत्त याचा जामीन रद्द करण्याची तुमची हिम्मत होत नाही. त्यांना एकदा गजाआड जाऊ द्या. 14 वर्षे झाली बॉम्बस्फोट झालेल्या प्रकरणामध्ये अजूनही निर्णय लागत नाही. आज विधवांची कपाळे पांढरी झाली, कपाळावर सुरकुत्या पडल्या, तरी अजून निर्णय लागत नाही. लहान मुले, शाळेतील मुले या बॉम्बस्फोटामध्ये मरण पावली. जगामध्ये ज्या ज्या ठिकाणी अशाप्रकारे बॉम्बस्फोट झाले, त्या ठिकाणी दोन-तीन वर्षामध्ये आरोपींना शिक्षा होऊन नराधम आरोपी गजाआड गेलेले आहेत. इलेक्ट्रॉनिक मेडिया श्री.आबु सालेम किती वाजता उठतो, तो कसा दिसतो, किती वाजता चहा पितो, या संबधातील माहितीवजा दृश्य दाखवत आहोत. म्हणजे कोणी तरी भगतसिंग, राजगुरु, सुखदेव, सावरकर यांना जसे दररोज दाखविले जाते, तो आबू सालेम याला दाखविले जाते. त पोलीस व्हॅनमध्ये आत जाऊन बसलेला आहे,असे हिरोसारखे दृश्य दाखविले जाते. या बदमाश माणसाची एक ओळ देखील वर्तमानपत्रातून छापता कामा नये. माझी अशी मागणी आहे की, की,आबु सालेम यांनी आपल्या जबानीमध्ये "होय, संजय दत्तने दोन-चार रायफली घेतल्या आणि त्यातील एक रायफल रख दो, असे ---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरु.....

म्हणाला",असे सांगितलेले आहे. तेव्हा श्री.संजय दत्त याचा जामीन रद्द करावा. एखाद्या चोरीच्या प्रकरणामध्ये चोर एकदा सापडला तर त्यास जामीन मिळतो. पण पुन्हा तो चोरीच्या प्रकरणात सापडला तर त्याचा पहिला जामीन रद्द केला जातो आणि पुन्हा त्यास गजाआड करुन त्याची चौकशी केली जाते. आता श्री.आबु सालेम यांनी जे स्टेटमेंट दिलेले आहे, ते सबॉर्डिनेट स्टेटमेंट म्हणायचे की, पुन्हा त्याची आणखी वेगळी केस करायची ? पुन्हा वेगळी केस करायची म्हटली तर त्यामध्ये 12 वर्षे जाणार. हा काय तमाशा चाललेला आहे,हे समजत नाही. या ठिकाणी मोठया रुबाबामध्ये सांगितलेले आहे की, माझे शासन या वर्षी 10 हजार पोलिसांची भरती करणार आहे. आपण हरीचे लाल आहात. 1960 चा या संदर्भात निकष लावलेला आहे. 1960 मध्ये 40 लाख मुंबईची लोकसंख्या होती. 1960 साली गुत्तीने, रामपुरी चाकूने खून केला जात होता. त्या जागी आता रिव्हॉल्वर आलेले आहे. 1960 सालामधील गुन्ह्याचे प्रमाण आता बदललेले आहे. 1960 साली म्हातारी माणसे प्लॉटमध्ये रहात होती, त्यांच्या घरच्या नोकराने त्यांचा खून केला असा प्रकार फार क्वचितच होत होतो. फारसे तसे माझ्या कधी वाचनामध्ये आले नाही. 2006 साली मुंबईमध्ये किती पोलीस लागतील, ट्राफिकसाठी किती पोलीस लागतील, मुंबईमध्ये गुन्हेगारीचे किती प्रमाण वाढलेले आहे ? आता गुन्हेगार नराधमाची प्रवृत्ती कशी झालेली आहे] हे पाहिले तर असे दिसून येईल की, आज या मुंबई शहरामध्ये चार महिन्याच्या, 11 महिन्याच्या मुलीपासून 70 वर्षाच्या जख्खड म्हाताऱ्या महिलेवर बलात्कार व्हायला लागलेले आहेत. अशी नराधम माणसे 1960 साली नव्हती. मग तुम्हाला आता जास्त पोलीस घ्यायला नको काय ? अशी हुशारी मारलेली आहे की, 10,500 इतकी पोलिसांची नवीन पदे 1960 सालच्या निकषावर निर्माण करणार आहोत. मला असे वाटते की, राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कोणत्याही प्रकारची दिशा नाही. संकट येत आहे, असे सांगितलेले आहे. मुंबईवर संकट आहे, विजेचे संकट आहे, असे सांगितले जाते. आमच्याकडे एवढे पैसे आहेत, एवढया पैशामध्ये महाराष्ट्र राज्याच्या 10 क्षेत्रामध्ये आम्ही प्रगती करणार आहोत असे सांगितलेली आहे. हे सगळे भाषण वाचल्यानंतर आणि गेल्या दोन वर्षामधील भाषणे वाचल्यानंतर असे वाटते की, 'नेमेचि येतो मग पावसाळा,सृष्टीचे कौतुक जाण बाळा'. त्याप्रमाणे हे भाषण आहे. मला वाटते की, हे भाषण दिशाहीन आहे. महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेला आगामी वर्षामध्ये आघाडी शासन शेतकरी, कष्टकरी यांच्या जीवनात काही सुधारणा करणार आहे, असे दिसत नाही. त्यामुळे अभिनंदन करण्यासारखे या भाषणामध्ये काही नाही, अशाप्रकारचे वक्तव्य करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (नाम-नियुक्त) : सभापति महोदय, महामहिम राज्यपाल के अभिभाषण का स्वागत करने के लिए मैं खड़ी हुई हूँ. गत वर्ष जुलाई से अक्टूबर के दरम्यान महाराष्ट्र में हुई अतिवृष्टि से जो तबाही मची थी और जिससे जान-माल का नुकसान हुआ था, उसे देखते हुए राज्य की आर्थिक स्थिति सुधरने में काफी समय लग जाएगा, ऐसा कहा जा रहा था और इसमें तथ्यांश भी था. आज तक शासन ने 1200 करोड़ रुपए सिर्फ तुरन्त रिलीफ देने के लिए खर्च किए हैं. इससे अंदाजा लगाया जा सकता है कि राज्य की तिजोरी पर अचानक कितना दबाब पड़ा. लेकिन इसके बावजूद शासन ने जिस ढंग से नैसर्गिक आपत्ति का सामना किया और राज्य के विकास चक्र की गति को कायम रखा, यह अपने आप में सरकार की एक बड़ी उपलब्धि है, जिसका मैं तहेदिल से स्वागत करती हूँ.

सभापति महोदय, राज्यपाल महोदय का अभिभाषण एक ऐसा दस्तावेज है, जिसके द्वारा सरकार की प्रबल इच्छा शक्ति उजागर होती है. इतना बड़ा राज्य चलाते समय उन्नीस-बीस होना स्वाभाविक है. एक कुटुंब प्रमुख इच्छा शक्ति के बावजूद भी अपने कुटुंब में सभी को खुश नहीं रख सकता है. यहां तो 8 करोड़ जनता का सवाल है. यह जानते हुए भी कि उन्नीस-बीस हो सकता है, मैं विनम्रता के साथ कुछ मुद्दे सदन के सामने रखना चाहती हूँ. बच्चा जब तक रोता नहीं, तब तक माँ भी उसे दूध नहीं पिलाती है. अतिवृष्टि के बारे में मैं कहना चाहूंगी कि मुंबई के साथ साथ दूसरी जगहों पर भी बहुत सारी तबाही मची थी. इस सदन में मीठी नदी का विकास करने का जिक्र किया गया. मुझे ऐसा लगता है कि मराठवाडा में जिस प्रकार से तबाही हुई, उसका भी उल्लेख इस सभागृह में होना आवश्यक है. अतिवृष्टि के कारण परभणी जिले में 638 गांवों को नुकसान हुआ और इसमें से 70 गांव तो बाढ़ के पानी में डूब गए थे. इस कारण किसानों की खेती का, लोगों के घरों का, स्कूल्स का, हॉस्पिटल्स का इतना ज्यादा नुकसान हुआ कि इस नुकसान की भरपाई करने के लिए करोड़ों रुपए भी कम पड़े. परभणी और नांदेड़ जिले में बाढ़ के कारण जो नुकसान हुआ, वह बहुत हद तक कम किया जा सकता था, ऐसा मैं मानती हूँ. परभणी जिले में बाढ़ आने के जो अनेक कारण हैं, उनमें लोअर दुधना प्रकल्प का पूरा नहीं होना सब से अहम कारण है. अगर लोअर दुधना प्रकल्प समय पर पूरा हुआ होता तो बाढ़ में परिवर्तित हुए पानी को प्रकल्प में रोका जा सकता था. एक ओर तो हम मीठी नदी के विकास

. . . 3W-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्रीमती फौजिया खान

की बात करते हैं और नुकसान होने पर भरपाई के रुप में करोड़ों रुपए खर्च करते हैं, लेकिन मराठवाडा में अतिवृष्टि के समय नुकसान को रोकने के लिए लोअर दुधना प्रकल्प को प्राथमिकता के आधार पर पूरा करने की बात नहीं होती है. इस के लिए शासन के पास इच्छा शक्ति होने की जरुरत है.

सभापति महोदय, पश्चिम महाराष्ट्र की तुलना में मराठवाडा की जमीन भिन्न प्रकार की है. यहां की जमीन में पानी आसानी से ड्रेन नहीं होता है, इसलिए हम जो परकुलेशन टँक बनाते हैं, वे इवोपरेशन टँक बन रहे हैं. इसलिए इस प्रायरिटी को बदलने की जरुरत है. मैं ऐसा समझती हूँ कि बाढ़ के कारण मराठवाडा में जो नुकसान हुआ, उसको कुछ हद तक कम किया जा सकता है और इसके लिए नाला सरलीकरण को प्राधान्य देने की जरुरत है. इसके साथ साथ भूमिगत और बनराई बंधारों के काम को प्राधान्य देने की जरुरत है. कोल्हापुर टाइप बंधारों का मेन्टेनेन्स भी उतना ही जरुरी है. ये सारे कार्य शासन का प्राथमिकता के आधार पर करने चाहिए, ऐसी मेरी मांग है.

सभापति महोदय, इस वर्ष 70 गांव बाढ़ के कारण बुरी तरह से प्रभावित हुए हैं, उन गांवों का जल्दी से जल्दी पुनर्वसन करने की जरुरत है. लेकिन देखा जाता है कि संकट दूर होने पर हम उस तरफ ज्यादा ध्यान नहीं देते. 1987-88 में ऐसी ही स्थिति पैदा हुई थी और उस समय 38 गांव बाढ़ की लपेट में आए थे.

. . . भाषण जारी, नंतर तालेवार.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंदी

उनका भी पुनर्वास आज तक प्रस्तावित है, आज तक उनका पुनर्वास नहीं हुआ है. इसलिए मेरा यह अनुरोध है कि इन 70 गांवों के लोगों के पुनर्वास के लिए एक खास अभियान चलाकर पुनर्वास का कार्य पूरा किया जाना चाहिए.

सभापति महोदय, हम हमेशा ही डिझास्टर मैनेजमेंट प्लान की बात करते हैं. इस सदन में भी इसका उल्लेख अनेक बार किया गया है. लेकिन मैं सरकार से यह पूछना चाहती हूं कि क्या है यह डिझास्टर मैनेजमेंट और क्या यह डिस्ट्रिक्टवाइज बनाया गया है ? अगर नहीं बनाया गया है, तो क्या बरसात का मौसम आने से पहले यह बनकर तैयार होगा ? यह डिझास्टर मैनेजमेंट प्लान डिस्ट्रिक्टवाइज बनाना इसलिए जरुरी है क्योंकि भिन्न भिन्न जिलों की समस्याएं भिन्न भिन्न हैं. इसलिए प्रत्येक जिले के जो प्रश्न हैं, वे डिस्ट्रिक्टवाइज डिझास्टर मैनेजमेंट प्लान में समाविष्ट हो सकते हैं. इसलिए डिझास्टर मैनेजमेंट प्लान डिस्ट्रिक्टवाइज बनाया जाना चाहिए, ऐसा मुझे लगता है. सरकार मेरे इस सुझाव पर विचार करें.

सभापति महोदय, हमारा राज्य शिक्षा क्षेत्र में हमेशा ही संवेदनशील रहा है. लेकिन फिर भी इस क्षेत्र में अधिक ध्यान देने की जरुरत है. राज्य सरकार और केन्द्रीय सरकार शिक्षा पर ढाई-तीन प्रतिशत धनराशि खर्च करती है जबकि विकसित देशों में यह प्रमाण 6 से 7 प्रतिशत है. हम सब महात्मा फुले, शाहू और आंबेडकर जी की विचारधारा की बात करते हैं लेकिन यह भूल जाते हैं कि शाहू महाराज जी अपने कोल्हापुर संस्थान में शिक्षा पर 23 प्रतिशत खर्च करते थे. यह आज भी विश्व रिकार्ड है जिसकी ओर नज़रअंदाज़ किया जाता है. इसलिए मेरा यह अनुरोध है कि शिक्षा क्षेत्र पर अधिक खर्च करना जरुरी है. शिक्षा पर अधिक खर्च करना इस राज्य के लिए अनिवार्य है, ऐसा मुझे लगता है. अगर हम शिक्षा पर ज्यादा खर्च नहीं करते हैं तो शिक्षा भले ही हम सबके लिए अनिवार्य कर दें, लेकिन इससे कोई सफलता हासिल नहीं होगी. प्राथमिक शिक्षा अनिवार्य कर दी गई है लेकिन आज तक इस संबंध में किसी पर भी जिम्मेदारी तय नहीं की गई है,इसलिए जिम्मेदारी तय होना चाहिए. अत: इस ओर भी ध्यान देना जरुरी है. मैं यह भी बताना चाहती हूं कि उर्दू शिक्षा पर खास तौर से ध्यान देने की जरुरत है. उर्दू शिक्षा और संस्थाओं के जो मसले हैं, उन पर भी ध्यान दिया जाना चाहिए.

सभापति महोदय, वर्ष 2008 में गुरु-ता-गद्दी को 300 साल पूरे हो रहे हैं. यह ध्यान में रखते हुए सरकार ने नांदेड़ जिले के लिए 817 करोड़ रुपये की विकास योजना मंजूर की है.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान...

यह अच्छी बात है. मैं इसी सिलसिले में सकार का ध्यान इस बात की ओर आकर्षित करना चाहती हूं कि औरंगाबाद जैसे ऐतिहासिक शहर की स्थापना के 400 साल पूरे हो गए हैं. मराठवाड़ा का यह प्रमुख शहर है. इसलिए इस अवसर पर औरंगाबाद को नज़रअंदाज़ नहीं किया जाना चाहिए. इसलिए इसी बहाने औरंगाबाद जिले के विकास के लिए भी 400 करोड़ रुपये का प्रावधान किया किया जाना चाहिए, ऐसा मैं समझती हूं.

सभापति महोदय, बिजली की समस्या से हम सब वाकिफ़ हैं. इस समस्या को सुलझाने के लिए हर तरह कोशिश की जा रही है. इस समस्या के बारे में यहां अनेक बार चर्चा हुई है. हम बिजली निर्माण की बात कर रहे हैं लेकिन विद्यमान परिस्थिति में पर्याप्त बिजली निर्माण नहीं कर सकते हैं, तो जब हम पर्याप्त बिजली निर्माण नहीं कर सकते हैं तो कम से कम बिजली की चोरी,गळती(रिसाव) और वेस्टेज तो रोक सकते हैं. इसलिए मेरा यह सुझाव है कि बिजली की चोरी और वेस्टेज को रोकने के लिए कोई कारगर मशीनरी बनायी जानी चाहिए. इस कार्य को प्राथमिकता दी जानी चाहिए.

सभापति महोदय, पशु संवर्धन विभाग की तरफ से जानवर देने संबंधी योजना के बारे में मैं यह कहना चाहती हूं कि जो जानवर लाभार्थी को दिए जाते हैं, उन्हें वे बाद में बेच देते हैं. इस योजना के अन्तर्गत बहुत भ्रष्टाचार है. इस योजना के माध्यम से कोई फायदे का काम नहीं हो रहा है. इसलिए मैं यह सुझाव देना चाहती हूं कि जिस प्रकार से महिला बचत गट को राशन दुकान और केरोसीन का लाईसेंस देने संबंधी निर्णय लिया गया है, जो कि अभिनंदनीय है, उसी प्रकार से महिला बचत गट को जानवर देने का भी निर्णय लिया जाए. महिला बचत गट जानवर की देखभाल अच्छी तरह से कर सकता है, दूध का व्यवसाय अच्छी तरह से कर सकता है. इसलिए जानवर देने की योजना के अन्तर्गत महिला बचत गट के लिए आरक्षण रखा जाए.

सभापति महोदय, दूसरी बात यह है कि महिला बचत गट को बैंक की ओर से कर्ज प्राप्त करने में दिक्कत आती है. बैंकी की ओर से महिला बचत गट को कर्ज उपलब्ध कराने में लापरवाही बरती जा रही है, रुकावट पैदा की जा रही है. इसलिए मेरा यह अनुरोध है कि शासन इस दिशा में कोई कठोर कदम उठाए. क्योंकि अन्य योजनाओं के साथ साथ महिला बचत गट की मूवमेंट के द्वारा भी राज्य को विकसित किया जा सकता है.

अशुद्धीत प्रत/शोधनीसाठी नाही

इसके बाद श्री शर्मा...

**उपसभापती** : सभागृहाचे कामकाज 8.00 वाजता संपणार होते. आता श्रीमती फौजिया खान यांचे सुरु असलेले भाषण आणि त्यानंतर श्रीमती संजीवनी रायकर यांचे भाषण पूर्ण होईपर्यंत सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढविण्यात येत आहे. त्याचप्रमाणे आज ज्या दोन अर्धा-तास चर्चा होत्या त्याही पुढे ढकलण्यात येत आहेत.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मुद्दा क्रमांक 24 में पुलिस थानों के निर्माण की बात कही गई है. पुलिस में दस हजार पाँच सौ पदों का निर्माण होगा. मेरी शासन से मांग है कि हर जिले में महिला पुलिस थानों का निर्माण किया जाए और महिलाओं की भर्ती पुलिस में प्राथमिकता के आधार पर की जाए. इसके साथ साथ अल्पसंख्यक समाज के रिजर्वेशन के लिए शासन को कुछ न कुछ कदम उठाने चाहिए. जाति के आधार पर सरकार की ओर से रिजर्वेशन दिया जाता है. मैं इस सदन के माध्यम से सरकार से मांग करती हूँ कि अल्पसंख्यक समाज को डिफेंस में और पुलिस में रिजर्वेशन दिया जाए. माननीय सदस्य श्री. कवाडे ने कहा है कि इस अभिभाषण में दुर्बल घटक का चेहरा दिखाई नहीं दे रहा है. मैं उनकी इस बात से सहमत हूँ. सभी वर्गों का चेहरा राज्यपाल महोदय के अभिभाषण में दिखाई देना चाहिए. इसके साथ ही माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण का स्वागत करते हुए मैं अपना भाषण खत्म करती हूँ.

.....

. .. भाषण पूर्ण. ( . . . 3Y-2)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये काही गोष्टी राहून गेल्या आहेत तेवढयाच मुद्यांचा मी उल्लेख करणार आहे. मुंबईमध्ये गेल्या वर्षी जुलैमध्ये जे अस्मानी संकट आले त्याचा उल्लेख अभिभाषणामध्ये राज्यपाल महोदयांनी केलेला आहे. अनेक सदस्यांनी त्यावर आपले मत व्यक्त केले आहे. मला एवढेच सांगावयाचे आहे की सामान्य प्रशासन विभागाने शासकीय कर्मचाऱ्यांना तीन महिन्याचे वेतन अग्रिम म्हणून देण्याबाबत जीआर काढला. परंतु त्यामध्ये शिक्षकांचा उल्लेख केलेला नव्हता. 13 ऑगस्ट,2005 रोजी जीआर काढला. परंतु शिक्षकांचा त्यामध्ये उल्लेख नसल्यामुळे मी तीन वेळा याबाबतीत पाठपुरावा केला आणि ऑक्टोबरमध्ये जीआर काढून त्यामध्ये शिक्षकांचा उल्लेख केला गेला. आताच माझ्याकडे पंढरपूरच्या एका शिक्षकांचे पत्र आले आहे. त्यांनी त्यात म्हटले आहे की, तीन महिन्यांचे वेतन अग्रिम म्हणून देण्याचे शासनाने मान्य केले असतानाही आम्हांला अद्याप असे अग्रिम वेतन मिळालेले नाही. आणखीही काही शिक्षकांची अशीच परिस्थिती असू शकेल. शिक्षणमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी या विषयाची दखल घ्यावी आणि पुन्हा जीआर काढण्याबाबत शासनाला निर्देश द्यावेत. मुंबईमध्ये न भूतो न भविष्यती अशी अतिवृष्टी गेल्या वर्षी झाली होती. यावर्षीच्या पावसाळयात काय परिस्थिती निर्माण होईल या भीतीपोटी पोटात आताच गोळा उभा रहात आहे. या अतिवृष्टीनंतर प्लॅस्टीक पिशव्यांवर बंदी घालण्याबाबत शासनाने आदेश काढले. परंतु अशी परिस्थिती केवळ प्लॅस्टीक पिशव्यांमुळे निर्माण झाली आहे काय ? प्लॅस्टीक पिशव्या जनावरे खातात आणि त्यांच्या पोटातील पिशव्या ऑपरेशन करुन काढाव्या लागतात. या पिशव्यांवर जी बंदी घातली आहे त्याची अंमलबजावणी अतिशय चांगल्या पध्दतीने करावी अशी माझी शासनाला विनंती आहे. सभापती महोदय, मुंबईमध्ये भारनियमन केले जाणार नाही असे शासनाने सांगितले आहे. परंतु मुंबईच्या उपनगरामध्ये सायनच्या पुढे भारनियमन केले जाते. सध्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरु आहेत. म्हणून निदान परीक्षेच्या काळात तरी भारनियमन न करता या विद्यार्थ्यांना अभ्यास करण्याचे सुख लाभावे.

यानंतर श्री. खर्चे पी.

अप्रसिद्ध प्रत / मुद्रणासाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर .....

आदिवासी मुलांना समर्थ बनविण्यासाठी त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ठाणे, नाशिक, नंदुरबार, अमरावती आणि गडचिरोली या भागात इंग्रजी माध्यमाच्या पाच निवासी शाळा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एकीकडे आपण म्हणतो की, मराठी नाटयसृष्टीला प्रोत्साहन द्यावे, त्यासाठी अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला पण अशा प्रकारे इंग्रजी माध्यमाच्या शाळांना प्रोत्साहन देत बसले तर मराठी नाटक पाहण्यासाठी कोण येणार आहे ? हाही महत्वाचा मुद्दा आहे. कशाला पाहिजे ती नाटयसंस्कृती म्हणून याबाबत शासनाने विचार करावा अशी माझी विनंती आहे. आज स्वातंत्र्य मिळून जवळपास 60 वर्षे होत आहेत तरी देखील इंग्रजीकडे एवढा ओढा का आहे हेच मला समजत नाही. तसेच सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत शासनाने तोंडी आदेश दिलेले आहेत की, कोणत्याही शिक्षकांनी मे महिन्यात सुट्टीवर जायचे नाही, रिझर्वेशन करु नये, याचे कारण असे की या सुट्टीच्या काळात शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची शक्यता आहे. यासंदर्भात माझी माननीय शिक्षण मंत्र्यांबरोबर बरीच चर्चा झालेली असल्यामुळे मी जास्त खोलात जाणार नाही. परंतु मला या निमित्ताने असे सुचवावयाचे आहे की, या काळात आपण 21 दिवसांचे प्रशिक्षण शिक्षकांना देणार आहात आणि त्यात वरिष्ठ श्रेणीच्या शिक्षकांनाही समाविष्ट करणार आहात काय ? याबाबत खुलासा करावा. आपण पाच पाच दिवसांचे प्रशिक्षण देतो परंतु केवळ केंद्रशासनाकडून या योजनेअंतर्गत आलेला पैसा संपवावा म्हणून प्रशिक्षण द्यायला नको तर खरोखरच प्रशिक्षण झाले पाहिजे, याकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. यासंदर्भात माननीय शिक्षण मंत्र्यांनी जर शिक्षक आमदारांबरोबर बैठक घेतली तर आम्ही अनेक सूचना देखील करु शकतो.

महोदय, यानंतर टप्पा अनुदानाच्या संदर्भात मला सांगावयाचे आहे की, टप्पा अनुदानावरील शाळांना शासनाने निधी देण्याचे कबूल केले होते, त्याबाबत लोकांनी आनंदोत्सव देखील साजरे केले व मार्च महिन्यापूर्वी हे अनुदान मिळणार असे वातावरण तयार झाले होते परंतु शासनाकडे पैसे नाहीत म्हणून यातील 40 टक्क्याचा भाग देशील मिळू शकणार नाही अशी माझी माहिती आहे व हा निधी जुलै महिन्यात दिला जाणार आहे असेही ऐकण्यात आले यासंदर्भात खुलासा झाला पाहिजे, अशी मी मागणी करते, व अशा प्रकारे फसवणूक करु नये अशीही विनंती करते.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर .....

सभापती महोदय, यानंतर शिक्षण सेवक तसेच ज्युनियर कॉलेजमधील शिक्षण सेवक म्हणून रुजू झालेल्या शिक्षकांचे दोन दोन वर्षांपासून पगार झालेले नाहीत. ते मला नेहमी विचारतात की, आमच्या प्रश्नाच्या संदर्भात आपण बोललात काय, आज आपली शिक्षण मंत्र्यांबरोबर बैठक असल्याचे समजले, अधिवेशन सुरु झाल्यानंतर तरी हा मुद्दा आपण काढावा अशा अपेक्षेने हे लोक विचारतात, यासंदर्भात शासनाने विचार करावा अशी माझी सूचना आहे.

यानंतर राज्यातील सर्व शाळांमधील टाईम टेबल एकच करण्याबाबत शासनाचा जो विचार सुरु आहे त्यासंदर्भात मला असे सुचवावयाचे आहे की, राज्यातील प्रत्येक जिल्हयाच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार हे धोरण ठरवितांना करण्यात यावा व त्यासाठी प्रत्येक जिल्हयाच्या प्रतिनिधींना देखील बोलाविण्यात यावे अशीही माझी सूचना आहे.

महोदय, गुणवत्तेप्रमाणे तुकडया देण्यासंदर्भात सुध्दा अशीच परिस्थिती आहे. त्याबाबत बऱ्याच लोकांना प्रतिक्रिया उमटलेल्या आहेत यासंदर्भात शासनाने फेरविचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, शासनाने ज्येष्ठ नागरिकांना एस.टी. महामंडळाच्या लाल गाडयांमध्ये बसण्यासाठी कन्सेशन दिलेले आहे. परंतु या लोकांचे असे म्हणणे आहे की, या लाल गाडयामध्ये आम्हाला कन्सेशन देण्यापेक्षा व्होल्वोसारख्या आराम गाडयांमध्ये प्रवास करण्यासाठी कन्सेशन दिले तर बरे होईल. एवढेच नव्हे तर या ज्येष्ठ नागरिकांना एस.टी. मधून प्रवास करतांना एस.टी. मार्फत मिळालेले कार्ड असेल तरच प्रवास करता येतो, बाकीचे सर्टिफिकेट चालत नाही, पॅन कार्ड चालत नाही, पासपोर्ट चालत नाही, रेल्वेचे कन्सेशन सर्टिफिकेट देखील चालत नाही. आणि एस.टी. मधून असे सर्टिफिकेट मिळण्यासाठी दोन ते तीन महिन्यांचा कालावधी लागतो. म्हणून कुठलेही कन्सेशनचे कार्ड असले तरी ते ग्राहय धरुन प्रवास करण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी दलित स्त्रीवरील अत्याचार थांबले पाहिजेत, असा मुद्दा मांडला आहे. त्याबाबत माझी अशी सूचना आहे की, स्त्री ही दलित असो अथवा कुठल्याही जाती धर्माची असो स्त्री ती स्त्रीच असते. तेंव्हा अशा प्रकारे तिचे वर्गीकरण न करता सर्व स्त्रियांवरील अत्याचार थांबले पाहिजेत.

यानंतर श्री. भारवि .....

अशासकीय प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजिवनी रायकर....

कुठल्याही स्त्रीवर अत्याचार होता कामा नये. या बाबत शासनासह सर्वांनीच काळजी घेतली पाहिजे. मुसलमानांच्या एकतेबद्दल सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी कौतुक केले आहे. हिंदू देवतांबद्दल प्रसिद्ध चित्रकार श्री.हुसेन यांनी चित्र काढल्यानंतर देखील त्यासंबंधीची जाहीर चर्चा हिंदूमध्ये फारशी झाली नाही. परंतु, मुस्लिमधर्मीयांनी गुपचूप आंदोलन केले, व्ही.टी.येथे दगडफेक केली, दंगल केली. त्यांनी त्यांच्या धर्माबद्दल जी एकजूट दाखविली आहे, त्याबद्दल ते अभिनंदनाला पात्र आहेत. त्यांचे कौतुक हे केलेच पाहिजे. माझे फक्त एकच म्हणणे आहे की, कोणाच्याही धार्मिक भावना हया दुखावता कामा नयेत किंवा धार्मिक स्थानावर हल्ले होता कामा नयेत. सगळयांनी एका चांगल्या दृष्टीने पाहिले पाहिजे. आम्ही सर्वजण एक आहोत ही भावना प्रत्येकामध्ये रुजली पाहिजे. एवढाच विचार सर्वांनी केला पाहिजे. जाता जाता मी एकच सांगेन की, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न हा पुढच्या वर्षापर्यंत दोन्ही राज्यांनी दिलजमाई करून सामजंस्याने सोडवला पाहिजे. पुढच्या वर्षीच्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सुटल्याबद्दल अभिनंदन करणारा मुद्दा हा पहिल्या क्रमांकावर आणण्यासंबंधीचे स्वप्न मी बघत आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने खरोखर प्रयत्न केला तर मी शासनाचे सर्वात पहिल्यांदा अभिनंदन करीन. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

.....

**उपसभापती** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 17 मार्च 2007 रोजी, दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 8 वाजून 12 मिनिटांनी दिनांक 17 मार्च 2006 रोजीच्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही